# …्या अर्थ

म.ग्रं.सं. ठाणे
विषय : निबंध
सं. क्र. : १६६०४



REFBK-0014394

GORAY.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रमांक ४०१३८ दि: १.१०.९५.६
क्रमांक ........ नोंद दि: ........
२९२.५

# आकाशाचा अर्थ

४०१३६
निबंध
१६०४
२८·१२·६४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ............ दि: ..................
............................ नों दि: ..................

लेखकाची इतर पुस्तके

कविता

स्वेदगंगा (१९४९)
मृद्‌गंध (१९५४)
ध्रुपद (१९५९)

बालगीते

राणीची बाग (१९६१)
एकदा काय झाले! (१९६१)
सशाचे कान (१९६३)
एटू लोकांचा देश (१९६३)
परी ग परी (१९६५)

लघुनिबंध

स्पर्शाची पालवी (१९५८)

भाषांतरे

ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र (१९५७)
फाउस्ट (१९६५)

मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणे. स्थ
अनुक्रम ................ दि: ..........
क्रमांक ........................ नों. दि. ......

# आकाशाचा अर्थ

## आणि इतर लघुनिबंध

गो. वि. करंदीकर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १७३९७
REFBK-0014394

पॉप्युलर प्रकाशन

© गो. वि. करंदीकर

पहिली आवृत्ती १९६५ । १८८७

प्रकाशक : ग. रा. भटकळ पॉप्युलर प्रकाशन
३५ सी ताडदेव रोड मुंबई ३४WB

मुद्रक : चिं. स. लाटकर कल्पना मुद्रणालय
शिवपार्वती ४६१/४ सदाशिव पुणे २

प्रा. बाळासाहेब खर्डेकर ह्यांना सादर समर्पण

अनु: ... वि: ...
क्रमांक ... नों. दि: ...

## अनुक्रम

आकाशाचा अर्थ १
गुढग्याएवढ्या महापुराची कहाणी ५
राखणदार ११
एका खिळ्याचा क्रूस १६
पुरुष आणि पिशव्या २१
तू वाहतो आहेस २६
शेवटचे स्वातंत्र्य ३०
या जन्मातले पुनर्जन्म ३५
पुस्तके : एक शोभा ४०
न केलेले गुन्हे ४६
रातांबा ५२
आणखी काही घड्याळे ५८
कोश आणि कैवल्य ६४
जन्मभर पुरणारे काम ६९
सूर्य उगवत नसतो तेव्हाचा पाऊस ७४
रेषांच्या झाडावरील पक्षी ७९
मी आणि माझी भुते ८३
रात्र कुत्र्याची आहे ८८
आम्रयोग ९४
कुंड्या नामक संस्था ९९
डोळी १०४
शिरावर भार ढगांचा १०९

दा. क्र. ९२६३६

# आकाशाचा अर्थ

आकाशाचा अर्थ पाण्याला विचारावा. पण भलत्याच ठिकाणच्या पाण्याला तो सांगता येणार नाही. धालवलीतल्या ओझराच्या ओढ्यामधील धावत्या पाण्याला तो कसा समजणार ? हा ओढा अजूनही अल्लडपणाने बागडतो आहे; काठावरील उंबराची फळे चेंडूसारखी झेलतो आहे; सिताचौरीचा पदर ओढतो आहे; केगदीशी लगट करतो आहे; आणि म्हाराच्या धरणाजवळ आल्याबरोबर ब्रह्मदेवाच्या कोंडीत सूर मारून, प्रत्येक वळणाला ढुशी देत, मस्तीमध्ये धावतो आहे. अजून याला कसलीच समज आलेली नाही. वडीलधाऱ्या वृक्षांबद्दल याला अजूनही आदर नाही. मला वाटते हा जन्मभर असाच राहणार. नाहीतर स्थाने-श्वराच्या वडाजवळून पुढे जाताना त्याने इतकी खळखळ केली नसती. तो थोडा तरी दबकला असता. त्या वडाच्या पारावर मध्यरात्री काय चालते हे त्याला अजूनही उमगलेले नाही. आजी सांगते त्या सर्व गोष्टी त्याला अजून अज्ञात आहेत; सोडमुंज होण्यापूर्वी वारलेला शिवरामकाकाचा नातू त्या पारावरच अजून केव्हा केव्हा संध्या करतो. कोंडीतल्या विहिरीत जीव दिलेली मोरभटाची सून केव्हा केव्हा त्याच पारावर अजून प्रदक्षिणा घालते. पण या ओझराच्या ओढ्या-वर त्यांची सावली अजून पडलेली नाही. जीवनाच्या कपाळावरील मृत्यूची महा-मुद्रा अजून याने पाहिलेली नाही; झाडांनी आपल्या हिरव्या पदराखाली त्याला दडवून ठेवले आहे.

त्याच्या पाण्यात आकाशाला शिरताच आलेले नाही...त्याचा आवाज ऐकत

आकाश दूर उभे आहे; कधी कौतुक करीत, कधी स्वतःच्या पोकळीने दाटलेल्या खिन्न व्यथेमध्ये निमग्न होऊन... पण हे आकाश तरी असे किती दिवस थांबणार आहे ? किती दिवस वाट पाहणार आहे ? खरे म्हणजे त्याला त्या ओढ्यात एक दिवस कोसळायचेच आहे...त्याला अजूनही आशा आहे...एक दिवस या ओढ्याचे पाणी निस्तब्ध होईल; मग स्थानेश्वराच्या वडाची सावली त्या पाण्यावर पडू लागेल; त्या सावलीच्या आधाराने हळूहळू आपणही आत घुसू. पण ही त्याची कल्पना खोटी आहे. ओझराच्या ओढ्यात त्याला कधीच शिरता येणार नाही. कोल्यांच्या शाळेत जाताना मी कितीदा तरी त्याच्या काठावर उतारासाठी असाच तिष्ठत थांबलेला आहे; मला त्याची कल्पना आहे ! त्याच्या प्रवाहात भिजलेले माझे पाटीदप्तर अजूनही ओले आहे.

आकाशाचा अर्थ पाण्याला कळतो; पण स्वतःच्याच गतीने बेहोष होऊन स्वच्छंदपणे खिदळत जाणाऱ्या या वाहत्या पाण्यात त्याचे प्रतिबिंब पडू शकत नाही. म्हणूनच, आकाशातून येऊनही गंगेला आकाशाचा अर्थ समजलेला नाही. तिला तो समजला असता तर ती हिमालयापासून समुद्रापर्यंत वाहिलीच नसती. तिने वाहण्याचे नाकारले असते. आणि भगीरथाला आकाशाचा अर्थ कळता तर त्यानेही तिला पृथ्वीवर आणण्याचा तो पोरकट हट्ट धरला नसता. त्याच्या इच्छांचेच आकाश बनते. मग आपले पितर आणि आपले पौत्र हे समकालीन आहेत ही गोष्ट त्याला उमगली असती... आकाशाचा अर्थ कळला की आकांक्षांचे इंद्रधनुष्य हळूहळू विरघळून जाते... फक्त तो निळा बाण तेवढा शिल्लक उरतो... आणि प्रकाशवेगाने तो आपल्या भोवतीच प्रदक्षिणा घालू लागतो... त्यानंतरचा आपला प्रत्येक श्वासोच्छ्वास फक्त या विश्वप्रदक्षिणा मोजीत बसतो.

आणि तरीसुद्धा एकदा आकाश गंगेमध्ये वितळले होते ! पण ती गंगा बापूच्या दोन डोळ्यातून वाहत होती. क्षयाने झिजत झिजत शेवटी तो आकाशाच्या काळ्या उंबरठ्यापर्यंत पोहोचला होता. त्याला चालवत नव्हते; विशेष बोलवतही नव्हते. पण त्याचे ओठ हालले म्हणून मी कान जवळ नेला. तो म्हणाला, 'भाऊ, मला अंगणात ने; मला आकाश पाहायचं आहे.' मी म्हटले, 'तुला त्रास

होईल.' तो म्हणाला, 'मला उचलून ने.' मी त्याला उचलून बाहेर नेला. त्याने फक्त एकदाच आकाशाकडे पाहिले; फक्त एकदा आणि नंतर 'आत ने' अशी खूण केली... त्याला दिसलेले ते आकाश कसे असेल याचा विचार मी पुष्कळदा करतो; पण मला त्याची कल्पनाच करता येत नाही. मला वाटते, वाहत्या माण-साला आकाश कधीच दिसत नाही. आकाशाचा अर्थ समजण्यासाठी ते फक्त 'एकदा' आणि 'असे' पाहावे लागते... रोज रोज आकाश पाहणाऱ्या माणसाला आकाश मुळीं दिसतच नाही. त्याला दिसते ते स्वतःच्या डोळ्यातले काजळ...ते आईने घातलेले काजळच आपणाला दिसत असते; आणि आपण त्याला आकाश म्हणतो... ते काजळ संपल्याशिवाय आपणाला खरे आकाश दिसू शकत नाही.

आकाशाचा अर्थ पाण्याला विचारावा; पण तरीसुद्धा तो समुद्राला विचारू नये! तो खूप आकांडतांडव करील; भीमरूपी महारुद्राचा अवतार घेईल; आपल्या लाटा प्रत्यक्ष आकाशाला भिडल्याचे सोंग आणील. पण तरीसुद्धा तो मला फसवू शकणार नाही. ज्याला भरती आणि ओहोटी आहे अशा कोणत्याही पाण्यात आकाशाचे प्रतिबिंब सापडणार नाही. म्हणूनच समुद्राला आकाशाचा आरसा म्हणणे चुकीचे आहे. ही चूक मी सुद्धा पूर्वी केलेली आहे. पण त्या वेळेपर्यंत मी आरसाच पाहिला नव्हता ... आरसा पाहायचा असला तर शहाण्या माणसाने निदान त्यात दिसणाऱ्या आपल्या डोळ्यांकडे तरी पाहू नये; आणि डोळे दिसलेच तर निदान त्यातली भावली उमगण्यापूर्वीच आपण आपल्या पापण्या मिटून घ्याव्यात... जवळच्या खिडकीच्या गजाला घट्ट धरावे... आणि पाच मिनिटांनी पृथ्वी स्थिर झाली की मग... पावडर लावावी. आकाशाचा आरसा बनणे किती कठीण आहे, हे आता मला समजले आहे. समुद्राला आकाशाच्या आरशाची उपमा मी आता कधीच देणार नाही... आकाशाला आरसा नसतो. सगळ्या वस्तूंना आरसे असतात; फक्त आकाशाला आरसा नसतो. म्हणूनच आकाशाचा विचार केला म्हणजे समुद्र हा 'बापुडा' वाटू लागतो. त्याच्या गर्जना कानाच्या पलीकडे पोचू शकत नाहीत. त्याचे सामर्थ्य सुद्धा पोरकट वाटते. त्याने द्वारका गिळली हे वाचून एखाद्या पोराने पावली

गिळावी तसे वाटते. त्याने उभारलेले नवे भूप्रदेश हे मुलांनी बांधलेल्या पत्त्यांच्या बंगल्यासारखे डळमळीत वाटतात... आकाश काही निर्माण करीत नाही आणि कशाचा नाशही करीत नाही. ते फक्त असते...ते कसे असते ते पाण्याला विचारा...

स्थानेश्वराच्या डोंगरापुढील काल्कोण्डीतील पाण्याला. निस्तब्धात निमग्न झालेल्या त्या पाण्यालाच आकाशाचा अर्थ कळलेला आहे; आणि ही गोष्ट आमच्या गावकऱ्यांना केव्हा तरी उमगलेली असावी. नाहीतर एवढ्या लहान कोण्डीला त्यांनी कालकोण्ड हे विलक्षण नाव दिले नसते. आजी म्हणते, " पाण्डवांना तहान लागली तेव्हा त्यांनी ही कोण्ड खणली." धकल्या घाडी तर " ही कोण्ड भीमान् कोपरान् खणलान् " म्हणून सांगतो. पण ही कोण्ड पाहिली म्हणजे ती पाण्डवांच्याही अगोदरची असली पाहिजे याची खात्री होते! जसजसे पाण्याकडे पाहत बसावे तसतसे ते खरे वाटू लागते. मग बाजूच्या कातळावर आडवे पडून कोंडीत पाहण्याचा मोह होतो. किती वेळ असे पाहत बसले तरी त्या पाण्याची हालचाल होत नाही; कोंडीचा तळ दिसत नाही. अजून तो कोणालाच दिसलेला नाही. प्रथम आपले अंधुकसे प्रतिबिंब दिसते; पण हळूहळू पलीकडील आकाशाच्या प्रतिबिंबात तेसुद्धा विरून जाते. मग कोण्डीचा तळ त्या आतल्या आकाशाइतका खोल जातो; आपले डोळे भरू लागतात आणि कोण्डीतले पाणी दिसेनासे होते... सगळ्या डोहाचाच एक डोळा होतो. त्यात आकाशाचा अर्थ सांगण्याची शक्ती असते. आपला देह आपल्याला न कळत अर्थाकडे सरकू लागतो; हळूहळू सरकू लागतो...

पण मग बाहेरचे आकाश आपल्या पाठीवरून हात फिरवते. म्हणते, " उठ. घरी जा. आईने घातलेले ते काजळ तुझ्या डोळ्यात अजूनही शिल्लक आहे. "

केसरी : दिवाळी १९५८

# गुढग्याएवढ्या महापुराची कहाणी

आटपाट नगर होते; निर्मळ मळे, उदकाचे तळे; बेलाचा वृक्ष, सुवर्णाची कमळे; विनायकाची देवळे, मारुतीची रावळे; अठरापगड जाती होत्या; अठरापगड धंदे होते; अठरापगड भांडणे होती. प्यायचे पाणी एकच होते. एक दिवस काय झाले ? त्या पाण्याची भिंत झाली; नगराकडे चालत आली. का आली ? कशी आली ? कुठून आली ? केव्हा आली ? विचार करायला वेळ नव्हता. आचार करायला वेळ नव्हता. ज्याने तोंड उघडे केले त्याच्या तोंडात पाणी गेले. भिंत चालली पुढे पुढे. संसार धुऊन नेत होती. तिच्या अंगावर चिखल खूप; संक्रांतीसारखे तिचे रूप; एका गालात पानशेत; दुसऱ्या गालात खडकवासला. काय भिंतीला लागले खूळ ! पुण्यावरती टाकलीन चूळ; गरीब नाही, श्रीमंत नाही; ब्राह्मण नाही, मराठा नाही; हिंदू नाही, मुसलमान नाही. भिंतीला का विटाळ घडे ? भिंत चालली पुढे पुढे. म्हणतात भिंत चालली तर, त्यावर बसतो ज्ञानेश्वर. त्याला शोधीत कवी आला; ज्ञानेश्वरापुढे उभा राहिला. दोन्ही हात जोडिन्नले. कवी म्हणाला, " ज्ञानेश्वरा, माझ्यावरती कृपा करा. मी आहे फक्त कवी; कुणाच्या आह्यातन सतो; कुणाच्या बाह्यात नसतो; शब्द आरबल्यावर उठून बसतो; शब्दांनीच तोंड धुतो, शब्दांचाच चहा पितो, शब्दांनीच स्नान करतो, शब्द उकडून जेवण करतो, शब्दांचेच वस्त्र नेसतो, शब्दांचेच बांधतो घर, निजतो शब्दांच्या छपरावर. तिथे सुद्धा आले पाणी, ही करणी केली कोणी ? " ज्ञानेश्वर म्हणाला, " ज्याने ही करणी पूर्वी केली, त्यानेच ती आज केली. ही माणसाची जुनी व्यथा, त्याची आहे लांब कथा. पूर्वी पूर आले होते, असेच लोक वहावले

होते, कारणाशिवाय धावले होते. अशाच भिंती चालल्या होत्या. कोणी भिंतीच्या पुढे पडतात; कोणी भिंतीच्या खाली दडतात; कोणी भिंतीवर चढून बसतात. कोणी हसतात, कोणी रडतात; कोणी एकमेकांना जाऊन डसतात. पण सगळेच वाहत असतात. पाहा आता डोळे भरून, मीही वाहतो भिंतीवरून ! भिंती भिंती सांग याला, कोणचा पूर केव्हा आला; त्यांनी काय वसा केला. पूर्वी एकदा रेडा बोलला, तशीच आता तू बोल. पुराचे पाणी किती खोल ? ”

मग भिंत बोलू लागली. कवीला म्हणाली, “ गंगेवर जा. सात लोटे पाणी आण, सात वेळा कान धू. मग तुला महापुरांची कहाणी सांगते, न बुडण्याचा वसा सांगते. ” बिचारा कवी गंगेवर गेला. सात लोटे पाणी घेतलेन, सात वेळा कान धुतलेन. पुन्हा भिंतीपुढे उभा राहिला. दोन्ही हात जोडिले. भिंतीने त्याचे कान पाहिले. एका कानात शंख होता, दुसऱ्या कानात शाळिग्राम होता. डावा कान उजव्या कानापेक्षा लांब होता. हे पाहून भिंतीला बरे वाटले. हा श्रोता अधिकारी आहे. असा श्रोता मिळाला नव्हता. असा योग आला नव्हता. भिंत म्हणाली, “ ऐक आता—

“ आटपाट नगर नव्हते; तरी लोक जगत होते. जगणाऱ्यांमध्ये मनू नावाचा माणूस होता. एकदा त्याच्या मनात आले, आपणसुद्धा स्नान करावे. त्याने स्नानाला पाणी घेतले; एक तांब्या अंगावर ओतला, दुसरा तांब्या अंगावर ओतला. तिसरा तांब्या अंगावर ओतला. चौथ्या तांब्यात मासा दिसला. मनूच्या मनात विचार आला, माशाचे कालवण चांगले होईल, आज जेवणाला मजा येईल. पण तसे व्हायचे नव्हते. कारण तो मासा बोलू लागला. मासा म्हणाला, ‘ मनू, मनू, अशी घाई करू नको. पुढे महापूर येणार आहे; सगळे जग बुडणार आहे. आज मला मारलेस तर, त्या वेळी तू मरशील. आज मला तारलेस तर, त्या वेळी तू तरशील. ’ मनूला काय करावे कळेना. त्याचे मन गोंधळून गेले. मारावे की तारावे. त्याने दोन बोटे नाकाजवळ नेली, एकाला ‘ मारावे ’ मानलेन, दुसऱ्याला ‘ तारावे ’ मानलेन. मग दोन्ही बोटे माशापुढे केलीन. माशाने ‘ तारावे ’ या बोटाला स्पर्श केलान. मनू म्हणाला, ‘ ठीक

आहे. तसे असेल तर तुला सोडतो. पण एक लक्षात ठेव. जर महापूर आला नाही, जर सगळे जग बुडाले नाही, तर तुझे कालवण करीन.' मासा म्हणाला, 'खुशाल कर; मी सांगतो ही नाही थाप, खोटे ठरले तर खुशाल काप.' मनूने माशाचे रक्षण केले. मासा हळूहळू वाढू लागला. प्रथम त्याला रांजणीत ठेवलेन, पुढे तो त्यात मरेना; नंतर त्याला तळ्यात ठेवलेन, पुढे तो त्यात ठरेना; शेवटी त्याला नदीत सोडलेन, तरी नदी पुरेना. मनूने मासा समुद्रात सोडला. आपण एका जहाजात बसला. वेळ जाण्यासाठी गुडगुडी घेतलीन. एक गुडगुडी ओढलीन, दुसरी गुडगुडी ओढलीन, तिसरी ओढलीन. चौथी ओढलीन. चार परार्ध, तीन मध्य, सहा अन्त्य, पाच शंकू, तीन कोटी, अकरा लक्ष, सतरा हजार, पाचशे एकवीस गुडगुड्या ओढून झाल्यावर आकाश ढगांनी भरून गेले. विजांचा कडकडाट सुरू झाला. मुसळधार पाऊस कोसळू लागला. बारा वर्षे पाऊस पडला, बारा वर्षे पूर चढला; सगळे जग बुडून गेले. सगळी माणसे मरून गेली. फक्त मनू शिल्लक उरला. मनूचा मासा मनूला म्हणाला, 'आता तुला प्रत्यय आला. आता तुझे जहाज माझ्या कल्ल्याला बांध. तुला हिमालयावर घेऊन जातो. पूर्वी मला तू तारलेस, आज तुला मी तारतो.' मग मनूने तसे केले. त्याचे फळ काय आले? मनूला तिथे भेटली इळा; इळेच्या पोटात आल्या कळा; नवा संसार झाला शिळा.

"आटपाट नगर नव्हते; तरी लोक जगत होते. जगणाऱ्यांमध्ये नोहा नावाचा माणूस होता. देव म्हणेल ते तो म्हणायचा; देव बोलेल ते तो बोलायचा. नेहमी देवाच्या मागेमागे असायचा. त्याचा परिणाम काय झाला? देव म्हणाला, 'हाच भला. बाकी सारे पापी आहेत; कोणी धर्म मानीत नाही; कोणी प्रार्थना करीत नाही; वाटेल ते खातात पितात, वाटेल ती गाणी गातात. मला विसरून सुखी होतात.' नोहा म्हणाला, 'अगदी खरे. नाही होणार त्यांचे बरे.' देव म्हणाला, 'कसे होईल? त्यांचे पाप त्यांना खाईल. देव दयाळू, देव क्रूर. पापावरून जाईल पूर.' नोहा म्हणाला, 'बुडेल जग! माझे कसे होईल मग?' देव म्हणाला, 'नको रडू, आण इकडे एक खडू. सांगतो तशी नौका बांध. नीट मापे लक्षात घे. तीनशे क्यूबिट लांबी असू दे, पन्नास क्यूबिट रुंदी असू दे, तीस

क्यूबिट उंची असू दे; मध्ये तीन मजले ठेव, या बाजूला दार कर, त्या बाजूला खिडकी धर. तुझे सगळे नौकेत ठेव, तुला रक्षील तुझा देव.' नोहा म्हणाला, 'काय काय करू, आणखी नौकेत कोण कोण भरू?' देव म्हणाला, 'सांगतो ना. तुझे मुलगे आत घे, तुझ्या सुना आत घे, बायकोसुद्धा आत घे.' नोहाने तोंड वाईट केले; देवाला वाटले, लक्षात आले. देव म्हणाला, 'ठीक आहे. तुला दया आली तर, पशुपक्ष्यांचे असे कर : प्रत्येक जातीची दोन घे. एक नर, एक मादी; पण त्यातही भेद कर. मला चालणारी असली जात, तर जोडपी चालतील सात.' मग नोहाने तसे केले. त्या मापाची नौका केली, सगळी मंडळी आत नेली. आपण मध्यावर जाऊन बसला. इकडे पाऊस सुरू झाला. काही केल्या थांबेना. ओहोळांचे वहाळ झाले, वहाळांच्या नद्या झाल्या, नद्यांचे समुद्र झाले, समुद्राला उधान आले. घरेदारे बुडून गेली, झाडेपेडे बुडून गेली, पर्वतावरून लोळल्या लाटा, असा प्रलय झाला मोटा. नोहा नौकेत बसून होता. खिडकीमधून पाहत होता. त्याला खूप गंमत दिसली. मनात म्हणाला, 'ठीक जिरली.' नोहाची बायको तिथेच होती. ती शेवटी त्याला म्हणाली, 'दीडशे दिवस पाहिलात पूर, तुमचे डोळे किती क्रूर. आता काही उद्योग करा. पाखरे सोडून पाहा जरा. कदाचित पाणी उतरले असेल. पूर्वी एकदा पूर आला. तेव्हा सिलपिस्तीने असेच केले. तोंड उघडून बघता काय, आता थोडे हलवा पाय.' मग नोहा बायकोला म्हणाला, 'उगाच आवाज चढवू नको, तरलेल्याला बुडवू नको. तू म्हणतेस तर तसेही करतो.' मग नोहाने कावळा घेतला, खिडकीमधून बाहेर सोडला, काळी सावली पाण्यावर पडली. पण कावळा परत आला नाही. जिकडे गेला तिकडचा झाला. मग नोहाने कबूतर घेतले, खिडकीमधून सोडून दिले, फडफड करीत उडून गेले. थोडे उडून मागे आले. जिकडे तिकडे पाणी होते, त्याला झाड दिसत नव्हते.मालक शोधीत मागे आले. नोहा म्हणाला, 'ठीक झाले.' नोहाने सात दिवस वाट पाहिली. पुन्हा कबूतर उडवून दिले. ते दूर उडून गेले. संध्याकाळी परत आले. त्याच्या चोचीत काय होते? बदामाचे पान होते. नोहाने ते पान पाहिले. त्याला फार आनंद झाला. तो आपल्या बायकोला म्हणाला, 'पाहा पूर कमी झाला, आनंदाचा दिवस आला. आता माझे ऐक जरा. हाच देव आहे खरा.' पण नोहाची बायको बाईच होती. बोलली नाही, चालली

नाही. पहिल्यासारखीच पुढे वागली; ओचे बांधून कामाला लागली.

" आटपाट नगर नव्हते; तरी लोक जगत होते. जगणाऱ्यांमध्ये त्ती नावाचा माणूस होता. तो स्वतः जगत असे, इतरांनाही जगवीत असे. म्हणून लोक त्याला राजा मानीत. पण एकदा महापूर आला, जिकडे तिकडे कल्लोळ झाला. मुंग्यासारखे लोक मेले, पुरामधून वाहून गेले. जे उरले त्यांना घर नव्हते, अंगावर कपडा नव्हता, खायला अन्न नव्हते. राजाने प्रधान बदलून बघितले; कुणाचाच निभाव लागेना. मग त्ती लोकांना म्हणाला, ' या संकटातून तुम्हाला वाचवील, तोच तुमचा राजा होईल. त्यालाच तुम्ही राजा माना. ' लोक म्हणाले, ' असे कसे ? असा त्रागा का करता ? तुम्ही तरी करणार काय, दैवापुढे हरतो उपाय. ' त्ती म्हणाला, ' असे कसे होईल, एकाला जमत नाही ते दुसऱ्याला जमते. ' तेव्हा यू पुढे आला. त्याने सगळी साधने एकत्र केली. नावाड्यांच्या नावा जमवल्या; गाडीवानांच्या गाड्या जमवल्या. सगळे निराधार लोक बरोबर घेतले; जंगलात जाऊन जंगले तोडली; पाण्यासाठी ओहोळ खणले; ओहोळा-मधून वाहाळ काढले; वाहाळ नेऊन नद्यांना मिळवले; नद्यांचे प्रवाह सरळ केले; सगळे प्रवाह समुद्रात सोडले. पाटबंधाऱ्यांची व्यवस्था केली. शेतीसाठी कालवे काढले. मग यू यीकडे गेला. यीला म्हणाला, ' एवढे कर, तुला शिकार चांगली जमते. का जमते ? कशी जमते ? तू सगळ्यांना शिकार शिकव. ' यीने लोकांना शिकार शिकवली. मग यू चीकडे गेला, चीला म्हणाला, ' एवढे कर, तुझी शेती अधिक पिकते. का पिकते ? कशी पिकते ? ते सगळ्यांना समजावून सांग. नाही फिटणार तुझे पांग. ' मग चीने तसे केले. सगळे लोक शहाणे झाले, जवळ असेल ते देऊ लागले; जवळ नसेल ते घेऊ लागले. हाच वसा, हेच वाण; भूमीमध्ये रुजला प्राण. यूने एवढे पुण्य जोडले; मग त्तीने राज्य सोडले. चोवीसशे वर्षांपूर्वी असे घडले !

" आटपाट नगर नव्हते; तरी लोक जगत होते... त्यातला एक अजूनही जगतो आहे. तिबोटी लंगोटी घालतो, खांदी कुऱ्हाड घेतो, वनास जातो, वनची फळे आणतो, त्याचे पाच भाग करतो, देवाचा देवाला देतो, अतिथीचा

अतिथीला देतो, ब्राह्मणाचा ब्राह्मणाला देतो, गायीचा गायीला देतो, उरले-सुरले आपण खातो; असे करता नखे रुपली, बोटे खुपली, आंगी रोम वाढिन्नले, मस्तकी जटा वाढिन्नल्या, अठ्याऐंशी सहस्र वर्षे झाली, तरी तो माणूस जिवंत आहे. प्रथम त्या माणसाचे दर्शन घ्यावे, मग तळ्याच्या पाळी यावे, धरणाची पूजा करावी, काकडीचे पान घ्यावे, वर दहिभात आणि लोणचे घालावे, एक शिवराई सुपारी ठेवावी... आणि इंजिनियरांना वाण द्यावे, एक मुटकळे कॉंट्रॅक्टरच्या पदरात टाकावे. जलदेवतांची प्रार्थना करावी, 'जय देवी, आई माते, आमचे वंशी कोणी पाण्यात बुडाले असतील ते आम्हास परत मिळोत.' मग बळी गेलेली माणसे आपले पाय ओढू लागतील. त्यांच्यावर चिडू नये. त्यांना उचलून कडेवर घ्यावे; नेसलेले वस्त्र सोडून द्यावे (मात्र नवे देऊ नये!). असे केल्याने काय होते? कुथण्याची सवय कमी होते. आलाच तर राग येतो. कुथण्यापेक्षा क्रोध बरा; आजच्यापेक्षा काल खरा. मुळा म्हणते, 'इळीमिळी', मुठा म्हणते, 'गुपचिळी'.

ही पाचा उत्तरांची कहाणी साठा उत्तरी, मंत्रिमंडळाच्या महाद्वारी, सदा-शिवपेठी शनीच्या पारी, सुफळ संपूर्ण."

मौज : दिवाळी १९६१

दि:
दि:

# राखणदार

मास्तरना किरांगळी दाखवून आम्ही शिताकाकूच्या आगरात पाणी प्यायला जायचे. आमचे घर शाळेपासून मैलभर दूर ; पण काकूचे आगर शाळेच्या आवारापासून अगदी जवळ. गडग्याला गडगा लागलेला. त्यामुळे तहान लागली की पाणी प्यायला काकूकडे जाणे सोयीचे पडे. शिवाय मी आणि बापू असे दोघेच असलो आणि काकू खुषीत असली तर ती पाण्याबरोबर थोडा गूळसुद्धा देई. आपण होऊन म्हणायची, ‘ अनशीपोटी पाणी ढोसता; हा गुळाचा खडा टाका तोंडात; अरे तुम्ही घरचेच हो, आता हे वेगळेचार झाले. ’ पण शिताकाकूच्या आगरात जाण्यामध्ये पाणी पिणे एवढाच हेतू नसे ! आमच्या शाळेतसुद्धा पाणी पिण्यासाठी एक अगडबंब मडके ठेवलेले असे. मात्र त्यातले पाणी पिणे हे मोठे धाडसाचे काम होते. एकदा पाणी पिताना सदू परांजप्याच्या हातून ते सबंध मडकेच उपडे झाले. सगळ्या वर्गात जलप्रलय झाला. दात्ये मास्तर तर रागाने थरथरू लागले... दात्ये मास्तरांची हीच गंमत होती, त्यांचा राग अनावर झाला की प्रथम त्यांनाच कंप सुटे ! मग ते आम्हाला झोडून काढीत, त्या वेळी आम्हाला रडायला येई म्हणून बरे; नाहीतर आम्ही फिदीफिदी हसलो असतो; आणि आम्ही हसलो असतो म्हणजे मात्र मास्तरनी ते सर्व घरी कळवले असते. त्यांना सगळ्यात राग येई तो हसण्याचा आणि आम्हाला सुद्धा शाळेतला मार हा घरच्या मारापेक्षा बरा वाटे... त्या दिवशी दात्ये मास्तरांच्या हातचा मार खाऊन सदू परांजपे जो शाळेतून गेला तो पुन्हा परत त्या शाळेत आलाच नाही. नंतर नाशिकला गेला असे कळले; आणि आता

मुंबईला पोलीस इन्स्पेक्टरच्या हुद्द्यावर असतो असे ऐकतो. पण त्या प्रसंगा-पासून आम्ही एक धडा घेतला; शाळेतल्या मडक्यातले पाणी प्यायचे नाही. विश्राम पडवळाचा पोर शाळेत नादार होता; तो आपला नेमाने मडके भरून ठेवी आणि दुसऱ्या दिवशी परत ओतून टाकी. स्वतःसुद्धा त्यातले पाणी पिण्याच्या भानगडीत पडत नसे !

पण काकूच्या आगरात पाणी प्यायला जाण्यामध्ये आमचा आतला हेतू निराळा असे. काकूच्या आगराला एका सापाची राखण आहे ही गोष्ट आम्ही अगदी लहानपणासून ऐकत आलो होतो. तो साप किती मोठा आहे, किती म्हातारा आहे, त्याचा रंग कसा आहे, त्याच्या अंगावर केस कुठे आहेत, त्याच्या डोक्यातला खडा केवढा आहे, तो उभा कसा राहतो, फणा केवढी करतो, आवाज कसा काढतो, याचे तपशीलवार वर्णन लख्या टुकरूल आम्हाला तासन्तास सांगत असे. सिधंभडजी भिक्षुकीसाठी आमच्याकडे येत त्या वेळी शिताकाकूंचा विषय हटकून निघायचा. मग आई म्हणायची, 'भडजी, काकूंचे आता वय नाय का झाले; आम्ही इतकी जवळची माणसे असताना अशा या हट्टाने एकट्या राहतात; जग आम्हाला हसते.' मग सिधंभडजी म्हणायचे, 'एकट्या राहतात असे तुम्ही म्हणा, मी नाही म्हणायचा. राखणदार आहे तोपर्यंत त्या एकट्या नव्हत. म्हातारी त्या जोरावर एकटी राहते. राखणदार आगरात फिरतो आहे तोपर्यंत खडा पहारा आहे. तिला कुणाचीही भीती नाही.' आई म्हणायची, 'भीती कसली कपाळाची असायची. तिथे कुठे मोहरांनी रांजण भरलेले आहेत ! आणि कुणी आलेच तर हा राखणदार काय करणार आहे ?' मग सिधंभटजी म्हणायचे, 'काय करणार आहे ? शेजारच्या बाबूखोताचा निर्वंश कसा झाला ? त्याच्या घरात आता शाळा आली ! आणि तोच राखणदार गेल्या तीन पिढ्या तुमच्या वास्तूचे रक्षण करतो आहे. जोपर्यंत राखणदार आहे तोपर्यंत काकू घर सोडणार नाहीत. तुम्ही काय हवे ते करा.'

या राखणदारामुळे काकूंचे ते जुने मोडके घर आम्हाला एखाद्या प्राचीन भुयारासारखे रहस्यपूर्ण वाटे. काकूच्या आगरात गेल्यानंतर पाय जरा लटपटू

लागत; पण तिकडे जाण्याचा मोह अनावर होई. त्या आगराबद्दल भीती वाटे आणि आकर्षणही वाटे. काकूकडे जाण्याची कोणतीच संधी मी बहुधा वाया दवडीत नसे. इतक्या वेळा आगरात जाऊन तो राखणदार मला एकदाही उमगला नाही याचेच मला वैषम्य वाटे. काकू एकट्या असल्यामुळे आई कधी कधी त्यांच्याकडे भाजीपाला पाठवी. तो पोचवण्याचे काम मी मुद्दाम माझ्याकडे घेई. आई म्हणे, ' पायाखाली बघत जा हो; त्या आगरात राखणदार आहे म्हणतात. ' मग मी म्हणायचा, ' हात्तिच्या, तो राखणदार ना. अग, आमच्या शाळेच्या गडग्याजवळून आम्हाला रोज दिसतो. काय पिवळाजर्द आहे ! पण मुलांना काही करत नाही. ' मग एका हातात पडवळ आणि दुसऱ्या हातात अळू घेऊन मी हळूहळू गुरवाच्या पाळंदीने काकूच्या आगराकडे चालू लागे. वाटेत केव्हातरी बापटांची सुली भेटे; तिच्या केसात केवडा असे. ती म्हणे, ' कुठे काकूंकडे चाललास ? ' मी म्हणे, ' होय. ' मग सुली म्हणायची, ' तिच्या आगरात राखणदार असतो ना रे ? ' मी म्हणायचा, ' होय, काय पिवळाजर्द आहे !' ती म्हणायची, ' मी येऊ ? मला दाखवशील ? ' मी म्हणायचा, ' छे, तो केवडा घातला आहेस ना ? आज तर मुळीच नको. माहिती आहे; त्याला नुसता केवड्याचा वास आला तरी पुरे ! ' मग सुली भ्यालेल्या नजरेने टकमक पाहत राही. त्या टकमक डोळ्यांनी मला पुन्हा त्या राखणदाराचीच आठवण होई. आपल्याला तो अजून दिसलेला नाही याची लाज वाटे... थोडे पुढे गेल्यावर वळणातला वड लागे; त्याच्या पारंब्या सापासारख्या लोंबताना दिसत; त्या वाऱ्याने वळवळू लागत. गुरवाची पाळंद संपल्यावर मळ्यातील पायवाट लागे; तिलासुद्धा सापासारखीच वळणे असत. काकूचे आगर आले की छातीत जरा धसकल्यासारखे होई. आगर ओलांडताना गडग्यावर ठेवलेले पडवळ परत उचलू लागले की त्याचा स्पर्शही सापासारखा विळविळीत लागे आणि अंगावर शहारा येई. तो वळणावळणांचा गडगा, ते विळविळीत पडवळ, तो अदृश्य राखणदार ही क्षणभर एकमेकात मिसळून जात. राखणदाराला पाहण्यासाठी टपलेले डोळे त्याला नको नको तिथे पाहत बसत. पायांजवळच्या पातेऱ्यात एखादी सरडी सरसरली तरी अंग चमकून जाई. खरे म्हणजे काकूचे आगर हे आमच्या दृष्टीने त्या राखणदाराचे आगर होते. काकू स्वैपाक-

घराच्या मोरीशी भांडी घाशीत तरी असायची किंवा मागच्या दारी सुकवणे वाळवणे तरी घालीत असायची. आगरात फिरताना ती क्वचितच दिसायची; आणि तरी सुद्धा शिताकाकूच्या आगरात कोणीतरी एकाच वेळी सगळीकडे पहारा करीत आहे असा आम्हाला भास व्हायचा. राखणदार कुठे राहत असेल याची नक्की कल्पना कुणालाच नसे. पण त्याचा आभास मात्र सर्वत्र आगरभर वावरत असे. ते आगर त्याचे होते आणि एखाद्या माणसाने एखादे मांजर पाळावे तशी ही म्हातारी त्याने पाळलेली होती !

शिताकाकू राखणदाराविषयी फार क्वचित बोलत. एखाद्या घरंदाज बाईला आपल्या नवऱ्याविषयी बोलताना जसा संकोच वाटावा तसा त्यांना या राखण-दाराविषयी बोलताना वाटे. आम्ही पाणी प्यायला गेलो म्हणजे पुष्कळदा 'आम्हाला तुमचा राखणदार दाखवा' 'राखणदार दाखवा' म्हणून गिल्ला करीत असू. शाळकरी पोरांनी राखणदाराविषयी असे-तसे बोललेले त्यांना बिलकुल खपत नसे. त्या लगेच आमच्या आंगावर खेकसत, 'शाळेत काय हेच शिकता का रे, गाढवांनो?' पण विष्ण्या वैशंपायन हाडाचाच वात्रट; तो उलट म्हणे, 'आम्हाला एकदा तरी राखणदार दाखवा; नाहीतर सागवानाखालच्या वारुळा-वर आम्ही दगड मारू.' मग शिताकाकू पिसाळून म्हणत, 'गाढवा, दगड तर उचल, म्हणजे तुझे थोबाडच फोडल्ये; तुझा बापूस जिवंत आहे ना अजून?' मग विष्ण्या सुद्धा घाबरे. राखणदार कुठे राहत असेल याबद्दल आमचे निर-निराळे तर्क चालू असत. विष्ण्याच्या मताप्रमाणे तो सागवानाजवळच्या वारु-ळात राहत असावा; बापूच्या मताप्रमाणे तो आगराजवळच्या उंबरावर राहत असावा; माझा अंदाज अजिबात निराळा होता; तो शिताकाकूंच्या देवघरातल्या पोकळ भिंतीत राहत असावा याबद्दल मला संशय नव्हता. आगरातल्या विहि-रीचे काढण्याने पाणी ओढीत असताना आमचे तर्कवितर्क सुरू असत. मग आपला शूरपणा इतरांना पटविण्यासाठी प्रत्येकजण आपण पाहिलेल्या सापाची एखादी ठाकी सांगे... गेल्या वर्षी आमच्या गोठ्याजवळ लखू टुकरुलाने एक केवढातरी साप मारला होता. तो अर्धमेला झाल्यावर आम्ही पोरांनी त्याची टकली दगड मारून मारून पार चेचून टाकली होती. कारण टकली शाबूत

राहिली तर तो पुन्हा जिवंत होण्याची भीती असते आणि मग तो चावल्या-शिवाय दावा सोडीत नाही असे आम्ही ऐकले होते. साप मारला त्याच दिवशी आमच्याकडे सिधंभडजी आले होते आणि त्या मेलेल्या सापावर जानवी जोड घालून त्यांनी त्याचे दहन केले होते...तो सर्व प्रसंग अशा वेळी मी मोठ्या हिमतीने इतर मुलांना सांगत असे. विष्ण्या वैशंपायन जवळपास असला म्हणजे काकूंच्या आगरातसुद्धा आम्ही या सर्व गोष्टी बोलू शकू. मग आम्ही सापाला साप म्हणू; नाहीतर सापाऐवजी 'थोरला' हा शब्द वापरणेच अधिक मुत्सद्देगिरीचे वाटे. विष्ण्याच्या वात्रट बोलण्यात इतरांची भीती कमी करण्याची एक चमत्कारिक शक्ती होती. पण तो स्वतः फार शूर होता असे नव्हे; इतरांप्रमाणेच तो सुद्धा काकूंच्या आगरात कधीही लवकरीला बसत नसे!... आम्ही सारेच त्या राखणदाराला दबकून होतो; आणि तो प्रत्यक्ष मात्र कुणालाच दिसलेला नव्हता.

पण राखणदार प्रत्यक्ष दिसला नाही तरी तो स्वप्नात हटकून दिसायचा... नको तिथून एकदम पुढे यायचा...मांडवावरची पडवळे काढताना हळूच हाताला विळखा घालायचा...पारंब्यांवरून सरकत खाली येऊन डोक्यावर झेप घ्यायचा... ब्रह्मदेवाजवळच्या कोंडीजवळचे केवडे काढताना नकळत हातात वळवळायचा... कधी दावा धरून मागे लागायचा आणि मी ठेच लागून पडे-पर्यंत पाठ सोडायचा नाही. या असल्या भयंकर स्वप्नांनी मी त्या वेळेला पछाड-लेला होतो. पण असली स्वप्ने मलाच पडत असे नव्हे. एकदा बापूलाही राखण-दाराचे एक चमत्कारिक स्वप्न पडले. सकाळी तोंड धुता धुता तो मला सांगू लागला, 'अरे मला रात्री एक भलतेच स्वप्न पडले! शिताकाकूंचा आगरातला राखणदार विहिरीत पडला; आणि शिताकाकू विहिरीजवळच्या पाथरीवर बसून ओक्साबोक्सी रडत्ये आहे.' काय योगायोग असेल कुणाला ठाऊक; बापूचे हे स्वप्न ऐकल्यानंतर तो राखणदार माझ्या स्वप्नात पुन्हा कधीच आला नाही!

वीणा : दिवाळी

# एका खिळ्याचा क्रूस

आज मी नकळतच एका असहाय विचाराच्या आहारी गेलो. जे करू शकलो त्याऐवजी जे करू शकलो नाही, तेच पुनःपुन्हा आठवू लागलो. थोडक्यात म्हणजे मला निराशावादाचा एक जबरदस्त झटका आला. आशावादी आणि निराशावादी यातला मुख्य फरक हाच असतो. आपल्याला जे मिळाले, त्याची आठवण ठेवणारा मनुष्य आशावादी बनतो; आणि आपल्याला जे मिळाले नाही त्याचेच चिंतन करीत बसणारा निराशावादी ठरतो. म्हणूनच आज सुमारे तास दीडतास मी संपूर्ण निराशावादी होतो! मी सॉक्रेटिससारखे समर्पण केले नाही; अलेक्झांडरसारखा दिग्विजय केला नाही; कांटसारखा तत्त्वज्ञ झालो नाही; आइनस्टाइनसारखा शास्त्रज्ञ झालो नाही; शेक्सपिअरसारखी नाटके लिहिली नाहीत. एवढेच काय पण यःकश्चित मराठी साहित्य संमेलनाचा अध्यक्षही झालो नाही; असे एकामागून एक अनेक नकार माझ्या डोळ्यासमोर नाच करू लागले आणि मला एकदम एक मोठा साक्षात्कार झाला. मला असे उमजले की, माझी सर्व शक्ती स्वयंपाकघरातील भिंतीला खिळे मारण्यात आणि नंतर ते उपटून काढण्यात खर्च झाली!

प्रत्येक संसारी माणसाला हा साक्षात्कार केव्हा ना केव्हा होत असला पाहिजे. ज्याला तो होत नाही त्याची संसारसाधना अजून पूर्णावस्थेला पोहोचली नाही असेच समजले पाहिजे. सबंध संसारातील कृतार्थतेचा क्षण तो हाच. त्याच वेळी आपल्या बायकामुलांसाठी आपण केवढा अचाट त्याग करून बसलो आहो,

याची जाणीव तो स्वतःला करून देऊ शकतो; आपल्या अपयशाला त्याच वेळी यशाचे बाळसे चढते आणि नियतीशी भांडत बसण्याचे कारण उरत नाही. आपल्या सर्व आशाआकांक्षांनी स्वयंपाकघरातील एका इवल्याशा खिळयाच्या क्रूसावर बलिदान केलेले असते. स्वयंपाकघरातील भिंतीला खिळे मारण्यातच माझी सर्व शक्ती कामी आली हे समजल्याबरोबर मला एकदम हलके हलके वाटू लागले. कृतार्थतेची एक लाट माझ्या मनावरून वाहत गेली आणि माझ्या टेबलावरील कांट व आइनस्टाइन यांच्या पुस्तकांकडे मी ताठ मान करून पाहू लागलो.

स्वयंपाकघरातील कॉंक्रीटच्या भिंतीला यापैकी किती महापुरुषांनी खिळे मारले होते ?

आज सकाळपासून मी त्याच एका अवाढव्य उद्योगात गुंतून गेलो आहे. वरवर पाहणाऱ्या सहानुभूतिशून्य माणसाला एका ठिकाणचा एक खिळा काढून तो दुसऱ्या ठिकाणी ठोकणे ही गोष्ट अगदीच मामुली स्वरूपाची वाटेल. पण हा खिळा उपटून काढणे म्हणजे माझ्या मनातला एक विचारच उपटून काढण्यासारखे आहे. अनेक गोष्टींचा तारतम्याने विचार करून हा खिळा मी त्या ठिकाणी पूर्वी केव्हा तरी मारलेला होता. माझी सगळी सांसारिक प्रतिष्ठा त्या खिळयामध्ये सामावलेली आहे. हौशी सुतारकामाचा तो एक विक्रम असल्याचे मी स्वतःशी समजत आलो आहे. आणि आता तो खिळा माझ्याच हातांनी उपटून टाकण्याचा घरातल्या माणसांनी व्यूह रचला आहे. आरशासाठी म्हणून हा खिळा भिंतीमध्ये मारताना मी किती विचार केला होता, केवढे परिश्रम घेतले होते आणि सरतेशेवटी तो खिळा भिंतीत स्थानापन्न झाल्यावर केवढे घवघवीत समाधान मिळवले होते, याची थोडी जरी कल्पना त्यांना असती तरी त्यांनी हा उठाव केला नसता. पण हा खिळा उपटून काढताना मला होणाऱ्या यातनांची कल्पना प्रत्यक्ष बुद्धालाही करता येणार नाही. त्याकरता त्याने हातोडी घेऊन कॉंक्रीटच्या भिंतीत स्वतः एक खिळा मारला पाहिजे !

‘ हातोडी घेऊन ’ हा शब्दप्रयोग थोडा चुकीचाच आहे. हातोडी घेऊन खिळा मारतो त्या प्राण्याला सुतार म्हणतात. माझे सर्व घरगुती सुतारकाम सुताराच्या हत्यारांशिवायच चाललेले असते. सामान्य साधनांनी असामान्य गोष्ट करून दाखविणे म्हणजेच ‘ जीनिअस ’ अशी एक व्याख्या कोणातरी पंडिताने केलेली आहे. त्या दृष्टीने विचार केल्यास माझे सर्व काम त्या पातळीवरच चाललेले असते ही गोष्ट तुम्हाला एकदम मान्य करावी लागेल. हातोडी घेऊन खिळा मारण्याइतक्या सर्वसामान्य पातळीवर मी कधीच उतरत नाही. हा खिळा मारताना मी स्वयंपाकघरातील आयुधांशिवाय दुसरे कोणतेही हत्यार वापरलेले नव्हते. हातोड्याची जागा खलबत्त्यातील बत्त्याने घेतलेली होती आणि गावीची जागा स्वयंपाकघरातील चिमट्याने घेतलेली होती. याशिवाय प्रसंगानुसार पळीचा दांडा, भाकरीचा उलथा वगैरे मंडळी मी आळीपाळीने वेठीला धरीत होतो. ज्या दिवशी हा खिळा स्थानापन्न झाला त्या दिवशी नेहमी अकराच्या सुमाराला होणारे जेवण दुपारी दोनपर्यंत लांबले होते या एकाच गोष्टीवरून ही गोष्ट सिद्ध होऊ शकेल. त्यानंतर लवकरच मला दुसरा एक नवा चिमटा आणावा लागला. ही गोष्टही मी विसरू शकत नाही. पण शारीरिक श्रमाचा भाग मी एका दृष्टीने गौण मानतो. माझी मुख्य तक्रार माझे सर्व बौद्धिक श्रम फुकट गेले ही आहे. आरशाचा खिळा मारणे ही गोष्ट वाटते तितकी साधी नाही. ज्या घरात नवराबायकोंच्या उंचीमध्ये एका मुलाच्या उंचीइतका फरक असतो त्या घरात तरी सर्वांचे समाधान होईल अशा ठिकाणी आरशाचा खिळा मारणे ही गोष्ट अद्‌भुत समजली पाहिजे ! असा खिळा मारला जातो त्याच ठिकाणी संसाराचा सुवर्णमध्य असतो. त्या आरशात पाहून बायकोला कुंकू लावता येईल व आपल्यालाही अगदी ओणवे न होता आपली दाढी करण्याची शक्यता राहील, अशा दोन्ही गोष्टी एकदम साधाव्या लागतात. शिवाय सर्व प्रकारच्या बालक्रीडांपासून तो आरसा सुरक्षित राहील याचीही दक्षता घ्यावी लागते. ज्याच्या घरातील सगळी माणसे सारख्याच उंचीची आहेत, असा भाग्यवान पुरुष कधी कुठे असलाच तर त्याच्याइतका सुखी माणूस जगात दुसरा सापडणार नाही. पण या भाग्यवान माणसाचा हेवा करीत बसायलाही सांसारिक माणसाला सवड उरलेली नसते. एक दिवस ‘ आरशासाठी खिळा मारा ’ असा

एक अनिवार्य हुकूम त्याच्या कानावर आदळतो आणि मग आपले सर्व बौद्धिक चातुर्य पणाला लावून त्याला त्याचे प्रातकर्म करावे लागते. आपल्या आयुष्यातील सरासरीचे शेवटचे गणित बरोबर सोडवल्याशिवाय त्याला हा आरशाचा खिळा मारता येत नाही.

मुलांच्या कंपासपेटीतील कर्कटकापासून तो स्वयंपाकघरातील बत्त्यापर्यंत सर्व साधनांनिशी आपण ज्या वेळीं हे महान साहस करायला प्रवृत्त होतो, त्या वेळीं सांसारिक माणसाच्या चिवट आशावादावाचून दुसरी कोणतीही शक्ती आपल्या पाठीशी उभी नसते. पूर्वीच्या खिळ्यांनी भिंतीला पाडलेली भोके (आपले शत्रू त्यांनाच भगदाडे म्हणतात.) आणि तीं बंद करण्यासाठी त्यात आपण ठोक-लेली औषधाच्या बाटल्यांची बुचे ही आपणाला आपल्या पूर्वीच्या अपयशाची आठवण करून द्यायला टपलेली असतात. सरासरीच्या गणिताप्रमाणे आपण पूर्वनिश्चित केलेली मोक्याची जागा अशाच एका आगांतुक भोकाने अगोदरच ढिसाळ केलेली असते आणि आपण खिळ्याच्या डोक्यावर बत्त्याचे एकदोन दणके मारताच, या दोन्ही भोकांना सांधणारी एक दरी हळूहळू प्रगट होऊ लागते. सर्व संभाव्य संकटांची दखल घेणारा सेनापती ज्याप्रमाणे युद्धाची कल्पनाच सोडून देण्याची शक्यता असते, त्याचप्रमाणे या दरीतून काय निर्माण होईल, याची चिकित्सा करणारा माणूस भिंतीत खिळा मारण्याचा प्रयत्न सुरुवात करण्यापूर्वीच सोडून देत असतो. पण सांसारिक माणूस हा कसलेल्या सेनापतीपेक्षाही अधिक चिवट असतो. त्याचा दैववाद हा त्याच्या आशावादाला पूरक ठरतो. स्वयंपाकघरातले खिळे मारणारा माणूसही त्या अनुभवातून शेवटी काही शिकत असतो. खिळा मारून झाला, की तो घट्ट बसला की नाही हे हलवून पाहण्याचा प्रयत्न तो सहसा करीत नाही! तो त्याचा हवाला दैवावर सोपवतो. दैवानेच तिडे धरले असेल तर कोणताही खिळा कोणात्याही भिंतीमध्ये घट्ट बसणे शक्य नाही, हे त्याला उमजलेले असते.

—आणि आता तो खिळा तिथून काढून मी दुसरीकडे मारावा, असा दबाव आणला जात आहे. बिचाऱ्याने असे पाप तरी काय केले! दांडीवरून पातळ

काढताना या खिळयामुळे ते फाटते, असा त्याच्यावर आरोप आहे. गुन्हा इतका सामान्य आणि शिक्षा मात्र हद्दपारीची !

पण खिळयांच्या नशिबी असले हौतात्म्य पूर्वीपासूनच लिहिलेले आहे. ख्रिस्ताला वधस्तंभावर जायबंदी करताना त्याच्या हातापायाला हे खिळेच ठोकलेले होते. तेव्हापासून एकाच वेळी दोन युगे सुरू झाली – एक ख्रिस्ताचे आणि दुसरे खिळयांचे. यापुढे खिळे ठोकणारा कोणताही मनुष्य ख्रिस्ताला विसरू शकत नाही. माझ्यासारख्या नास्तिकाला सुद्धा ती आठवण अस्वस्थ करते. क्षणभर का होईना, सगळे चराचर सचेतन झाल्याचा भास होतो. आपण मारतो आहो तो खिळा आणि ती भिंत जड आहेत, ही गोष्ट आपण विसरून जातो. आपण हाणलेल्या प्रत्येक ठोक्यामधून उठणारा हुंकार दोन हजार वर्षांचे अंतर कापून आपल्या काळजात शिरू पाहतो. अशा वेळी भिंतीने पाणी मागितले तर मला बिलकुल आश्चर्य वाटणार नाही; आणि माझे हात त्या खिळयाला टांगण्यासाठी फार तर ख्रिस्ताची तसबीरच उचलू शकतील.

पण आधुनिक जीवनाची खरी शोकांतिका हीच आहे. त्या खिळयाला एक आरसा टांगल्याशिवाय कोणत्याही माणसाला सुखाने संसार करणे केवळ अशक्य आहे.

मायबोली : दिवाळी १९६३

...ालय, ठाणे
७७३५ ... दि:
७६०८

# पुरुष आणि पिशव्या

हातात पिशवी घेऊन बाजारात चाललेला पुरुष पाहिला की, माझे मन अजूनही एका खिन्न विचाराच्या आहारी जाते. पुरुषी अहंभावाचे शेवटी हे 'असे' होते! पुरुषाला माणसाळवण्याच्या पुष्कळ पद्धती आहेत; पण ज्या वेळी त्याचे पंख कापून त्यांचीच एक पिशवी शिवली जाते आणि ती पिशवी हातात घेऊन तो मुकाट्याने बाजाराची वाट चालू लागतो, त्या वेळीं त्याच्या कण्याचे अक्षरशः अळू होते!

पुरुषी जीवनाची खरी शोकांतिका ही की, आपण केव्हा माणसाळतो हे त्याचे त्यालाच उमगत नाही! विद्यार्थी असताना दुर्दम्य वाटणारे पुष्कळ तरुण नोकरीसाठी घडणाऱ्या प्रत्येक मुलाखतीबरोबर हळूहळू नरम येऊ लागतात. जे कोणी यातून निभावतात ते बहुधा ऑफिसातल्या खुर्चीबरोबर सती जातात! पण काही पुरुष एवढ्याने माणसाळू शकत नाहीत. त्यांचा अहंभाव मोठा हेकट असतो. आयुष्यातील प्रत्येक प्रतिकूल अनुभवाबरोबर तो अधिक बेडर बनतो. अपमान चघळून चघळून त्यांच्या दातांना अधिक धार येते. अपयशामुळे ते आर्जवी व सहनशील बनत नाहीत, ते अधिक आग्रही व दुराराध्य बनतात. माणसांच्या प्रतिक्रियेमध्ये एक प्रकारची अनाकलनीयता नेहमीच गृहीत असते. ज्यामुळे 'शिणलेल्या हेतूंचे शेण' व्हावे त्यामुळेच काहींच्या बाबतीत 'शिणलेल्या हेतूंचे विंचू' होतात! खरे म्हणजे या दोन प्रतिक्रिया वाटतात तितक्या भिन्नही नाहीत. शेणात दही मिसळले की विंचू होतात, अशी एक खेडवळ

समजूत आहे !

एखादा पुरुष माणसाळण्यापलीकडचा आहे की नाही, हे ठरविण्यापूर्वी आपणाला त्याच्या आयुष्यातील आणखी एक अपघात विचारात घ्यावा लागेल. पुरुषाला माणसाळवण्याच्या एका प्रमुख विधीलाच लग्न हे नाव दिलेले आहे ! लग्न न करताच आपण माणसाळण्याच्या पलीकडचे आहो, असा गर्व कोणत्याही पुरुषाने धरू नये. तो एक फार मोठा भ्रम ठरेल. लग्नापूर्वी पुरुष प्रेमात असतो, असे म्हणण्यापेक्षा तो भ्रमात असतो, असे म्हणणेच अधिक योग्य होईल ! लग्नामुळे घडणारे स्थित्यंतर महाभयंकर असते. लाजाळूचे झाड असलेली मुलगी 'पत्नी' झाल्याबरोबर सर्कशीतल्या रिंगमास्तरप्रमाणे हुकूम करू लागते, आणि सिंहाप्रमाणे गर्जना करणारे पुरुष मुकाट्याने हातात पिशव्या घेऊन बाजाराची वाट चालू लागतात ! लग्नानंतरही जे माणसाळत नाहीत तेच तेवढे खरे पुरुष ; बाकी सगळे 'पुरुश' ! लग्न होईपर्यंत प्रत्येक पुरुषाला आपण असामान्य आहो, असा भ्रम असतो. रंगाशी खेळत बसणाऱ्या प्रत्येक तरुणाला आपण पिकॅसो होणार याबद्दल तिळमात्र संशय नसतो; शब्दक्रीडा करणाऱ्या प्रत्येक कवीला स्वतः शेक्सपीअर होण्याची स्वप्ने पडत असतात; आणि गणेशोत्सवातील प्रत्येक अविवाहित वक्त्याला टिळकांचे उर्वरित कार्य आपल्या खांद्यावर पडणार, याची स्पष्ट जाणीव असते.

पण लग्न झालेला मनुष्य या सर्व जबाबदाऱ्या हळूहळू अंगाबाहेर टाकू लागतो ! स्वतःवर लादलेल्या आदर्श जीवनाच्या एका महान स्वप्नातून विवाहित मनुष्याला स्वतःची मोठ्या सफाईने सोडवणूक करून घेता येते. सामान्य माणसाच्या दृष्टीने यातच लग्न या विधीचे साफल्य आहे. आपल्या स्वाभिमानाला विशेष धक्का न लावता ही मुक्तता साधून घेणे त्याला शक्य असते; कारण हे तो स्वतःसाठी करीत नसतो. प्रथम हे त्याला पत्नीसाठी करावे लागते आणि नंतर मुलांसाठी ! आदर्श जीवनाचे स्वप्न सोडून व्यावहारिक पातळीवरील जीवनाचा स्वीकार करीत असताना हे आपण आपल्या कुटुंबासाठी करीत आहो, अशी तो स्वतःची समजूत घालू शकतो. आयुष्यातील भोगांना त्यागाची

टोपी घालूनच तो त्यांचा स्वीकार करीत असतो. स्वतःची फसवणूक करण्याची थोडीतरी कला प्रत्येक सामान्य माणसाजवळ असावीच लागते; नाहीतर लग्नापूर्वीची ती जुनी घोषवाक्ये भुतासारखी त्याला पछाडू लागतील! लग्न झाल्याबरोबरच ही कला प्रत्येक पुरुषाला अवगत होऊ लागते. मुलांनी घरभर रंगपंचमी करायला सुरुवात केली की पुरुषाला पिकॅसो विसरणे फारसे कठीण जात नाही. शे-दोनशे रुपयांमध्ये संसाराची सुखान्तिका करू पाहणाऱ्या माणसाला शेक्स्पीअरच्या शोकान्तिका थोड्या प्रदीर्घ वाटू लागतात; पॉलोनिअसची पोपटपंची हीच त्याला हॅम्लेटच्या महावाक्यापेक्षा अधिक चिंतनीय वाटते. गणेशोत्सवात व्याख्याने देण्यापेक्षा गणेशोत्सवाला लागणारे सामान खरेदी करून आणण्याचे काम तो अधिक आनंदाने स्वीकारू लागतो!...आणि हे सगळे तो संसारासाठी करीत असतो. स्वतःसाठी नव्हे. पुरुषी अहंभाव हा इतका चिवट असतो! आपण स्वतःसाठी माणसाळलो नाही, असे समजण्यातही त्याला समाधान मिळते.

लग्नापूर्वी आपण जसे होतो तसेच अजूनही आहो, असे सांगण्यात काही पुरुषांना एक विकृत समाधान लाभत असावे. असामान्यत्वाची ऐट आणणारा सामान्य माणसांचाच हा आणखी एक प्रकार आहे. आपण कशानेही बदलत नाही, असे म्हणताना ते स्वतःवर व आपल्या पत्नीवर एक फार मोठा अन्याय करीत असतात. जी पुरुषाला बदलू शकत नाही ती खरी पत्नीच नव्हे! आणि माणूस कितीही सामान्य असला तरी आपल्या परीने तो जिवंत असतो. बदलणे हेच जर जिवंतपणाचे मुख्य लक्षण असेल तर सामान्य मनुष्य हाच असामान्य माणसापेक्षा अधिक जिवंत असतो असे म्हणावे लागेल! महापुरुष बदलत नसतात; ते बदलीत असतात. म्हणूनच चिरयौवन ही गोष्ट देवांना शोभून दिसते. माणसांनी मात्र म्हातारे होण्याची कला हलके हलके आत्मसात केलेली बरी. ह्या कलेचे प्राथमिक पाठ प्रत्येक पुरुष आपल्या पत्नीपासूनच घेत असतो. लग्नानंतर आपण बदललो नाही असे म्हणणे म्हणजे आपल्या पत्नीचा सर्वांत मोठा उपमर्द करणे होय. या एका सबबीवर एखाद्या बाईने घटस्फोट मागितला तर मी तरी तिला दोष देणार नाही...लग्नानंतर पुरुषाला दिसणारे जग हे

अगदी निराळे असते. तो अभागी असला तर त्याला ते दीड डोळ्याने पाहावे लागेल; तो भाग्यवान असला तर त्याला तीन डोळे उपलब्ध होतील; पण दोन डोळ्यांनी दिसणारे पूर्वीचे जग त्याला पुन्हा दिसणार नाही!

मला वाटते, महापुरुषांच्या ऐतिहासिक कार्याचे या दृष्टिकोनातून पुनर्मूल्यन करणे आवश्यक आहे. "लग्नानंतरही त्यांचा ध्येयवाद टिकून राहिला" या एका वाक्यामध्येच सर्व असामान्यत्व साठवलेले आहे. बाकीची सर्व कर्तबगारी ही दुय्यम स्वरूपाची मानली पाहिजे. बोहल्यावरून पळून जाऊन मग इतरांना दासबोध सांगणाऱ्या रामदासांविषयी मला फारसा आदर वाटू शकत नाही. तुकारामाविषयी मला अधिक आदर वाटतो. मात्र तो सदेह स्वर्गाला गेला, किंवा त्याच्या पोथ्या पाण्यावर तरंगल्या, ही त्याच्या आयुष्यातली खरी अद्भुत गोष्ट नव्हे. एका खाष्ट बायकोशी संसार करीत असता तो काळ्यावर पांढरे करू शकला, हाच मुळी खरा चमत्कार आहे! म्हणूनच शेक्सपीअरच्या वाङ्मयीन कर्तब-गारीचा आढावा घेताना त्याने आपल्या वयाच्या अठराव्या वर्षीच चोवीस वर्षे वयाच्या एका प्रौढ बाईशी लग्न केले होते ही गोष्ट सांगायला मी विसरत नाही; आणि डॉ. जॉन्सन या इंग्रजीतील आद्य कोशकाराची चिकाटी व धैर्य यांचे वर्णन करताना त्यानेही आपल्याहून दुप्पट वय असलेल्या एका पोक्त बाईशी विवाह केला होता, ही गोष्ट मी आवर्जून सांगतो. या दृष्टिकोनातून विचार करू लागले म्हणजे सॉक्रेटिस हा बुद्धापेक्षा अधिक धीरगंभीर वाटू लागतो. बुद्धाच्या ध्यानमग्न मूर्तीपेक्षा यशोधरेचे खोल गेलेले डोळेच माझे मन अधिक अस्वस्थ करतात; आणि मग सगळे धम्मपद बोबडे बोलू लागते! कजागिणेशी संसार करीत अंतिम वास्तवाचा शोध घेणारा सॉक्रेटिस अधिक खंबीर वाटतो. महापुरुषाचे मुख्य लक्षण हे की, तो लग्नानंतरही दशांगुळे उरू शकतो!

पण सामान्य माणसाच्या बाबतीत मात्र "पुरुषाची धाव लग्नापर्यंत" हे त्रिकालाबाधित सत्य आहे. हे सत्य नेहमी दुसऱ्या माणसाला सांगत असावे; म्हणजे केव्हातरी ते आपल्याही लक्षात येण्याची शक्यता असते! निदान तो दिवस सामान्य माणसाने कधी विसरू नये. बिऱ्हाड थाटल्याबरोबर एक दिवस

असा उजाडतो की, आपली पत्नी एक पिशवी आणून आपल्या हातात देते, आणि " हिंग, जिरे, मीठ, मिरची " घोकीत आपण हळूहळू जिन्याच्या पायऱ्या उतरू लागतो...खाली खाली जाणारा तो जिना शेवटी कुठे संपतो, याची पुरेशी कल्पना अजून कोणत्याच पुरुषाला आलेली नाही !

साधना : दिवाळी १९५८

# तू वहातो आहेस

तू वाहतो आहेस. ही छत्री अशी घट्ट पकडून ठेवलीस म्हणून काय तू वहावयाचा थांबणार नाहीस ! हा सबंध रस्ताच वाहतो आहे. इथे लव्हाळे सुद्धा वाचत नाहीत. ऑफिसची वेळ झाली की सगळे आपापल्या वेगाने वाहू लागतात. फोर्टकडे. नऊ वाजल्यापासूनच गल्लीबोळातले गढूळ पाणी फोर्टकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर एकवटू लागते. सगळ्या गल्ल्या या गंगेमध्ये वितळतात.

या गंगेच्या तोंडाला हे डांबर कोणी फासले ? ते कोणी मुद्दाम फासलेले नाही; ऑफिसकडे जाताना प्रत्येक माणूस एकदा तरी तोंडघशी पडतो; मग त्याचे तोंड रस्त्याला लागते. माणसांची तोंडे लागून लागून हा रस्ता शेवटी डांबरी बनतो. हे श्रेय आपलेच आहे; या रस्त्यावरून वाहणाऱ्या सगळ्या माणसांचे.

चाळीतले सफेद कपडेही या रस्त्यावरून वाहत जातात. सुरुवातीला काहींची इस्त्री शाबूत असते, काहींची कॉलर ताठ दिसते, खिशातले पाकीट आपला डोळा मिचकावीत बसते... पण शेवटी व्हायचे तेच होते. कल्याणजी भिवजीच्या डगमगत्या चाळीतून काळपट धोतरे, लेंगे, बुशकोट यांची एक मोठी लाट मुख्य रस्त्यावर पसरू लागते. बघता बघता त्याचा एक मोठा लोंढा होतो. ह्या काळपट लाल लोंढ्यात सफेद संस्कृतीचे ते शेवटचे अवशेष बुडून जातात. काही कपडे शेवटपर्यंत न भिजण्याची पराकाष्ठा करतात. एक म्हणतो, 'मी फाटेन, पण भिजणार नाही.' दुसरा म्हणतो, 'मी भिजेन, पण रंग बदलणार

नाही. ' गल्लीतून वाहत असताना त्याची ही वटवट सुरू असते; पण हमरस्त्यावरील प्रवाहामध्ये शेवटी सगळे एकाच दिशेने वाहू लागतात. ती दिशा फोर्टची असते. दहा वाजण्याच्या वेळेला कपड्यांचा एक प्रचंड प्रवाह फोर्टच्या दिशेने वाहत असतो.

ह्या दिशेचे नाव काय? हा प्रश्न द्रोणाचार्यांना विचारण्यासारखा होता. कदाचित त्यांनीच या दिशेचे खरे नाव सांगितले असते! कदाचित कृपानेही सांगितले असते; पण त्याची खात्री नाही. द्रोणाचार्यांनी मात्र स्वतः या दिशेने प्रवास केला होता. त्यांनी या दिशेचे नाव अचूक सांगितले असते... ही एक ' पोट ' दिशा आहे. कोणी हिला अकरावी दिशा असेही म्हणतात. अश्वत्थामा या दिशेनेच घराबाहेर पडला.

बुटामध्ये आपले पाय घट्ट बांधून या हमरस्त्यावर स्थिर राहण्याचा तू प्रयत्न चालवला आहेस! बाबा, असे काही करू नको. हा रस्ता वाहणाऱ्यांचा आहे. इतर सगळे वाहत असताना एकट्याने स्थिर राहणे फार भयंकर आहे. अशा वेळीं स्थिर राहूनच भोवळ येते. त्या जवळच्या झाडाकडे पाहून हसू नको. भोवळ आली तर त्या झाडाचा आधार तुला पुरणार नाही. आधारासाठी हात टेकलास तर ते झाड धावू लागेल... एकदा स्वप्नामध्ये या फोर्टकडे जाणाऱ्या रस्त्यांवरून एक झाड धावत असताना तू पाहिले होतेस. त्या प्रसंगाची आठवण कर. त्या वेळीं सगळी माणसे दगडासारखी स्थिर होती; आणि फक्त एक वेड लागलेले झाड धूम ठोकीत फोर्टच्या दिशेने पळत होते. त्या धावणाऱ्या झाडाचे रस्त्यात पडलेले फळ तू खाल्ले होतेस ना? म्हणून म्हणतो त्या प्रसंगाची आठवण कर आणि प्रथम या प्रवाही गर्दीत मिसळून जा. वाहायला लाग. इथे सगळेच वाहते आहे. रस्ता वाहतो आहे; माणसे वाहती आहेत; आणि ह्या माणसांची मनेसुद्धा.

पण रस्त्याच्या मध्यावर मुद्दाम मोडून पडलेल्या त्या रेती वाहणाऱ्या ट्रकाने मात्र या सर्व तत्त्वज्ञानाविरुद्ध शेवटचे बंड उभारले आहे. त्याला काय रस्त्याच्या

बाजूला जाऊन पडता आले नसते ? पण तो मुद्दामच रस्त्याच्या मध्यावर बैठक मारून बसला आहे. आता तो उठणार नाही. पुन्हा उठण्याची इच्छाच त्याच्याजवळ उरलेली नाही. ड्रायव्हरने जॅकस्क्रू लावून ते मोडलेले चाक अधांतरी उचलले आहे. पण हे सगळे फुकट आहे. इतर वाहनांची गती पाहून आपल्याला भोवळ येऊ नये म्हणून त्याने प्रथम आपले डोळे फोडून घेतले आहेत. पाठीवरून वाहून नेलेल्या सर्व रेतीचा एक भला मोठा डोंगर त्याच्या त्या फुटक्या डोळ्यांना दिसतो आहे. त्याला आता दुरुस्त होण्याची इच्छाच उरलेली नाही. त्याची आता एकच वासना शिल्लक उरलेली आहे. फक्त विलयाची वासना. 'वाहण्या'पासून 'विलया'पर्यंतचा प्रवास त्याने आता पुरा केला आहे. डोंगरांच्या बोगद्यातून अंधाराची सहस्र आवर्तने केल्यावर लाभलेले हे शेवटचे धैर्य आहे... पण हे धैर्य प्राप्त होण्यापूर्वी रेतीच्या वजनाखाली कणा वाकावा लागतो. आणि यंत्रामधूनसुद्धा नेहमीच्या आवाजाशी विसंगत असा एक वेगळाच ध्वनी निघावा लागतो.

...तुझ्या छातीला तुझा कान लाव. मान मोडण्याची भीती नको! माणसाची मान मोठी चिवट असते. पण वाहत्या रस्त्यावर स्थिर राहण्याचा प्रयत्न करण्यापूर्वी तुझ्या छातीला तुझा कान लाव. का, भितोस का ?

या वाहणाऱ्या वाटेवरूनच अश्वत्थामा घराबाहेर पडला आणि तेव्हापासून जखमेसारखा हा रस्ता वाहतो आहे. ही अश्वत्थाम्याची जखम आहे. अश्वत्थाम्या, ते पाव छटाक तेल तुला अजून कसे मिळाले नाही ? ख्रिस्ताच्या दुकानात नाही मिळाले तर बुद्धाच्या बघ. कुठेच मिळाले नाही तर मी सांगतो तिथे जा. फॉकलंड रोडच्या पिंजऱ्यांना प्रदक्षिणा घालून सरळ फोरास रोडकडे वळ. तिथे पहिल्याच उघड्या दारावर टिचकी मार. टिचकी मारताना तोंडाने म्हण, "तिळा तिळा, दार उघड." मग कोणीतरी आपल्या मिणमिणत्या दिव्यातले अर्धे रॉकेल तुला देईल. त्यातले अर्धे जखमेला लाव, उरलेले अर्धे हाताला लावून आवाज कर. तो ओंकाराचाच प्रतिस्पर्धी समज. अश्वत्थाम्या, तू ह्या दोघांची भेट पाहिली आहेस का ? तो सोहळा पाहीपर्यंत तुला या रस्त्यातून

पुनःपुन्हा वाहावे लागेल.

वाहणाऱ्या माणसांना सुद्धा घड्याळे लागतात! वाहता वाहता प्रत्येकजण आपण किती वेगाने वाहतो याचा अंदाज घेत असतो. पण घड्याळेसुद्धा आपल्या कलाप्रमाणे वाहतच असतात. घड्याळाचे काटे तबकडीवरून रस्त्यात उतरतात आणि चालू लागतात...ते आपल्या चालण्याचीच नक्कल करीत असतात; पण त्यांची विदूषकी आपल्या लक्षात येत नाही. आपल्या मनगटानुसार आपले घड्याळ कमीजास्त वेगाने चालत असते. मनगटावरचे घड्याळ छातीतल्या घड्याळाला खिजवीत असते...या दोन घड्याळांनी मोजली जाणारी दोन अगदी निरनिराळी आयुष्ये रस्त्यावरून वाहणारी माणसे जगत असतात. ही दोन्ही आयुष्ये एकदमच संपण्याचे भाग्य फार थोड्यांना मिळते. संपण्याचे किंवा संपविण्याचे. नाही तर कोणते तरी एक अगोदर संपते आणि एक नंतर. पण काही वेळा याहूनही भयंकर गोष्ट घडून येते. ही दोन्ही आयुष्ये संपली तरीसुद्धा माणूस शिल्लक उरतो. आपण मेलेले आहोत ही गोष्ट त्याच्या लक्षातच येत नाही! वाहणाऱ्या माणसांचे पुष्कळदा असेच होते.

वाहणारा रस्ता...पृथ्वीच्या पाठीवर हा असा लांबलचक ओरखडा प्रथम कोणी ओढला? त्याची ही अशी सतत वाहणारी जखम केव्हापासून झाली? आणि तिच्यातून तू हा केव्हापासून वाहायला लागलास? आकाशगंगेच्या तीरावर पहिले-वहिले स्वच्छ स्नान करताना या यक्ष-प्रश्नांची उत्तरे तुला द्यावी लागतील...

तोपर्यंत तू वाहत राहशील...

तू म्हणजेच मी.

दिवाळी १९६०

# शेवटचे स्वातंत्र्य

माणसाचे पहिले स्वातंत्र्य कोणते हे सांगणे कठीण आहे; पण फसण्याचे स्वातंत्र्य हे त्याचे शेवटचे स्वातंत्र्य होय याबद्दल मला आता संशय उरलेला नाही. बाजारात जाणाऱ्या प्रत्येक माणसाला निदान फसण्याचे स्वातंत्र्य तरी असले पाहिजे! ज्या पुरुषाला हे स्वातंत्र्य राहिलेले नसेल त्याने आयुष्यातले शेवटचे स्वातंत्र्य गमावले असे समजायला हरकत नाही.

स्वातंत्र्याची किंमत ते गेल्यानंतरच कळू शकते—आणि मला आता या स्वातंत्र्याची किंमत कळू लागली याचा अर्थच हा की मी ते जवळजवळ गमावून बसलो आहे. ते मी कसे गमावले?— खिशाच्या भोकातून गमावले की पिशवीच्या भोकातून गमावले?— याचा पुरा अंदाज मला कधीच लागणार नाही. स्वातंत्र्य मोठे चमत्कारिक असते. ते हत्तीच्या पाठीवरून येते आणि मुंगीच्या पाठीवरून जाते असे म्हणतात! ते केव्हा जाते हे कोणाला कळूच शकत नाही; आणि जे स्वातंत्र्य पाय वाजवीत जाते त्या स्वातंत्र्याला विशेष अर्थहि नसतो.

माणूस आपले स्वातंत्र्य गमावतो ते अगदी निराळ्या पद्धतीने. प्रत्येक यशस्वी व्यवहाराबरोबर तो ते हळूहळू गमावीत असतो. एक दिवस तो आपण होऊन भाजी आणायला जातो. एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत सबंध मार्केटची तपासणी करतो. भेंड्याची टोके मोडतो, दुध्या भोपळ्यात नखे रूतवतो,

वांग्यांची अदलाबदल करतो, दराची घासाघीस करतो, आणि शेवटी घरी आल्यावर आपण आणलेली भाजी अधिक ताजी व स्वस्त आहे अशी इतर माणसांची समजूत करून देतो.

पुन्हा केव्हातरी तो पत्नीबरोबर कापड खरेदी करण्याच्या कधीही न संपणाऱ्या मोहिमेत सहभागी होतो. आणि मग परत येताना आपण बरोबर नसतो तर ते जुनेच कापड दुकानदाराने तिच्या गळ्यात कसे बांधले असते हे तो तिला पटवून देतो. कधी तो स्वतःची जुनी छत्रीच हरवून बसतो, पण त्या वेळीही आपली नवी छत्री न नेण्यात आपण केवढा शहाणपणा केला याची तो इतरांना चांगली कल्पना देतो!

शेवटी एक दिवस असा उजाडतो, की त्याने आणलेले मोदकांचे नारळ सगळे एकजात कुजके निघतात! आणि त्या वेळी मात्र त्याला आपल्या पूर्व सुकृताचा साक्षात्कार घडतो! 'फसलो बाबा' म्हणून तो सारवासारवी करायचा प्रयत्न करतो; पण "तुम्ही असे कसे फसलात?" हे पत्नीचे शब्द त्याची पाठ सोडत नाहीत. त्या ठिकाणी सगळा जोर त्या 'तुम्ही' वर असतो. जणू काय त्याला फसण्याचा हक्कच नसतो. आपण व्यवहारदक्ष आहो हे सिद्ध करण्याच्या भरात त्याने हे आपले प्राथमिक स्वातंत्र्यच गमावलेले असते. 'तुम्ही असे कसे फसलात' या शब्दात त्याच्या सर्व शहाणपणाची शोकांतिका साठवलेली असते. गणपती गेला तरी हा उंदीर मागे राहतो!

खरे म्हणजे आपण मूर्खासारखे फसलो हे त्याला कबूल असते. पण वर्षभर शहाणपणाने संसार केल्यानंतर एक दिवस आपण मूर्खपणा केला तर त्याचा उच्चार पत्नीने सतत करीत राहू नये अशी त्या बिचाऱ्याची समजूत असते. त्याची अपेक्षा अगदीच अन्याय्य नसते; पण मनुष्यस्वभावाची घडण करताना निसर्गाने न्यायाच्या कल्पनेला विशेष प्राधान्य दिलेले दिसत नाही. वर्षभर न फसणाऱ्या माणसाला एकदम एका दिवसापुरतेच फसण्याचे स्वातंत्र्य मिळू शकत नाही. न वापरल्यामुळे माणसाच्या शेपटाप्रमाणेच त्याने आपले फसण्याचे

स्वातंत्र्यही गमावलेले असते !

आपण हे स्वातंत्र्य गमावून बसलो याची जाणीव झाली म्हणजे माणसाला फार एकाकी वाटू लागते. आपल्या शहाणपणाने आपला केवढा सूड घेतला याचा प्रत्यय त्याला त्या वेळीं येतो. परवापर्यंत जवळ वाटणारे आपले बालपण एकदम हजारो मैल दूर जाते. तारुण्यातला खळाळत वाहणारा अवखळपणा अचानक लुप्त होतो. आपण एका न संपणाऱ्या सरळ वाटेने जात आहो आणि आपली मान त्या विशिष्ट दिशेशी कायमची बांधली गेली आहे असा भयानक भास होऊ लागतो. आणि मग ती दिशा सत्याकडे नेणारी आहे या विचारातही काही समाधान मिळू शकत नाही. आपण न्याय्य असेल तेच केले पाहिजे, योग्य दिसेल तेच बोलले पाहिजे, सत्य असेल तेच शोधले पाहिजे अशा या एकाहून एक अवघड जबाबदाऱ्या आपल्या पाठीवर येऊन बसतात. आपण आपले फसण्याचे स्वातंत्र्य गमावले की या अंबाऱ्या आपल्या पाठीवर चढायला वेळ लागत नाही.अंबारी पाठीवर घेण्यात एक मोठा तोटा असतो. आपल्या स्वभावसिद्ध अशा लोळण्याच्या प्राथमिक सुखालाही तो माणूस पारखा होतो !

या सगळ्या शोकान्तिकेच्या मागे एक चुकीचे गृहीत तत्त्व असते. ' बायकांना न फसणारे नवरे आवडतात ' अशी पुष्कळ पुरुषांनी विनाकारण कल्पना करून घेतलेली असते. एका विशिष्ट वयात बहुतेक पुरुषांना हा भ्रम होत असतो. मनाच्या त्या भ्रान्त अवस्थेत ते आपल्या शहाणपणाची वारेमाप जाहिरात करीत सुटतात. आपले व्यवहारचातुर्य सिद्ध करण्याची एकही संधी ते फुकट घालवीत नाहीत. वस्तुतः आपला डळमळणारा आत्मविश्वास सावरून धरण्याचा त्यांचा तो एक दुबळा प्रयत्न असतो. स्त्रियांचा आंतरिक आत्मविश्वास एवढा जबर असतो, की अत्यंत असहाय वाटणारी अबला हीसुद्धा या बाबतीत त्याला वरचढ असते !

—आणि ते नैसर्गिक आहे. तिची सहज-प्रेरणा संरक्षण घेणे ही नसून संरक्षण देणे ही असते. न फसणाऱ्या पुरुषाच्या सान्निध्यात मिळणारी सुरक्षितपणाची

४०९३६ वि:
७६०४

अप्रत्यक्ष हमी तिला अपमानकारक वाटते. उलट, फसणाऱ्या नवऱ्याला संरक्षण देण्यात तिच्या सहज-प्रेरणेला सुप्त समाधान मिळते. एखादा पुरुष दुर्दैवाने व्यवहारदक्ष असला तरी त्याने ती गोष्ट स्वतःच्या पत्नीपासून लपवून ठेवली पाहिजे! त्यावरच त्याचे संसारसुख अवलंबून असते. आपला नवरा फसला नाही तरच तिला आश्चर्य वाटले पाहिजे. तुम्ही फसता आहा तोपर्यंत ती तुम्हाला कधीच फसवणार नाही!

शिवाय सामान्य माणसाचे स्वातंत्र्य म्हणजे तरी फसण्याच्या स्वातंत्र्या-शिवाय दुसरे काय असते? त्याच्यापुढे असलेले पर्याय हे प्रचार आणि पक्ष या दोन आदिशक्तींनी निर्माण केलेले असतात. यंत्रयुगाने निर्माण केलेली प्रचाराची साधने ही ज्ञानाची साधने असतात तशीच ती फसवणुकीची साधनेही होऊ शकतात. आणि त्याच्या आसपास असलेले पक्षोपपक्ष हे सुद्धा निर-निराळ्या आदर्शांनी भारलेले असण्याऐवजी निरनिराळ्या आभासांना शरण गेलेले असणेच अधिक शक्य असते. फसवणुकीच्या निरनिराळ्या पर्यायातून निवड करण्याचे स्वातंत्र्य एवढाच सामान्य माणसांच्या स्वातंत्र्याला आता उरलेला वस्तुनिष्ठ अर्थ आहे. फसण्याचे स्वातंत्र्य हेच आपले शेवटचे स्वातंत्र्य आहे.

पण आपण सामान्य आहो म्हणून आपणाजवळ निदान एवढे तरी स्वातंत्र्य शिल्लक उरलेले आहे! आपल्या ज्ञानाची अपूर्णता ही आपल्या सर्व स्वातं-त्र्याची सनद असते. परिस्थितीचे पूर्ण ज्ञान झालेल्या माणसाला कसलेच स्वातंत्र्य शिल्लक उरत नाही. खऱ्या अर्थाने त्याच्यापुढे पर्याय उपस्थितच नसतात. सामान्य मनुष्य ज्या अर्थाने स्वतंत्र असतो त्या अर्थाने ज्ञानी मनुष्य कधीच स्वतंत्र असू शकत नाही. एका विशिष्ट ठिकाणाकडे जाणारे दहा रस्ते असले तर त्यातला सर्वात सुखकारक रस्ता हा एकच असतो. तो ज्याला समजला त्याला पर्याय नाहीत, आणि ज्याला हे समजले नाही त्याला निवड करण्यासाठी दहा पर्याय आहेत. हवा तो पर्याय निवडण्याचे स्वातंत्र्य म्हणजेच स्वातंत्र्य असेल, तर ज्ञानाची परिसीमा गाठणाऱ्या माणसाला हे स्वातंत्र्य

मिळूच शकत नाही. पूर्ण ज्ञानाच्या संदर्भात घडणारी निवड ही एकमेव व अटळ असते. सक्ती आणि स्वातंत्र्य हे द्वैत तिथे शिल्लकच उरत नाही. म्हणूनच ज्ञानाच्या परिसीमेजवळ जीवनातील सर्व प्रश्नांची मांडणी पुन्हा निराळ्या पद्धतीने करावी लागते.

पण ती परिसीमा बाजारात जाणाऱ्या आपल्यासारख्या प्रत्येक माणसापासून खूपच दूर आहे. ती परिसीमा आणि आपला संसार या दोहोंमध्ये एक प्रचंड देहाचा मानवी प्राणी हातात तागडी घेऊन उभा असतो. नफा मिळणार असेल तर तागडीमध्ये चंद्रसूर्य तोलण्याचीसुद्धा त्याची तयारी असते. मात्र त्याला आपल्यासारखे 'फसण्याचे स्वातंत्र्य' असलेले एखादे गिऱ्हाईक हवे असते! तसे गिऱ्हाईक मिळण्याचे त्यालाही स्वातंत्र्य असले पाहिजे. त्याने दिलेला नारळ कुजका निघाला म्हणून शहाण्या माणसाने त्याच्याशी तक्रार करू नये. नारळ कुजका निघाला तर नारळाची शेंडी उपटावी. मग आपल्याला नारळाचे तीन डोळे दिसू शकतील. त्यातला एक आकाशाचा असतो; एक आपला स्वतःचा असतो; आणि सगळ्यात नरम तो त्या व्यापाऱ्याचा असतो!

किर्लोस्कर : डिसेंबर १९५९

# या जन्मातले पुनर्जन्म

भित्रा माणूस याच जन्मात पुनःपुन्हा मरत असतो असे म्हणतात. पण ते खोटे आहे. पुनःपुन्हा मरणे आणि पुनःपुन्हा मरण्यासाठी पुनःपुन्हा जिवंत होणे ही फार कठीण गोष्ट आहे. ज्याला पुन्हा जिवंत होता येत नाही तो पुनः-पुन्हा मरू शकत नाही. भित्र्या माणसाला हे कधीच जमू शकणार नाही. निसर्गाने भित्र्या माणसाला दिलेला शाप अगदी निराळा आहे. निसर्ग म्हणतो: "बाबारे, मी तुला एकदाच मारीन. तू स्वतःला मारू शकणार नाहीस; आणि म्हणूनच तुला नवा जन्महीं घेता येणार नाही. या जन्मातच अनेक पुनर्जन्म भोगण्याचे भाग्य तुला कधीही मिळणार नाही. तू फक्त एकदाच मरशील!" ज्याला चैतन्यपूर्ण व गतिशील जीवन जगायचे असते त्याला एकाच जन्मात पुनः-पुन्हा मरावे लागते. आपले मरण आपण स्वतःच बोलवावे लागते. उत्कट अनुभवाच्या ओठावर असलेला तो परवलीचा शब्द त्याला पुनःपुन्हा ऐकावा लागतो. आपल्या दिशेने पडणाऱ्या त्या धिम्या पावलांचा आवाज प्राणांचे कान करून झेलावा लागतो. आपले संचित काळौघाच्या स्वाधीन करावे लागते. मावळत्या जन्माच्या उरल्या सुरल्या चिंध्यांनी लाज राखीत राखीत एका नव्या जन्माला अटळपणे सामोरे जावे लागते. प्रत्येक तत्त्वज्ञ आणि कलावन्त एकाच जन्मात भोगावे लागणारे हे पुनर्जन्म पुनःपुन्हा अनुभवीत असतो.

खऱ्या अर्थाने पुन्हा जन्म घेणे हे फक्त असामान्य माणसांनाच शक्य असते; पण सामान्य माणसालाही ती ओढ जाणवल्यावाचून राहात नाही. मानवाची ती

एक शाश्वत प्रेरणा आहे. मनुष्याच्या मूळ प्रेरणा समजून घेताना काही वेळा मानसशास्त्रापेक्षा विधिशास्त्र अधिक उपयोगी पडते; आणि काही बाबतीत तर या विधिशास्त्रापेक्षाहि, त्याहून अधिक पुरातन असलेल्या बीजकथाच अधिक अर्थपूर्ण वाटू लागतात. बऱ्याच धर्मांत या नाही त्या स्वरूपात पुनरुत्थानाची कल्पना वावरत असते; आणि काही बीजकथांची उभारणीसुद्धा कायाकल्पाच्या तत्त्वावरच झालेली दिसते. पुनर्जन्म घेण्याच्या मूळ प्रवृत्तीचेच हे दोन आविष्कार असतात. माणसाला पुनर्जन्म हवा असतो आणि तो मिळावा म्हणून मृत्यु स्वीकारण्याचीही त्याची तयारी असते. हे शक्य व्हावे म्हणूनच वाटेल त्या क्रान्तिकारक स्थित्यंतरातून जायची तो तयारी दाखवतो. डार्विनने गृहीत धरलेली जगण्याची ओढ आणि फ्रॉइडने सुचविलेली मृत्यूची ओढ किंवा विलयवासना या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. पुनर्जन्म घेण्याची मूळ प्रवृत्ती किती जोरदार असते याची कल्पना आपल्या पूर्वजांना निश्चित असली पाहिजे. नाहीतर त्यांनी पुनर्जन्म टाळण्यासाठी इतके आकांडतांडव केले नसते! ज्या वेळीं एखादे कर्मठ धर्ममत एखाद्या विशिष्ट कल्पनेचा पापाशी संबंध जोडते त्या वेळी ती कल्पना कोणत्या तरी मूलभूत मानवी प्रेरणेशी संबद्ध आहे असे खुशाल समजावे! पापी माणसाला पुनर्जन्म मिळतो किंवा पुनर्जन्म मिळणे हे पापाचे लक्षण आहे असे सांगताना त्यांनी या गोष्टीची अप्रत्यक्ष कबुली दिली आहे. कारण, आपले बहुतेक विधिनिषेध हे माणसाच्या मूळ प्रवृत्तीचे दमन करण्यासाठीच सुचविलेले असतात. धर्माने ते पापाचे लक्षण मानले हाच, माणसाला पुनर्जन्म हवा असतो याचा निकाली पुरावा होय.

पाप केल्यामुळे पुनर्जन्म मिळतो म्हणूनच तर माणसाला पापाचे एवढे विलक्षण आकर्षण वाटत नसेल ना? वस्तुतः, पाप करणाऱ्या माणसाला मोक्षाची भीती घालणे हेच अधिक धूर्तपणाचे झाले असते! पुनर्जन्माची ही ओढ गृहीत धरली म्हणजे सामान्य आणि असामान्य अशा दोन्ही अवस्थांतील अनुभवांमध्ये एक निराळीच सुसंगती दिसू लागते.

आता एखाद्या जोडप्याने अचानक घटस्फोट घेतला असे कळले तर मला

आश्चर्याचा धक्का बसत नाही. सामान्य माणसातसुद्धा पुनर्जन्म घेण्याची ही आदिम ओढ काही वेळा प्रभावी ठरत असावी. ज्या अर्थाने एखादा विकासशील तत्त्वज्ञ आपले जुने तत्त्वज्ञान आपल्या हाताने मोडून टाकतो व पुन्हा एका नव्या जन्मात प्रवेश करतो त्या अर्थाने सामान्य माणसाला पुन्हा नवे होणे शक्य नसते. तो बिचारा आपल्याला झेपेल अशी काहीतरी मोडतोड करून पुन्हा नवा अवतार घेण्याचा प्रयत्न करीत असतो! असे काहीतरी करून पुन्हा आपणाला नवे होता येईल ही सोयिस्कर समजूत उराशी बाळगल्यामुळेच त्याला आपले दैनंदिन जीवन सुसह्य होत असते. खरे म्हणजे चांगला कागद वापरला असता तर आपले पुस्तक अधिक खपले असते असे समजणारा कवि आणि जोडीदार बदलला तर आपला संसार सुखाचा होईल असे मानणारा विवाहित मनुष्य हे दोघेही सारखेच स्वप्नाळू असतात! दोन लग्ने करणारा पुरुष हा आपल्या मूर्ख-पणाला एकाऐवजी दोन साक्षीदार निर्माण करीत असतो! मग हा धोका तो का स्वीकारतो? अनिवार्यपणे घटस्फोटाच्या आत्मघातकी निर्णयाकडे तो कसा खेचला जातो? आपल्या अक्कलहुशारीने आईबापांमध्ये तडजोड घडवून आणतील एवढी मोठी मुले असलेले जोडपेसुद्धा घटस्फोट मागण्यासाठी कोर्टात का घुसते? अशा ठिकाणी 'अ'चे प्रेमप्रकरण किंवा 'ब' चा स्वभावदोष ही कारणे वरवरची असतात. मनात कुठेतरी याच जन्मात पुनर्जन्म अनुभवण्याची गूढ तहान लप-लेली असते; आणि ती प्रभावी ठरली की सामान्य मनुष्य अशी काहीतरी मोडतोड करायला सुरुवात करतो.

या दृष्टीने विचार केला म्हणजे दिवाळे काढणाऱ्या व्यापाऱ्याबद्दलही आप-ल्याला एक निराळीच सहानुभूती वाटू लागते. दिवाळे काढणाऱ्या व्यापाऱ्या-बद्दल आपल्याकडे फक्त टिंगलीचे शब्दच ऐकू येतात. बुडणाऱ्या सावकारांना तर त्याच्याविषयी सहानुभूती नसतेच, पण तरलेले इष्ट-मित्रही स्थळकाळ पाहून नाक मुरडू लागतात. सज्जन माणसांच्या दृष्टीने तर दिवाळे काढणे म्हणजे नैतिक अधोगतीची परिसीमा असते. पण वस्तुतः, माणूस दिवाळे काढतो म्हणजे काय करतो? एका अर्थाने तो पुनर्जन्म घेण्याचाच प्रयत्न करीत असतो. आडव्या-उभ्या रेषा मारून आपली गिचमीड झालेली पाटी त्याला पुन्हा एकदा स्वच्छ

करायची असते. त्या लांब वहीचे पाठीमागून फरफटत येणारे शेपूट त्याला एकदा कायमचें कापून टाकायचे असते! पुनर्जन्माची तहान ही त्याच्या कृती-मागील आद्य प्रेरणा असते. दिवाळे काढणारा मनुष्य हा भित्रा असलेला तुम्हाला बहुधा आढळणार नाही. त्याच्यामध्ये भविष्याकडे झेप घेण्याची उमेद असते, नवे नवे प्रयोग करण्याचे धाडस असते, आणि सगळ्यात मोठी गोष्ट म्हणजे अयशस्वी होण्याइतकी उंच उडी मारण्याची जिद्द असते! भित्रा माणूस भांडवल जमवतो; पण कलंदर माणूसच दिवाळे काढू शकतो! दिवाळे काढलेल्या व्यापाऱ्याला आपण बहिष्कृत मानतो. पण गुजराती लोक त्याला सन्मानाने वावरू देतात. त्यांची जीवनाची समज आपल्यापेक्षा अधिक सखोल असल्याचा हा एक मोठा पुरावा आहे. दिवाळखोरांचा सन्मान राखण्यात ते अप्रत्यक्षपणे व्यापारातील कलंदर वृत्तीचाच सत्कार करीत असतात. प्रत्येक क्षेत्रातील नवा उन्मेष हा या कलंदर वृत्तीतून जन्माला येत असतो.

मात्र या एका जन्मातच अनेक पुनर्जन्म भोगण्याची खरीखुरी शक्ती थोर तत्वचिंतक आणि असामान्य कलावंत यांनाच लाभलेली असते. रसेलसारख्या विकासशील तत्त्वज्ञाचे वैचारिक जीवन म्हणजे मृत्यु आणि पुनर्जन्म यांचा एक न संपणारा लंपडाव आहे. आपल्या विकासाच्या प्रत्येक टप्प्यावर त्याने स्वतःला अनेकदा मारलेले आहे; पुनःपुन्हा अग्निप्रवेश केला आहे; आपला मृत्यू आपल्या नव्या डोळ्यांनी पाहिला आहे; आणि तो सर्व 'सोहळा' स्वतःच्या शब्दात जगापुढे मांडला आहे. कारण आत्मटीकेचा अग्निप्रवेश केल्याशिवाय तत्त्वज्ञानाला पुनर्जन्म घेता येत नाही. मूर आणि विटगेन्स्टाइन-सारखे साथी थोडीफार मदत करू शकतात. पण शेवटी अंतिम अग्निदिव्य हे ज्याचे त्यालाच करावे लागते. तुकारामाला दिसलेला सोहळा याहून अधिक अद्भुत असेल असे समजण्याचे कारण नाही. थोर तत्वज्ञ हा आपले पूर्व-संचित आपल्या हातांनीच चितेवर चढवीत असतो आणि हा विनाश अनुभवीत असतानाच त्याचे नवसृजनाचे स्वप्न साकार होत असते. ज्यावेळी एकच मनुष्य आपल्या जुन्या डोळ्याशी आपली नवी नजर भिडवू लागतो त्या वेळी दोन जन्मांची दृष्टादृष्ट होते. तो सोहळा नेहमीच 'अनुपम' असतो.

कलावंतालासुद्धा पुनःपुन्हा भेटणारा हा पुनर्जन्म आनंदाने स्वीकारावा लागतो. ग्रीक बीजकथेतील फिनिक्स पक्षी हेच कलावंताच्या जीवनाचे चिरंतन प्रतीक आहे. हा पक्षी वृद्ध झाला की स्वतःच स्वतःला जाळून घेतो आणि मग त्या राखेमधून त्याचा पुनर्जन्म होतो. प्रत्येक नव्या व उत्कट कल्पनानुभवाबरोबर एका अर्थाने कलावंताचाही पुनर्जन्म होत असतो. कलात्मक सृजनामध्ये अनुभव भोगणारा माणूस आणि त्या अनुभवाकडे तटस्थपणाने पाहणारा द्रष्टा हे दोघेही सहभागी होत असतात. 'भोगणारा' माणूस जिथे संपतो तिथेच 'भागणाऱ्या' माणसाची सुरुवात होते. त्या दोहोतील सीमारेषा अनाकलनीय असते. ती शोधण्याचा प्रयत्न करणे हे दोन क्षणातील अंतर शोधण्याचा प्रयत्न करण्या-इतकेच हास्यास्पद असते! पण त्यामुळे ते दोघे एकच असतात असे समजणेही चुकीचे होईल. म्हणूनच श्रेष्ठ कलावंत हा 'स्वतः'चा अनुभव सांगूच शकत नाही. तो सांगतो ते सर्व कुणा-एका दुसऱ्याच्या पुनर्जन्माविषयी सांगतो! जातककथांमध्ये गौतमबुद्ध आपल्या पुनर्जन्मातील अनुभवांचे संचित आपल्या अनुयायांच्या हवाली करीत असतो. प्रत्येक कलाकृती हे कलावंताच्या जीवना-तील एक 'जातक'च असते. या जन्मात अनुभवलेल्या एका पुनर्जन्माचा तो एक अंधुक आलेख असतो. 'काव्याची भाषा' म्हणजे काय असा प्रश्न पुष्कळ लोक मला विचारतात : काव्याची भाषा म्हणजे या पुनर्जन्मांना फुटणारा पहिला आणि अटळ शब्द.

दिवाळी १९५९

# पुस्तके : एक शोभा

बेकनला हवे तर तत्त्वज्ञ म्हणा; पण त्याला कोणी द्रष्टा म्हणेल तर ते मी मान्य करणार नाही. ‘ अभ्यासाविषयी ’ या आपल्या निबंधात त्याने पुस्तकाविषयी खूप प्रपंच केला आहे; पण पुढे विसाव्या शतकात पुस्तकांच्या होणाऱ्या एका अभिनव उपयोगाची पुसट कल्पनासुद्धा त्याला येऊ शकली नाही. पुस्तकांचे वर्गीकरण करताना तो लिहितो, “ काही पुस्तकांची नुसती चव बघायची असते, काही संबंध गिळायची असतात, आणि काही थोडीच चावून चावून पचवायची असतात. ” पण या तीन प्रकारांशिवाय पुस्तकांचा एक चौथा प्रकारही असतो. काही पुस्तके नुसती पहायची असतात. सुसंस्कृत समजल्या जाणाऱ्या माणसांच्या घराचे सौंदर्य वाढवणे हाही पुस्तकांचा एक महत्त्वाचा उपयोग आहे. पण बेकन पडला सोळाव्या शतकातला एक जुना तत्त्वज्ञ. पुस्तकांना विसाव्या शतकात मिळालेले हे नवे स्थान त्याला त्या वेळी दिसू शकले नाही. पुस्तके हा कधी काळीं एक गृहशोभेचा भाग होईल ही गोष्ट त्याला स्वप्नातही दिसली नसती. त्यासाठी लागणाऱ्या तरल कल्पनाशक्तीचा त्याच्याजवळ अभाव होता. शेक्सपिअरची नाटके बेकनने लिहिलेली नाहीत हे सिद्ध करण्यासाठी वस्तुतः एवढा पुरावाही पुरेसा आहे !

इतर सर्व प्रेमाप्रमाणेच पुस्तकावरील आपल्या प्रेमातही सुरुवातीची अशी एक भाबडी अवस्था असते. त्या अवस्थेत घडणारे पुस्तकांचे दर्शन अगदी वेगळे असते. मी सुद्धा त्या अवस्थेतून एकदा गेलेला आहे. त्या वेळीं एखाद्या माण-

साच्या घरी त्याचे स्वतःचे असे पुस्तकालय पाहिले की त्या माणसाविषयी एका अनोख्या आदराच्या भावनेने मी भारावून जात असे. कोणाच्याही घरी गेले की प्रथम माझे लक्ष त्याच्या पुस्तकांकडे जाई. बुभुक्षितासारखे माझे डोळे त्याच्या पुस्तकांवरून भिरभिरू लागत. शेपाचशे पुस्तके खरेदी करणे कोणालाही कसे शक्य होते याचे त्या वेळी मला मोठे आश्चर्य वाटे. ही इतकी पुस्तके खरेदी करण्यासाठी त्याला किती वेळा अर्धपोटी राहावे लागले असेल याचे एक दर्दभरे दृश्य माझ्या डोळ्यापुढे तरळू लागे. मग पुस्तकांचा संग्रह करणारा तो माणूस एकदम असामान्यांच्या पंक्तीत जाऊन बसे. सार्वजनिक वाचनालयातून पुस्तके नेऊन वाचण्यापेक्षा अशा माणसाच्या खाजगी पुस्तकालयातून पुस्तके नेऊन वाचण्यात मला एक वेगळीच धन्यता वाटे. चिपळूणकरांची निबंधमाला ही मी अशाच अवस्थेत वाचली होती. दुखवलेल्या राष्ट्रीय अहंभावाच्या त्या उन्मत्त वेहोपीत मी अक्षरशः बुडालो होतो. पण माझ्या मनात ती निबंधमाला नुसती चिपळूणकरांचीच म्हणून ठसलेली नव्हती, ज्यांच्या खाजगी पुस्तकालयातून ती मी वाचण्यासाठी आणली होती त्यांचे नावही त्या निबंधमालेशी अनिवार्यपणे बांधले गेले होते. लेखक आणि संग्राहक या दोघांच्याही छाया एकमेकात मिसळल्या होत्या.

पण पुस्तकांच्या संग्राहकाविषयीच्या या भाबड्या भावनेला पुढे अचानक तडा गेला. मला कळून चुकले की पुस्तकांचा संग्रह करणारा मनुष्य हा पुस्तकांचा वाचक असतोच असे समजण्याचे कारण नाही. वस्तुतः आपण विकत घेतलेली बरीचशी पुस्तके आपण कधीच वाचत नाही असे हे गृहस्थ मला सुरुवातीलाच म्हणाले होते. हा निव्वळ त्यांचा विनय आहे याबद्दल मला बिलकुल शंका नव्हती. पण या विनयाला सत्याचा भरपूर आधार आहे ही गोष्ट मला पुढे मान्य करावी लागली. त्या वेळी तात्यासाहेब केळकरांचे 'तोतयाचे बंड' नुकतेच प्रसिद्ध झाले होते. 'एक अप्रतिम नाटक' म्हणून त्यांनी ते मला अगत्याने वाचायला दिले. 'सकाळी आणले, आणि दुपारपर्यंत वाचून काढले' अशी त्याची भलावणीही केली. मी सुद्धा मोठ्या भक्तिभावाने नाटक वाचायला घेतले; आणि एकदम माझ्या या भाबड्या भक्तीला एक मोठा तडा गेला.

पुस्तकातली वरीच पाने कापलेली नव्हती ! आणि तशा अवस्थेत त्यांनी ते पुस्तक कसे वाचले असेल याची कल्पना करणे कठीण होते ! या प्रसंगानंतरही मी त्या गृहस्थाने आणलेली पुष्कळ पुस्तके वाचली. पण त्या पुस्तकांची पहिली चव आता बदलली होती.

पण तेव्हापासून एक धडा मात्र घेतला ! कोणालाही पुस्तक देण्यापूर्वी प्रथम त्या पुस्तकातली सर्व पाने कापलेली आहेत याची मी खात्री करून घेतो ! नाहीतर जे आपण वाचले म्हणून सांगावे त्याच पुस्तकात नेमकी अशी न कापलेली पाने उमगायची. 'प्रिंटर्स डेव्हिल' इतकाच हा 'बाइंडर्स डेव्हिल' सुद्धा भयंकर आहे. कोणाच्या विद्वत्तेचा फुगा कसा फोडील काही नेम नाही. जागरूक विद्वानाने पुस्तके विकत घेतानाच त्यातली सर्व पाने फाडलेली आहेत की नाही याची पूर्ण खात्री करून घ्यावी हे बरे.

हे सर्व घोटाळे पुस्तके ही मुख्यतः वाचण्यासाठी असतात ह्या जुन्या बुरसट कल्पनेतून निर्माण होतात. पुस्तके ही एक प्रकारची गृहशोभा आहे हा नवा अद्यावत् सिद्धान्त मान्य करणारा मनुष्य या विपरीत वातचक्रातून एकदम बाहेर पडतो. सांस्कृतिक समारंभात नटूनथटून आवाडीवर मिरवणाऱ्या सभ्य स्त्रीपुरुषांच्या जीवनामध्ये पुस्तकाच्या बहिरंगाला विशेष महत्व असते. आपल्या दिवाणखान्यामध्ये अमेरिकन नटींचे फोटो, एखादी विलायती वेल, हरणाची शिंगे आणि त्याचप्रमाणे पाचपन्नास अद्यावत् भासणारी पुस्तके त्यांना हवी असतात. एका दृष्टीने ही सर्व मंडळी पुस्तकावर विशुद्ध प्रेम करीत असतात. अर्थाच्या उठाठेवींतून मुक्त झाल्यावरच कवीला भाषेच्या सुप्त अनाकलनीय शक्तीचा शोध लागतो असे विशुद्ध कवितेचे काही पुरस्कर्ते आग्रहाने प्रतिपादीत असतात. या तत्त्वज्ञानाचा आधार घेऊन पुस्तकाच्या विषयावर प्राधान्य देणारे लोक हे काहीसे रानटी अवस्थेत आहेत असेच म्हणावे लागेल. जो खऱ्या अर्थाने पुस्तकावर प्रेम करतो त्याला पुस्तकाच्या आत काय आहे हा प्रश्न गौण वाटला पाहिजे. पुस्तकाचा स्पर्श आणि रूप यातूनच आजकालच्या संवेदनाक्षम माणसांना इतका उमाप आनंद मिळू शकतो की त्यापलीकडे

जाण्याची त्यांना सहसा जरूर भासत नाही. ज्याला पुस्तकाचा स्पर्श भोगता येत नाही किंवा रंग पाहता येत नाही तोच मनुष्य पुस्तक वाचण्याचा प्रयत्न करतो.

या बदलत्या दृष्टिकोनाची चाहूल आपल्या इकडील प्रकाशकांना लागलेली असावी यात संशय नाही. त्यामुळेच ते पुस्तकाच्या अंतरंगापेक्षा बहिरंगाकडे अधिक लक्ष देताना दिसतात. मात्र या दृष्टीने आपल्या संपूर्ण व्यवसायाची पुर्नघटना करण्याचे धैर्य अजून कोणत्याही प्रकाशकाने दाखवलेले दिसत नाही. पुस्तक ही एक गृहशोभा आहे हा सिद्धांत प्रामाणिकपणे स्वीकारल्यानंतर सर्व पुस्तकव्यवसाय एका निराळया पातळीवरून पाहाणे आवश्यक आहे. पुस्तक वाचण्यासाठीं असते या गृहीतावर पूर्वीच्या व्यावसायिक परंपरा आधारलेल्या आहेत, तर पुस्तक ही शोभा आहे हा आपल्या अभिरुचीचा पाया आहे. या दोन गोष्टीतील अंतर्विरोधाचा परिणाम प्रत्येक प्रकाशकाला भोगायला लागतो. खरे म्हणजे पुस्तकावरील चित्र आधी नक्की करून मग त्याच्याशी मिळते-जुळते असे काहीतरी लिहिण्याविषयी लेखकांना किंवा कवींना विनंती करणे हा वाजवी मार्ग. पण अगोदर कसलातरी मजकूर घेऊन मग त्यातल्या उणीवा चित्राने भरून काढीत राहण्याची परंपरा अजूनही टिकून आहे.

पुस्तकांची विक्री होत नाही म्हणून ओरड करणाऱ्या प्रकाशकांनी पुस्तकांच्या आकाराचा गृहशोभेच्या दृष्टीने विचार करणे अगत्याचे झाले आहे. आपली बहुतेक पुस्तके आयताच्या आकाराची असतात. आकारातील ही जुनाट परंपरा अजूनही का टिकून राहावी याचे मला आश्चर्य वाटते. आयतासारखा चौकोनी आकार हा निरस व जडवादी अशा उपयुक्ततावादाचाच विजय आहे. निर्भेळ सौंदर्यवादाच्या दृष्टीने या प्रश्नाकडे पाहणाऱ्या माणसाला पुस्तकाच्या संभाव्य आकारांचे एक निराळेच कल्पनाचित्र आपल्या डोळ्यापुढे आणता येईल. मग त्या कल्पनाचित्रात त्रिकोणी, पंचकोनी, षटकोनी, वर्तुळाकार, अर्धवर्तुळाकार अशी निरनिराळया आकाराची पुस्तके त्याला दिसू लागतील. एखादा हौशी प्रकाशक यापुढे जाऊन निरनिराळया पक्ष्यांचे व पशूंचे आकार

असलेली पुस्तकेही काढू शकेल. मग प्रकाशकात 'ॲबस्ट्रक्ट' व 'वास्तवदर्शी' असे दोन वर्ग निर्माण झाल्याचे दृश्यही आपल्याला दिसू शकेल. हे अद्भुतरम्य युग सुरू करणारा प्रकाशकही प्रतिभावान असावा लागेल. तो येईल तेव्हा येवो. पण तोपर्यंत गृहशोभेच्या दृष्टीने एखादे साधे त्रिकोणी पुस्तक काढण्याचे धैर्यसुद्धा आपल्या प्रकाशकाकडे असू नये ही आपल्या अभिरुचीची केवढी शोकान्तिका !

पुस्तकांना अनुरूप कपडे शिवण्याची कल्पना तरी किती प्रकाशकांना सुचली आहे ? आपल्या कवितेच्या पुस्तकाला चोळीच्या खणाचे बायंडिंग करणारा हौशी कवी किंवा आपल्या गोष्टीच्या पुस्तकाला बाळसेदार गोंडे बांधणारा एखादा कथालेखक हे फक्त अपवाद म्हणूनच डोळयापुढे येतात. पुस्तकांच्या रंगरूपाप्रमाणेच पुस्तकांच्या गंधालाही गृहशोभेच्या दृष्टीने फार महत्त्व आहे. ग्रन्थपालाच्या परीक्षेत या गोष्टीला कितपत महत्व दिले जाते ते मला माहीत नाही. पण डोळे बांधलेल्या अवस्थेत नाकापुढे आणलेल्या पुस्तकाच्या वासावरून ते जुने आहे की नवे आहे आणि जुने असल्यास अंदाजे कोणत्या शतकातील या प्रश्नाचे बरोबर उत्तर देता आल्याशिवाय मी कोणाही माणसाची ग्रंथपाल म्हणून नेमणूक करणार नाही ! गृहिणीचे लक्ष पुस्तकाकडे वेधण्याच्या दृष्टीने पुस्तकांना सेंट किंवा अत्तरे लावण्याची कल्पना अजून कोणाही प्रकाशकाला कशी सुचली नाही याचे आश्चर्य वाटते. आजचे प्रकाशक जुन्या परंपरातून अजूनही बाहेर पडू शकलेले नाहीत याचा हा आणखी एक पुरावा आहे. पुस्तकांना सुगंधित करण्याचे हे नवे तंत्र वापरल्यास पुस्तके खपत नाहीत अशी तक्रार करण्याचे कारण उरणार नाही. मग महिलामंडळातली एक बाई दुसऱ्या बाईला म्हणेल, "अय्या, तुला 'बकुळीचे' बालकवी मिळाले वाटतं, माझ्याजवळ 'जॅस्मिनचे' आहेत. पण मी आता सगळा सेटच करणार आहे." मग ज्ञानेश्वरीला कोणते अत्तर लावणे इष्ट यावर वृत्तपत्रात वादविवाद सुरू होईल. वाङ्मयाचा टीकाकार हा प्राणी तसाच शाबूत राहील. 'वामन पंडीत एक की दोन' हा वाद मागे पडला तरी दुसरे वाद पुढे येतील.

विशेष म्हणजे प्रत्येक संसारदक्ष गृहिणी घरातल्या खाजगी वाचनालयाकडे

विशेष लक्ष पुरवील. आणि माझेही फारा दिवसांचे एक स्वप्न साकार होऊ लागेल: महाराष्ट्रातील प्रत्येक सुसंस्कृत माणसाच्या घरी एक त्याचे असे खाजगी ग्रंथालय असेल.

दिवाळी : १९६०

संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनु. ०९३६ वि: निबंध
क्रमांक ९६०८ नों. दि. २५/५/६९

# न केलेले गुन्हे

शेवटी मी त्या बाईचा खून केला. अर्थात् मनातल्या मनात. पण मनातल्या मनात झाले म्हणून काय झाले. खून तो खूनच.

माझी वागणूक सभ्य असल्यामुळे माझे विचार नेहमी आततायी असतात! असल्या विचारापासून आपल्या सभ्यतेचे संरक्षण करण्याकरताच संस्कारांची सगळी तटबंदी उभारलेली असते. बाहेरून तोफांचे हल्ले झाले तरी ती कोसळत नाही; पण आततायी विचार हे घुशीसारखे असतात. प्रथम आपण त्यांच्या हालचालींकडे दुर्लक्ष करतो... हे दुर्लक्षसुद्धा आपण उगाच करीत नाही! संस्कारांच्या तटबंदीत कोंडून पडलेला आपला आत्मा त्यांना अगोदरच सामील झालेला असतो. आत्मा ही एक फार दुबळी वस्तु आहे. कोणच्या आततायी विचाराला तो केव्हा फितूर होईल हे सांगता येणार नाही. म्हणूनच माझे आततायी विचार दाबून टाकण्याचा नाद मी आता सोडलेला आहे. त्यांची सगळी शक्ती जमिनीखाली असते. जमिनीत गाडलेल्या प्रत्येक आततायी विचाराचे एक मोठे तत्त्वज्ञान बनते! आणि मग ते तत्त्वज्ञान गाडून टाकण्यासाठी त्याहून भयंकर असे दुसरे तत्त्वज्ञान बोलवावे लागते. या दुष्टचक्रातून बाहेर पडण्याचा मला तरी एकच मार्ग सापडतो. मी अधूनमधून आततायी विचारांना चव्हाट्यावर आणतो; अगदी मोकळेपणाने माझा आत्मा त्यांच्या हवाली करतो. मग ते धडाधड कबुलीजबाब देतात. ख्रिस्ती माणसाच्या कबुली-जबाबासारखाच हा एक प्रायश्चित्तविधी आहे! आपला आत्मा खऱ्या अर्थाने

परत मिळविण्यासाठी प्रत्येक सभ्य माणसाला केव्हा ना केव्हा या मनस्थितीत जावेच लागते.

अशाच एका अटळ मनस्थितीत मी त्या बाईचा खून केला. ही बाई म्हणजेच त्या चिलयाची आई. लहानपणी कोणीतरी मला चिलयाची गोष्ट सांगितली आणि तेव्हापासूनच मी राक्षस झालो. माझा देवांवरचा विश्वास उडाला आणि एकदम मी त्या राक्षसांच्या पक्षात सामील झालो. तिकडे ती बाई चिमुकल्या चिलयाचे मांस शिजवीत होती आणि इकडे मी सगळ्या राक्षसांचा जयजयकार करीत होतो. देवदानवांच्या सगळ्या पौराणिक कथांचा माझ्या मनावर एकच परिणाम झालेला आहे. देवांचा क्षुद्र कारस्थानीपणा, राक्षसांची वीरवृत्ती, आणि मानवांची अहंभावपूर्ण लाचारी. चिलयाची गोष्ट ऐकताना अजूनही माझे रक्त उसळून उठते. ईव्हने केलेल्या पापापेक्षाही चिलयाच्या आईने केलेले कर्म मला अधिक लाजिरवाणे वाटते. कोणताही ध्येयवाद पाठीमागे उभा केला तरी त्या कार्याचा बचाव तिला करता येणार नाही. आपल्या नवऱ्याच्या सत्त्वरक्षणासाठी ते कर्म तिने केले असेल ही गोष्ट मला पटू शकत नाही. ती सर्वस्वी आपल्या लाचार अहंभावाच्या आहारी गेली होती. तिच्याशी तुलना करताना मीडिआला सुद्धा आपल्या मुलाचे मांस शिजवताना अधिक सयुक्तिक अशी सबब होती. नकली ध्येयवाद पाठीशी घालून अमानुष कृत्ये करण्याची परंपरा प्रथम चिलयाच्या आईनेच सुरू केली. मग आपण नव्या नावाखाली नवी पापे दडवण्यात पटाईत झालो. एका लढाईला धर्मयुद्ध म्हणू लागलो; दुसऱ्या लढाईला राष्ट्रप्रेमाचा आधार दिला; तिसऱ्या लढाईला जागतिक शांतीची नांदी मानली. चिलयाच्या कथेतीलच ही सर्व पुढची प्रकरणे आहेत.

अजून मला ही चिलयाची आई तिठ्यातिठ्यावर भेटत असते. कधी ती आपल्या मुलाला शेजारच्या घरी खाऊसाठी अधाशीपणाने हात पुढे केल्याबद्दल पट्टी मारीत असते; कधी ती पाव्हणे येणार म्हणून भर उन्हाळ्यामध्ये आपल्या पोराला कपडे घालीत असते; कधी कधी मातीमध्ये कपडे मळवल्या-

बद्दल त्याच्या अंगावर खेकसत असते; आणि याहूनही सगळ्यात भयंकर म्हणजे, 'आपल्या मुलाने कोणीतरी फार मोठे झाले पाहिजे' या कल्पनेचे भयानक ओझे आपल्या पोराच्या इवल्याशा डोक्यावर स्वतःच्या हातांनीच ठेवत असते... म्हणूनच मी मनातल्या मनात चिलयाच्या आईला मारले आहे. तिचा खून केला आहे.

मात्र माझा प्रत्येक गुन्हा खुनाचाच आहे असे समजण्याचे कारण नाही. काही वेळा मी अगदी सामान्य गुन्हे केलेले आहेत. मनातल्या मनात झाले म्हणून काय झाले? तिथे सुद्धा काही तारतम्य ठेवावेच लागते!

मनातल्या मनात मी जगातले सगळे ताशे फोडले आहेत. ताशा हे महाभयंकर कर्णविदारक यंत्र प्रथम कोणी काढले याचा शोध मला अजून लागलेला नाही. ते मुसलमानांनी काढलेले आहे ही समजूत खरी असेल तर पाकिस्तान करण्यापूर्वीच हिंदुस्थानचा पुरेपूर सूड मुसलमानांनी घेतलेला आहे ही गोष्ट मान्य करावी लागेल. ताशा हे रणवाद्य आहे ही कल्पना बिलकूल चुकीची आहे; ज्या बाजूला ताशा असेल त्या बाजूचे सैनिक केवळ या वाद्यातून सुटण्यासाठीच प्रतिपक्षाला फितूर होतील. लग्नाच्या वेळी वाजणारा ताशा याचा नवरानवरींच्या अंतर्मनावर काय परिणाम होत असेल याची थोडी जरी कल्पना आपल्या समाजधुरीणांना आली असती तरी आपली जुनी विवाहसंस्था पुष्कळ प्रमाणात यशस्वी झाली असती. भावनेच्या नकाराला साकार करण्याकरताच या वाद्याचा जन्म झाला आहे. ताशाची खरी जागा खाटिकखाना हीच आहे. ताशेवाल्यांनो, मेहेरबानी करून माझ्या समोरून जाऊ नका; नवरानवरींला साक्षी ठेवूनच मला तुमचा ताशा फोडावा लागेल!

मनातल्या मनात गुन्हे करणारा माणूस मित्र आणि शत्रु हे वरवरचे भेद मानीत नसतो. अशाच अवस्थेत मी एकदा माझ्या मित्राचा नवा शर्ट टराटर फाडला आहे. माणूस तसा सज्जन आहे. गाईच्या तुपाइतका सात्विक. प्रसंगामध्ये देवासारखा उभा राहील. आपले दुःख बोलणार नाही; दुसऱ्याचे न

सांगता समजून घेईल. पण माणूस कसा का असेना, गुन्हा करण्याची झटक आली की मी असल्या फालतू गोष्टींचा विचार करीत नाही. मी सरळ त्याच्या सद्र्याला हात घालतो. इतक्या सात्विक माणसाने आपल्या सद्र्याला सोन्याची बटणे लावावी ही कल्पनाच मला असह्य होते. सोन्याच्या बटणाइतकी कुरूप गोष्ट सबंध दुनियेत सापडणार नाही. या बाबतीत वादविवाद संभवत नाही. शिष्टाचाराला अर्थ उरत नाही. अशा वेळीं मला फक्त एकच मार्ग शिल्लक असतो. सरळ सद्र्याला हात घालणे आणि सद्रा फाडून टाकणे. जगाच्या कल्याणासाठी काही अप्रिय गोष्टी कराव्या लागतात!

काही वेळा मनातल्या मनात मी रस्त्याच्या एखाद्या कोपऱ्यावर दबा धरून उभा राहतो आणि नेकटाय घातलेले एखादे सावज पुढे आले की त्याच्या अंगावर वाघासारखी झडप घालतो. अशा वेळीं त्या माणसाच्या जिवाला माझ्यापासून धोका असतो असे समजण्याचे बिलकूल कारण नाही. मला फक्त त्याच्या गळ्यातला नेकटाय काढून त्याचा गळफास सोडायचा असतो. दुसऱ्याच्या गळ्यावर गच्च बसलेला नेकटाय पाहूनही माझा जीव घामाघूम होतो. मुमुक्षु माणसाला स्वतःच्या मुक्तीमध्येही शेवटचा आनंद मिळू शकत नाही. ' जगातील शेवटच्या माणसाला मोक्ष मिळाल्याशिवाय मला मोक्षाची किंमत नाही ' हे विवेकानंदाचे वाक्य अशा वेळीं प्रथमच माझ्या प्रत्ययाला येते. विमुक्त माणसाला सुद्धा प्राप्तकर्मापासून मोकळीक नसते असे गीतेमध्ये का सांगितले आहे त्याचे मर्म अशा वेळीच माझ्या ध्यानात येऊ लागते. म्हणूनच माझ्या मनातला छुपा गुन्हेगार भर रस्त्यावर हे आततायी कर्म करण्यात गुंतलेला असतो. सगळ्यांच्या गळ्यातले टाय ओढून घेतो; त्यांची एक मोठी होळी करतो; आणि सार्वत्रिक विमोचनाच्या त्या आनंदात पोरासारख्या उड्या मारतो...मी स्वतः सूटबुटाच्या उपाधीतून कधीच मोकळा झालो आहे; गळ्यातला टाय दहा वर्षांपूर्वीच सोडून टाकला आहे. आता माझा जुना टाय बरणीचा दादरा बांधताना वापरला जातो. कधी कधी तर असे वाटते की रात्री हळूच उठून त्या बरण्यांचे दादरेही सोडून टाकावे...पण निदान मुंबईच्या रस्त्यावरून हिंडणाऱ्या या जिवंत बरण्याच्या गळ्याचे दादरे तरी एक दिवस

मला सोडावेच लागतील!

मनातल्या मनात घडणाऱ्या या घातपाती कृत्यांमुळे आत्तापर्यंत जवळ जवळ अर्धी मुंबई माझ्या हातून भुईसपाट झाली आहे. काड्याच्या पेटीच्या आकाराची कोणचीही बिल्डिंग मी मुंबईमध्ये ठेवलेली नाही! वास्तुकला ही सुद्धा एक कला आहे; अशा वल्गना मी पुष्कळ दिवस ऐकत आलो आहे. अशी एखादी कला खरोखरच अस्तित्वात असली तर तिचा थांगपत्ता अजून तरी मुंबईतल्या वास्तुशास्त्रज्ञांना लागलेला नसावा. मुंबईतले प्रत्येक बिल्डिंग हे काड्याच्या पेटीच्या आकाराचेच का असावे हे मला समजू शकत नाही. वास्तु-कलेमध्ये 'काड्याची पेटी' हा एकच आदर्श आमच्यापुढे अस्तित्वात आहे. काड्याच्या पेटीचाच उपयोग करून या अरिष्टापासून आपण आपल्या सौंदर्य-कल्पनेचा बचाव केला पाहिजे! माणसांची घरे काड्याच्या पेटीसारखी झाली की माणसेसुद्धा काड्याच्या पेटीतील काड्यासारखीच होऊ लागतात. कदाचित काड्याच्या पेटीचाच आकार बदलला तरीसुद्धा आपले वास्तुशास्त्रज्ञ वेगळ्या आकाराची घरे बांधू लागतील अशी एक कल्पना मनामध्ये येऊन जाते! पण त्या कल्पनेच्या आहारी जाणे म्हणजे प्राप्तकर्मापासून पलायन करण्यासारखे आहे. बुडत्याने सुताचा आधार शोधण्यासारखे आहे. माझ्यासारखा आततायी माणूस असल्या पोकळ आशावादावर जगत नसतो. मी आता कृतनिश्चय झालो आहे. काड्याच्या पेटीच्या आकाराचे कोणतेही घर तुमच्या पोराबाळांना दिस-णार नाही!

पण चिल्याचा दोस्त हा तुमच्या पोराबाळांचा वैरी असेल ही गोष्ट संभवत नाही. त्यांना जगवण्यासाठी मी नुकताच मनातल्या मनात सगळ्या शिक्षकांवर हल्ला केला आहे. तीन तासांपेक्षा अधिक वेळ कोणतेही लहान मूल शाळेमध्ये डांबले जाणार नाही; तीन विषयांपेक्षा अधिक विषय त्याच्या मानेवर लादले जाणार नाहीत. तुमच्या मुलाच्या वजनापेक्षा अधिक वजनाची पिशवी त्याच्या खाकोटीला टांगली जाणार नाही. मी अगदी हातघाईवर आलो आहे; तुमच्या मुलांच्या या ओझ्याखाली माझी पाठ वाकली आहे. माझी आततायी कल्पना-

शक्ती आपला व्यूह अगोदरच रचू लागली आहे. मी शिक्षणखात्याच्या सर्व अधिकाऱ्यांना शिक्षकांसहवर्तमान पुस्तकांच्या व वह्यांच्या एका एका प्रचंड डोंगराखाली अगोदरच गाडले आहे. सगळी पोरे बेहोषीमध्ये त्या ढिगाभोवती नाचू लागली आहेत. प्रत्येक पोराच्या खिशात एक चकमकीचा दगड आहे आणि त्याला हवे असलेले पोलाद मी स्वतःच घेऊन आलो आहे !

मनातल्या मनात केलेल्या या अत्याचारांबद्दल मला कोणी शिक्षा करू शकत नाही ही एक मोठी गंमत आहे. मनातल्या मनात केलेले अत्याचार म्हणजे गुन्हे नव्हेत अशी सोयिस्कर भूमिका आपल्या संस्कृतीने स्वीकारलेली आहे. मलाही ती मान्य आहे ! ती मान्य केली नाही तर वेडे तेवढेच तुरुंगाबाहेर राहतील; आणि कोणताही शहाणा मनुष्य हे मान्य करणार नाही. वेड्या माणसाप्रमाणे विचारात आततायी असणारा माझ्यासारखा शहाणा माणूस व्यवहारामध्ये अगदी मोजून मापून जगत असतो ! तेवढ्यामुळे कायद्याच्या कचाट्यातून सुटतो हे खरे, पण नैतिक दृष्ट्या मात्र आपण एक गुन्हेगार आहो ही गोष्ट त्याला मान्य करावी लागते. आपल्या इच्छाशक्तीचे सारे स्वातंत्र्य फक्त मनाच्या पातळीवरच अनुभवता येते; त्यामुळे तिथे घडणारे अत्याचार हेच तेवढे आपल्या स्वभावाचे खरेखुरे प्रतिनिधी असतात. तिथे होणाऱ्या घटनांपुरताच माणूस खऱ्या अर्थाने जबाबदार असतो.

म्हणूनच मनातल्या मनात केलेल्या या गुन्ह्यांची जबाबदारी मी नाकारीत नाही. मी एकदम कबूल करतो : मनात केलेल्या गुन्ह्यांकरता शिक्षा होत असती तर मी आजपर्यंत पन्नासदा फाशी गेलो असतो !

श्री दीपलक्ष्मी : दिवाळी १९६३

दा. क्र. ९७३९८

# रा तां बा

प्रथम रातांबा दिसेल; मग भटाची वाडी. तुम्ही कोणचीही घाटी चढून वर आलात तरी हाच अनुभव. आणि हीच तर गंमत आहे! सोनारघाटीने आलात तरी तुम्हांला प्रथम रातांब्याचा शेंडा दिसणार, मग मोरभटाचे घर; स्थानेश्वराच्या घाटीने आलात तरी प्रथम रातांब्याचा भरदार विस्तार आणि नंतर मग आमच्या गोठ्याची मागची बाजू. तुम्हाला वाटेल रातांबा उंच वृक्ष असेल. अजिबात नाही. घळणातली बिटकी ही त्याहूनही उंच आहे हे सगळा गाव जाणतो. इतकी उंच की त्यावरचे आंबे काढायला सध्या गावात गडीसुद्धा मिळत नाही. लख्या टुकरुल उमेदीत होता त्यावेळीं चढत असे; पण तो आता थकला; आणि मोरभटाचा बाळक्या चढेल, पण त्याला कोणी चढू देत नाही; वर गेला आणि फेपरे आले की सगळे आटपले. नाहीतर बाळक्या काय करील आणि काय नाही याचा अंदाज गावात कोणालाच करता येणार नाही...ही झाली घळणीतल्या बिटकीची गोष्ट. आमच्या गावातले सगळ्यात उंच झाड ते हेच पण गावात दबदबा आहे तो मात्र आमच्या रातांब्याचा. या नाही त्या संदर्भात रातांब्याचे नाव घेतल्याशिवाय भटवाडीचा एक दिवसही जाऊ शकत नाही. भटवाडीत यायचे म्हणजे रातांब्याला मुजरा करूनच मग पुढे पाऊल टाकावे लागेल; आणि भटवाडीतून जायचे म्हटले तरी हा रातांबाच तुम्हाला निरोप देण्यासाठी अर्धा तास हद्दीवरती उभा असल्याचा भास होईल. खरे म्हणजे रातांबा हाच खरा आमच्या वाडीतला कर्ता पुरुष आहे.

म्हणूनच रातांब्याचा उल्लेख टाळून भटवाडीतल्या कोणत्याही माणसाला बोलता येणार नाही. ज्यावेळी 'हापूस', 'माणकूर', 'लंगडा' वगैरे भल-त्याच आंब्यांची प्रशंसा भटवाडीतल्या एखाद्या माणसाच्या कानावर पडते, तेव्हा 'पण एकदा रातांब्याचा आंबा खाऊन बघा हो!' असे खोचदार उद्गार काढल्याशिवाय तो राहणार नाही. 'मुंबईतला राजाबाई टॉवर फार उंच आहे' असे तुम्ही म्हणालात तर भटवाडीतली पोरे 'अगदी रातांब्यापेक्षा!' या दोनच शब्दानी तुम्हांला उत्तर देतील. परका माणूस भटवाडीत शिरल्यावर त्याला त्या गावाचा भूगोल आणि इतिहास रातांब्याच्या संदर्भातच शिकावा लागेल. 'स्थानेश्वराकडे जायची वाट कोणची' म्हणून विचारलेत तर 'रातांब्याजवळून घाटीने खाली व्हा' हे उत्तर मिळेल. काशीकर गोडश्याकडे जावून मंत्राचे पाणी घ्यायचे असेल तर 'रातांब्याजवळच्या पालंडीने उजव्या बाजूला वळा' म्हणून सांगतील. आणि आमच्याकडे येण्यासाठी 'हायकोर्टवाले करंदीकर कुठे राहतात?' म्हणून चौकशी केलीत तर 'रातांब्याच्या समोर' एवढी माहिती पुरेशी होईल. मात्र हायकोर्टवाल्या करंदीकराकडे येणारा हा परका मनुष्य कसा आहे हे पहाण्यासाठी माहिती देणारा मनुष्य एकदा खालपासून वरपर्यंत दृष्टी फिरवल्याशिवाय राहाणार नाही.

आम्ही 'हायकोर्टवाले' करंदीकर झालो तेही या रातांब्यामुळेच. मोरभट गोखले आणि माझे आजोबा आप्पाजी करंदीकर यांच्यामधला तो गाजलेला वाद भटवाडीतच नव्हे तर आसपासच्या पाचदहा गावात सर्वांच्या परिचयाचा आहे. रातांबा हाच त्या वादातला नायक होता; हवा तर खलनायक म्हणा! प्रश्न एवढाच होता : रातांबा हा गोखल्यांचा, करंदीकरांचा की हद्दीवरचा. गावातले म्हारपोर म्हणे, 'आंबो हा हद्दीवरचो; भटाक उद्योग नाय म्हणून भांडत बसतत!' पण करंदीकर आणि गोखले हे नेहमी तत्त्वाकरता भांडत! आणि त्याची ही तत्त्वनिष्ठाच त्यांना हायकोर्टातही घेऊन गेली. या बाजूची हायकोर्टात गेलेली तीच पहिली केस. करंदीकर आणि गोखले यांच्या दोन पिढ्यांना हा कज्जा पुरून उरला, आणि त्या मुदतीत भटवाडीच्या कोणत्याच माणसाला बातमीसाठी वर्तमानपत्राची किंवा जुगारीसाठी शब्दकोड्यांची जरूरी

भासली नाही. या प्रतिवादींनी दररोज परस्परांविरुद्ध केलेल्या कारवायांचे स्थानिक बातमीपत्र लोकांची करमणूक करायला समर्थ होते! आणि कज्जाचा निकाल जवळ आला की निकाल कोणाच्या बाजूने होणार याबद्दल खोताच्या दुकानावर पन्नास पन्नास नारळांच्या पैजा लागत!...रातांब्यावर चढून खाडीच्या बंदराकडे पाहिलेत तर भेंडीच्या ठुसक्या झाडाजवळ त्या दुकानाचा चौथरा तुम्हाला अजूनही दिसेल.

पुढे पुढे या रातांब्यामुळे भटवाडीतील ब्राह्मणात दोन चांगलेच तट पडले होते. करंदीकरांचे पक्षपाती म्हणत, 'झाड कोणी लावले ते कागदोपत्री सिद्ध होण्यासारखे नाही. ते सध्या करंदीकरांच्या हद्दीत आहे ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्वच्छ आहे.' गोखल्यांच्या बाजूचे लोक म्हणत, 'झाड मोरभटाच्या बापसाने लावलेले. बरे, आज वहिवाटही त्याचीच. झाड काही हाललेले नाही. हालली असली तर हद्द.' पण त्या वेळच्या कुळंब्यांना भटांनी काढलेले हे सूक्ष्म भेद कळत नसत. ते म्हणत 'झाड हद्दीवरचा हा येवडा खरा; आंबे काढूचे नि मुकाट्यान् वाटून घ्येवचे. गुरवांच्या फणसाचो न्याय केलानी; तोच हंय करूचो.' पण रातांब्याच्या बाबतीत गोखले आणि करंदीकर यांच्यात तडजोड घडवून आणणे कोणालाच शक्य झाले नाही. आमच्या घरी कोणी प्रतिष्ठित पाहुणे आले की आप्पा त्यांना रातांब्याकडे घेऊन जात. त्यावेळी त्यांचे वय साठीच्या घरात होते; पण तरीसुद्धा त्यांची चाल तरतरीत असे. रातांब्याचा विषय निघाला की त्यांना विशेष स्फुरण येई. एक उडी मारून ते हद्दीवरच्या गडग्यावर चढत आणि आपल्या एका हाताचा वेढा आंब्याच्या खोडाला घालून सुरुवात करीत, "आता तुम्हीच सांगा; हा आंबा...ही हद्द. पुन्हा हा गडगा चाळीस वर्षांपूर्वीचा; सर्वेमध्ये नोंदलेला. बरे, हे झाड जर तुम्ही आपले म्हणता तर याच रेषेतली ती पुढची झाडे आमची कशी मानता?... वहिवाट कोणाची?...वहिवाट असेल तर काय झाले. वडील वीस वर्षे त्या अवस्थेत आणि आम्ही पोरे...सगळे खोऱ्यांनी ओढून घेतलेनी तेवढ्यात...मुंबईहून येणाऱ्या मनिऑर्डरीची धुंदी आहे हो ही...अरे पण मी यांच्या पैशांवर ..." मग आप्पांच्या तोंडून नको ते शब्द निघून जात. त्यांचे डोळे लाल होत;

त्यांचे हात थरथरू लागत. पाव्हणे म्हणत, " खऱ्याला मरण नाही. " पलीकडच्या परसातून मोरभट ओरडे, " होय, मीसुद्धा तेच म्हणतो. खऱ्याला मरण नाही. " मोरभटाला कंपवायू असे; त्यामुळे त्याची मान डुलकडुलक हालत राही; त्याला काठीशिवाय चालता येत नसे, पण तरीसुद्धा त्याचा आवाज खणखणीत होता. आपल्या परसवातून ओरडे, " खऱ्याला मरण नाही हेच मीसुद्धा म्हणतो. हायकोर्टात जा, नाहीतर हवे तिथे जा; मी आपण होऊन हायकोर्टाची पायरी चढणार नाही आणि वहिवाट सोडणार नाही. माझे हायकोर्ट सगळे इथेच; या व्याघ्रेश्वराजवळ. "

त्यावेळीं आम्ही पोरेसुद्धा या वादाने झपाटलेली होतो. रातांब्याचे आंबे पिकायला लागले म्हणजे आम्हीसुद्धा आपापल्या परसवावर करडा पहारा करीत असू; त्यावेळीं स्वतःच्या परसवात मिळालेल्या दहा आंब्यांपेक्षा दुसऱ्याच्या परसवातून आणलेला एक आंबा आम्हाला अधिक महत्त्वाचा वाटे. मी आणि माझा धाकटा भाऊ बापू आमच्या परसवातून म्हणू,

" पडपड आंब्या रातांब्या
रातांब्याची कोय कोय
फुटली गोखल्यांची डोय डोय "

80936 ... 9408

मग पलीकडच्या परसवातून बाळक्याचा आवाज निघे,

" पडपड आंब्या रातांब्या
रातांब्याची कोय कोय
फुटली करंदीकरांची डोय डोय "

" पण ' करंदीकर ' हा शब्द जमतो आहे कुठे ? म्हणजे ' फुटली गोखल्यांची डोय डोय ' हेच खरे. " असा मी महत्त्वाचा मुद्दा काढी. पण बाळक्या तिकडे लक्ष न देता ' फुटली करंदीकरांची डोय डोय ' हीच ओळ पुन्हा पुन्हा आमच्याहून मोठ्या आवाजात बोकीत बसे.

शाळेच्या वाटेवर पुन्हा बाळक्याचा आणि माझा वाद होई. मी म्हणे,

" रातांबा तुम्ही आपला कसा रे म्हणता ? "

" पाळे कुठे आहेत बघ. "

" पाळावरून काय ठरणार ? झाड कुठे आहे बघ. "

" वा:, हायकोर्ट पाळेच म्हणून बघणार; हवे तर या राऊताच्या दिग्याला विचार. "

दिग्याचा बाप हायकोर्टात पट्टेवाला असे; त्यामुळे त्याच्या शब्दाला महत्त्व होते. दिग्या गंभीरपणे म्हणे,

" पाळे तर बघतातच; पण मुख्य म्हणजे सावली कोणाच्या परसात पडते ते बघतात. "

मी म्हणे, " सावलीचा काय संबंध ? "

बाळक्या म्हणे, " वा, मग हायकोर्ट म्हणजे काय समजलास ? हायकोर्ट हेच बघणार; एक पाळे आणि दुसरी सावली. सावली तर नेहमी आमच्याच परसात पडते. "

मग त्या दिवशी शाळेच्या अभ्यासात माझे लक्ष नसे. सावली कोणाच्या परसात पडते हेच मी पुन्हा पुन्हा आठवीत बसे...मग रातांब्याच्या आंब्या-पेक्षा रातांब्याची सावलीच अधिक महत्त्वाची वाटे...शाळेतून परत येई-पर्यंत पार संध्याकाळ होई आणि रातांब्याची लांबट सावली थेट मोरभटजींच्या घरापर्यंत पोचलेली दिसे...रात्री निजण्याच्या वेळेला पुष्कळदा एक हुमणे रातां-ब्यावर बसून ' हूं हूं ' करी...आम्हाला वाटे ते घुबडच असावे...पण आप्पा म्हणत, ' अरे ते हुमणे आहे हो; त्याची भीति नसते '...पण आम्हाला वाटे ते घुबडच असणार...आम्ही आईच्या कुशीत शिरू...तिची छातीसुद्धा धड-धडत असे. आप्पा खळ्यात जाऊन त्या हुमण्याला शिव्या घालीत; दोन चार दगड फेकीत; मग ते हुमणे देखील हळूहळू ओरडायचे बंद होई; काही वेळाने घळणातल्या बिटकीकडून एक अंधुक ' हूं हूं ' असा आवाज येई; पण तो फारच अस्पष्ट असे. रातांब्यावर हुमणे किंवा घुबड ओरडू लागले की मला वाटे, ' हा आंबा आमचा नव्हे; तो मोरभटाचाच असावा. ' पण दिवस उजाडला म्हणजे मग आमचा रातांबा आम्हाला हवा असे; पुन्हा ईर्षा चढू लागे; पुन्हा वादाला सुरवात होई.

आता गोखले आणि करंदीकर यांचे वाद कायमचेच संपले आहेत. गोखल्यांचे परसव शिवगणांकडे गेले आणि आमचे टुकरूलाकडे. पण त्या भांडखोर हद्दीवर स्वतःचा तोल सावरीत रातांब्याचा तो अजस्र महावृक्ष अजूनही धीरगंभीर वृत्तीने उभा आहे. त्याच्या त्या भरीव विस्तारात एक विलक्षण अहंभाव दाटलेला आहे. कलमांच्या नव्या लागवडीमुळे आसपासची पुष्कळ रायवळ झाडे आता तुटून गेली आहेत. पण तरीही आपण रायवळांचे राजे आहोत ही गोष्ट तो विसरलेला नाही. भटवाडीत उरलेला हाच शेवटचा रायवळ आंबा आहे. म्हणूनच तो असा अहंभावी, एकलकोण्डा, आपल्या एकलेपणाचे सामर्थ्य मिरवीत अजूनही उभा आहे. मला वाटते त्याच्या या दुर्दम्य अहंतेचा वास आसपासच्या कलमांनाही येत असावा. ती दूर दूर अदबीने उभी आहेत; पण आपल्या फांद्या लांब करून रातांब्याला स्पर्श करण्याचे धैर्य अजून कुणालाच झालेले नाही; आणि तोही कुणाशी संबंध जोडण्याची क्षुद्र खटपट करीत नाही. हद्दीवर उभे रहाण्यातली धुंदी त्याने भोगलेली आहे; गोखले आणि करंदीकर निघून गेले; तरी शिवगण आणि पडवळ अजून मागे आहेत ही गोष्ट तो विसरलेला नसावा! पण कदाचित त्याची ती धीरगंभीर वृत्ती, ही अहंता हाही एक आभास असू शकेल. जुगाबाईच्या डोंगरावरून भटवाडीकडे पाहिलेत म्हणजे तुम्हाला असेच वाटेल; कारण त्या डोंगरावरून रातांब्याचे निराळेच रूप आपल्या अनुभवाला येते; आपली मान उंटासारखी उंच करून चमत्कारिक कुतूहलाने तो फक्त त्या घळणातल्या बिटकांकडे पहात असतो.

नवयुग : दिवाळी १९५८

# आणखी काही घड्याळे

माझ्या मताने खरी घड्याळे अजून निघायचीच आहेत. ज्या कालाची माणसाला अनादिकालापासून ओढ लागलेली आहे, तो वैश्विक काल मोजणारे घड्याळ अजून निघालेलेच नाही. आणि प्रत्येक क्षणाक्षणाला वेगवेगळ्या स्वरू-पात जाणवणारा आत्मगत कालही अजून घड्याळ ह्या यंत्राला अज्ञात आहे. अर्थात सध्या उपलब्ध असलेल्या घड्याळाचा काहीच उपयोग नाही, पण काल-मापन हेच घड्याळाचे मुख्य कार्य असे मानण्यात येते; आणि नेमकी तेवढीच गोष्ट त्याला कधी करता येत नाही. माझ्या माहितीच्या एका सधन गृहस्थांनी आपल्या कुत्र्यासाठी नुकतेच एक अडीचशे रुपयांचे रिस्टवॉच घेतले ! कुत्र्याला काय वाटत असेल ते असो; पण त्यांना मोठे समाधान वाटले. कुत्र्याच्या हातात ( म्हणजे त्याच्या पुढच्या पायात ) ते घड्याळ बांधून ते जेव्हा आपल्या क्लब-मध्ये जातात, तेव्हा त्यांना काहीतरी वेगळा आनंद निश्चित होत असला पाहिजे. यावरून मनगटावरील घड्याळ हे निरागस आनंदाचे एक साधन आहे असे कोणी म्हटले तर ते मला नाकारता येणार नाही ! पण घड्याळ बनवणाराने ते वेगळ्या हेतूने बनवलेले होते, यात संशय नाही. आपण कालमापनाचे एक यंत्र हुडकून काढले आहे, याबद्दल त्याची खात्री होती. आणि नेमका इथेच त्या यंत्राने त्याला दगा दिला. वस्तुतः याहून भिन्न असे अनेक उपयोग असलेली एक वेगळीच अद्‌भुत वस्तू त्याने निर्माण केली होती. संशोधनाच्या क्षेत्रात हा चमत्कार नेहमीच घडत असतो; संशोधक एक गोष्ट शोधण्यासाठी प्रयोगशाळेत शिरतो आणि दुसरीच चीज घेऊन प्रयोगशाळेच्या बाहेर पडतो. काही वेळा हा

अनपेक्षित शोध अपेक्षित शोधापेक्षा अधिक मोलाचाही असू शकतो. पण म्हणून काही आपण त्या दोन्ही शोधांची गल्लत करू शकत नाही. घड्याळाचे असेच आहे.

घड्याळाचा उपयोग असतो; पण तो कालमापनासाठी नव्हे. मनगटावरील घड्याळाचा मुख्य उपयोग आपणाला मनगट आहे या गोष्टीची जाणीव करून देणे हा असतो. आपल्याला मनगट आहे—आणि त्या मनगटाला नुसती लांबीच नव्हे तर रुंदीही आहे—ही गोष्ट घड्याळ वापरू लागल्यावरच आपल्या लक्षात येते. आपल्या मनगटाकडे टक लावून पाहण्याचा प्रसंग सामान्य माणसाच्या आयुष्यात एरवी क्वचितच येत असतो. आपल्या सामाजिक व राजकीय अपेक्षांचा भंग झाल्यामुळे मनगटे चोळीत बसण्याचा प्रसंग अनेकदा येतो, ही गोष्ट खरी; पण त्यावेळी आपले लक्ष सरकारवर, प्रतिपक्षावर किंवा एखाद्या पुढाऱ्यावर रोखलेले असते. खरे म्हणजे आपला अपेक्षाभंग होण्याचे प्रमुख कारण आपल्या मनगटावरच लिहिलेले असते. कपाळावरच्या रेषा नियतीने काढलेल्या असल्या, तरी मनगटावरच्या रेषा या खास आपल्या मालकीच्या असतात. त्या ज्याला वाचता येतात, त्याचा अपेक्षाभंग करणे फार कठीण असते. स्वतःविषयी व जगाविषयी तो भलत्याच अपेक्षा बाळगू शकत नाही. आपल्या मनगटाचे अपयश आपल्या नशिबावर लादून स्वतः ‘ नामानिराळा ’ होण्याचा भ्याडपणा तो करू शकत नाही. म्हणून विचारी माणसाने दिवसातून एकदातरी आपल्या मनगटाकडे पाहिले पाहिजे; चांगले निरखून पाहिले पाहिजे; निदान मनगटावर आपले घड्याळ बांधताना !

मनगटावर घड्याळ बांधण्याची कल्पना प्रथम ज्याच्या डोक्यात आली त्याला घड्याळाचा हा उपयोग कळलाच नसेल असे म्हणण्याचे धाष्टर्य मी करणार नाही. एरवी पोटाच्या गुबगुबीत व उबदार आसनावरून त्याची उचलबांगडी करून मनगटावरील धकाधकीच्या मामल्यात आपले घड्याळ त्याने ढकलले नसते. एक काळ असा होता की, कोटाला कमीतकमी सात बटणे असल्या-शिवाय चांदीच्या छड्याला लोंबणारे ते खिशातले घड्याळ जवळ बाळगण्याचा

# आणखी काही घड्याळे

माझ्या मताने खरी घड्याळे अजून निघायचीच आहेत. ज्या कालाची माणसाला अनादिकालापासून ओढ लागलेली आहे, तो वैश्विक काल मोजणारे घड्याळ अजून निघालेलेच नाही. आणि प्रत्येक क्षणाक्षणाला वेगवेगळ्या स्वरूपात जाणवणारा आत्मगत कालही अजून घड्याळ ह्या यंत्राला अज्ञात आहे. अर्थात सध्या उपलब्ध असलेल्या घड्याळाचा काहीच उपयोग नाही, पण कालमापन हेच घड्याळाचे मुख्य कार्य असे मानण्यात येते; आणि नेमकी तेवढीच गोष्ट त्याला कधी करता येत नाही. माझ्या माहितीच्या एका सधन गृहस्थांनी आपल्या कुत्र्यासाठी नुकतेच एक अडीचशे रुपयांचे रिस्टवॉच घेतले ! कुत्र्याला काय वाटत असेल ते असो; पण त्यांना मोठे समाधान वाटले. कुत्र्याच्या हातात ( म्हणजे त्याच्या पुढच्या पायात ) ते घड्याळ बांधून ते जेव्हा आपल्या क्लबमध्ये जातात, तेव्हा त्यांना काहीतरी वेगळा आनंद निश्चित होत असला पाहिजे. यावरून मनगटावरील घड्याळ हे निरागस आनंदाचे एक साधन आहे असे कोणी म्हटले तर ते मला नाकारता येणार नाही ! पण घड्याळ बनवणाराने ते वेगळ्या हेतूने बनवलेले होते, यात संशय नाही. आपण कालमापनाचे एक यंत्र हुडकून काढले आहे, याबद्दल त्याची खात्री होती. आणि नेमका इथेच त्या यंत्राने त्याला दगा दिला. वस्तुतः याहून भिन्न असे अनेक उपयोग असलेली एक वेगळीच अद्‌भुत वस्तू त्याने निर्माण केली होती. संशोधनाच्या क्षेत्रात हा चमत्कार नेहमीच घडत असतो; संशोधक एक गोष्ट शोधण्यासाठी प्रयोगशाळेत शिरतो आणि दुसरीच चीज घेऊन प्रयोगशाळेच्या बाहेर पडतो. काही वेळा हा

अनपेक्षित शोध अपेक्षित शोधापेक्षा अधिक मोलाचाही असू शकतो. पण म्हणून काही आपण त्या दोन्ही शोधांची गल्लत करू शकत नाही. घड्याळाचे असेच आहे.

घड्याळाचा उपयोग असतो; पण तो कालमापनासाठी नव्हे. मनगटावरील घड्याळाचा मुख्य उपयोग आपणाला मनगट आहे या गोष्टीची जाणीव करून देणे हा असतो. आपल्याला मनगट आहे—आणि त्या मनगटाला नुसती लांबीच नव्हे तर रुंदीही आहे—ही गोष्ट घड्याळ वापरू लागल्यावरच आपल्या लक्षात येते. आपल्या मनगटाकडे टक लावून पाहण्याचा प्रसंग सामान्य माणसाच्या आयुष्यात एरवी क्वचितच येत असतो. आपल्या सामाजिक व राजकीय अपेक्षांचा भंग झाल्यामुळे मनगटे चोळीत बसण्याचा प्रसंग अनेकदा येतो, ही गोष्ट खरी; पण त्यावेळीं आपले लक्ष सरकारवर, प्रतिपक्षावर किंवा एखाद्या पुढाऱ्यावर रोखलेले असते. खरे म्हणजे आपला अपेक्षाभंग होण्याचे प्रमुख कारण आपल्या मनगटावरच लिहिलेले असते. कपाळावरच्या रेषा नियतीने काढलेल्या असल्या, तरी मनगटावरच्या रेषा या खास आपल्या मालकीच्या असतात. त्या ज्याला वाचता येतात, त्याचा अपेक्षाभंग करणे फार कठीण असते. स्वतःविषयी व जगाविषयी तो भलत्याच अपेक्षा बाळगू शकत नाही. आपल्या मनगटाचे अपयश आपल्या नशिबावर लादून स्वतः ' नामानिराळा ' होण्याचा भ्याडपणा तो करू शकत नाही. म्हणून विचारी माणसाने दिवसातून एकदातरी आपल्या मनगटाकडे पाहिले पाहिजे; चांगले निरखून पाहिले पाहिजे; निदान मनगटावर आपले घड्याळ बांधताना !

मनगटावर घड्याळ बांधण्याची कल्पना प्रथम ज्याच्या डोक्यात आली त्याला घड्याळाचा हा उपयोग कळलाच नसेल असे म्हणण्याचे धाष्ट्यं मी करणार नाही. एरवी पोटाच्या गुबगुबीत व उबदार आसनावरून त्याची उचलबांगडी करून मनगटावरील धकाधकीच्या मामल्यात आपले घड्याळ त्याने ढकलले नसते. एक काळ असा होता की, कोटाला कमीतकमी सात बटणे असल्या-शिवाय चांदीच्या छड्याला लोंबणारे ते खिशातले घड्याळ जवळ बाळगण्याचा

नैतिक अधिकार माणसाला प्राप्त होत नसे. त्या घड्याळाची मिजास वेगळी होती. त्याला खानदानाची ऐट होती. ती घड्याळे वापरणारे लोक त्या घड्याळा-प्रमाणेच आपल्या भावनासुद्धा आतल्या खिशात दडवून ठेवीत. त्याचे मनगटावर प्रदर्शन होत नसे. त्या काळी खासगी वेळ अशी एक वस्तू शिल्लक होती. आपला वेळ म्हणजे अगदी खास आपला; आणि तो आपण अगदी जपून आपल्याकरता व आपल्याशीच ठेवला आहे, अशी भावना त्या घड्याळाशी संबंधित झालेली होती. बसमधील आपल्या जागेवरून हळूच दुसऱ्याच्या घड्याळात डोकावणे त्यावेळी शक्य नसे. खरे म्हणजे, अशा प्रकारे दुसऱ्याच्या घड्याळात डोकावणे म्हणणे त्याच्या खिशात हात घालण्यासारखेच आहे. कायद्याला बगल देऊन दुसऱ्याचे घड्याळ चोरण्याचा हा एक शहाजोग मार्ग आहे!

आपल्या खिशातील घड्याळात किती वाजले हे पाहून दुसऱ्याला ते सांगणे या गोष्टीला जुन्या काळी एखाद्या सामाजिक कार्याचे वजन असे! मुळात माणसेच वजनदार होती आणि तशीच त्यांची घड्याळेही. खिशातून मोठ्या हिमतीने आपले घड्याळ बाहेर काढणे, हातरुमालाने त्याची काच पुसणे, मोठ्या महत्त्व-पूर्ण नजरेने त्यातील वेळेचा अंदाज घेणे आणि शेवटी तो दुसऱ्याला सांगणे, या सगळ्या बारिकसारीक क्रिया त्या माणसांच्या विशिष्ट व्यक्तित्वाने भारलेल्या असत. किल्ली देणे म्हणजे तर एक मोठा विधीच असे! माझे वडील घड्याळाला किल्ली देताना फार गंभीर चेहरा करीत; आणि किल्ली देऊन झाली की, मोठ्या गंभीर नजरेने आमच्याकडे पाहात. त्या गांभी-र्याचा अर्थ मला अजूनही लागलेला नाही. त्यांनी ते घड्याळ केव्हा घेतले याचाही आम्हाला पत्ता नव्हता. आई म्हणे, ते त्यांना आमच्या आजोबांनी दिले. ते घड्याळ जवळजवळ तीस वर्षे ते सतत वापरीत होते. त्याची दुरुस्ती झाल्याचेही मला आठवत नाही. माझे वडील वारले त्या दिवशी निव्वळ आम्ही किल्ली द्यायला विसरलो म्हणूनच ते बंद पडले होते. दुसऱ्या दिवशी किल्ली देण्यासाठी ते मी प्रथम आपल्या हातात घेतले, त्यावेळी माझा चेहेरा माझ्या वडिलांसारखाच गंभीर झाला होता; आणि तशाच गंभीर नजरेने मी माझ्या मुलांकडे पाहात होतो...काहीतरी पूर्वी घडलेलेच पुन्हा एकदा घडत आहे, असा

मला भास होत होता. कालचे आणखी एक आवर्तन सुरू होत होते...पुन्हाही असेच घडणार होते...जाणिवेमध्ये पुनरावृत्त होणारी कालाची ही आवर्तने मोजणारे घड्याळ अजून निघायचेच आहे!

कालाची आत्मगत जाणीव आणि घड्याळ मोजते तो काळ, यात फार मोठे अंतर असते. स्वप्नाचे मानसशास्त्रीय विश्लेषण करणारांनी हा फरक केव्हाच स्पष्ट केला आहे. आपणाला जेवढा वेळ स्वप्न पडत असते तो काळ, आणि आपल्या स्वप्नामध्ये आपल्याला प्रत्यक्ष जाणवतो तो काळ यांच्यात फार तफावत पडते. वस्तुतः आपणाला स्वप्न पडते ती क्रिया फारतर दोन-तीन मिनिटेच सुरू असते. पण स्वप्नामध्ये मात्र कित्येक दिवसांचा कालावधी लोटल्याची जाणीव आपण अनुभवू शकतो. आपल्याला जाणवणारा काळ हा घड्याळाने मोजलेल्या काळापेक्षा भिन्न असतो, ही गोष्ट जागृत व्यवहारातसुद्धा आपल्या नेहेमी प्रत्ययास येत असते. एखादे पडेल नाटक पाहात असताना तीन तासांऐवजी तीन युगे लोटल्याचा प्रत्यय मला नवीन नाही. या उलट, हेमिंग्वेचे ‘ओल्ड मॅन अँड द सी’ हे पुस्तक वाचीत असताना काळाची जाणीवच हरवून गेल्याचा अनुभव मला आलेला आहे. आपण अनुभवीत असलेला काळ आणि घड्याळाने मोजलेला काळ हे एक झाले तर माणसाचे यंत्र झाले असेच म्हणावे लागेल. माणसाचे यंत्र करण्याऐवजी घड्याळाचेच मानवीकरण झाले पाहिजे. खरे म्हणजे घड्याळातील तीन काट्यांच्या जोडीला आणखी एक चौथा काटा हवा. त्याच्या सहाय्याने ही आत्मगत अशी काळाची जाणीव आपणाला मोजता आली पाहिजे. असे घड्याळ निघाले तर सातत्य आणि भंगुरत्व यांचा एकदम प्रत्यय घेणे आपणाला सहज शक्य होईल. या नव्या घड्याळाला ‘खिशातील तत्त्वज्ञ’ असेच म्हणावे लागेल. आणि एका अर्थाने हा तत्त्वज्ञ डायोजिनीझपेक्षा अधिक मोठा मानावा लागेल; कारण डायोजिनीझला निदान एक ‘टब’ तरी लागत असे; पण हा तत्त्वज्ञ आपल्याकडे कोटाच्या लहानशा खिशापेक्षा अधिक जागा बिलकुल मागणार नाही.

आत्मगत काळ हा बहुरूपी आहे. व्यक्तिव्यक्तीगणीक त्याचे स्वरूप बदलत

असते; एवढेच नव्हे तर, एका व्यक्तीच्या आयुष्यातही निरनिराळ्या प्रसंगी निरनिराळी सोंगे घेऊन तो फिरत असतो. म्हणूनच शास्त्रज्ञाने त्याची दखल घेण्याची फारशी जरूरी नाही, असे कोणी म्हणेल तर त्याला माझे उत्तर आहे. ज्या काळाची मोजदाद घड्याळ ठेवत असते तो वस्तुनिष्ठ काल तरी या विभ्रमापासून मुक्त आहे का ? तो तरी वैश्विक व निरक्षेप अवस्थेत आपल्याला मोजता येतो का ? आइन्स्टाईनच्या सापेक्षतावादाप्रमाणे घड्याळाने मोजला जाणारा हा वस्तुनिष्ठ कालसुद्धा निरपेक्ष नसतो. त्याचाही संकोच आणि विस्तार होऊ शकतो. पॉल लॉंजेव्हा ( Paul Langevin ) या विचारवंताने एका काल्पनिक प्रयोगाच्या रूपाने ही वस्तुस्थिती आपल्यापुढे मांडलेली आहे. त्याने कल्पिलेल्या अंतरिक्ष-बाणाचा वेग प्रकाशापेक्षा फक्त एकवीस हजाराने कमी आहे. त्या बाणात बसून मी पृथ्वी सोडली व एक वर्ष सतत अंतराळात प्रवास केला असे समजा; नंतर एका अज्ञात ताऱ्याला टक्कर मारून मी परत पृथ्वीकडे यायला निघालो व आणखी एक वर्ष प्रवास करून पुन्हा परत पृथ्वीवर आलो. म्हणजे पृथ्वी सोडून मला फक्त दोन वर्षे झाली आहेत. समजा, त्यावेळी माझे वय बेचाळीस असले तर ते आज चौवेचाळीस झाले आहे. पण याच अवधीमध्ये तुमच्या पृथ्वीवरील वयात केवढे अंतर पडेल याची कल्पना तुम्हाला करता येईल काय ? पॉल लॉंजेव्हाच्या गणिताप्रमाणे मी पृथ्वी सोडताना तुमचे वय पंचवीस वर्षांचे असेल तर ते आज दोनशे पंचवीस वर्षे झालेले असणार. माझे घड्याळ फक्त दोन वर्षांचाच अवधी मोजणार, तर तुमचे घड्याळ या मुदतीत दोनशे वर्षांचा अवधी मोजणार ! याचा अर्थ तुम्हाला एवढे दीर्घायुष्य लाभले तरच तुमची आमची पुन्हा गाठ ! सारांश, ज्यास आपण वस्तुनिष्ठ काळ म्हणून समजतो, तोसुद्धा संदर्भायत्त आहे; संदर्भसंस्थेनुसार ( frame of reference ) कालाचा प्रत्यय बदलू शकतो. कालही स्थलसापेक्ष होतो; गुरुत्वाकर्षणाच्या विशिष्ट घटनेनुसार या वस्तुनिष्ठ काळाचाही संकोच किंवा विस्तार होत असतो. इतकेच नव्हे तर, कार्यकारणाने बद्ध असलेल्या विशिष्ट घटना सोडल्यास, ' आधी ' आणि ' मग ' हा घटनांचा अनुक्रमसुद्धा अटळ नसतो ! तेव्हा आत्मगत काल हाच तेवढा सोंगाड्या आहे असे समजण्याचे कारण नाही. वस्तुनिष्ठ काळ हासुद्धा नाटके करीत असतो; फक्त त्याचे ते नाटक

विश्वाच्या विशाल रंगमंचकावर घडत असते !

पण माणसाचे मन चमत्कारिक असते. नाटकाची रंगत चाखल्यावर त्याला तो नटही पाहावासा वाटतो ! आत्मगत काळाची व वस्तुनिष्ठ काळाची ही विविध सोंगे आणणाऱ्या त्या वैश्विक काळाचे मूळ स्वरूप काय आहे, हे समजून घेतल्याशिवाय त्याची तृती होत नाही...या विभ्रमांच्या पलीकडील असे काळाचे स्वरूप कोणते ? लॉजेव्हाच्या काल्पनिक प्रयोगाच्या आधारानेच आपण असा प्रश्न विचारू शकतो. पृथ्वीवरून मी निघालो तो क्षण व परत मी पृथ्वीवर आलो तो क्षण — हे दोन्ही क्षण आपण दोघेही अनुभवू शकतो. त्या दोन क्षणातील अंतर माझे घड्याळ ' दोन वर्षे ' मोजते तर तुमचे, ' दोनशे वर्षे ' असे मोजते एवढेच. पण ज्याअर्थी या प्रयोगात पहिला व नंतरचा असे दोन्ही क्षण आपण एकदमच अनुभवण्याची शक्यता आहे, त्याअर्थी या दोघांनाही पोटात घेणारा असा एक वैश्विक काल असलाच पाहिजे. या काळाचा शोध घेणे म्हणजेच विश्वाचे एक अंतिम परिणाम हुडकून काढणे. तत्त्वज्ञानाला त्याचीच तहान लागलेली असते. कारण, जो मोजता येतो तो काळ नव्हे; ज्यामध्ये मोजण्याची क्रिया घडू शकते तो काळ. आणि स्थलाच्या बाबतीतही असेच म्हणता येईल. जे मोजता येते ते स्थल नव्हे; ज्यामध्ये मोजता येते ते स्थल. विश्वाचे अंतिम परिमाण असलेला हा खरा काल आपल्याला कधीच मोजता येणार नाही...निदान आपल्याजवळ आहेत त्या घड्याळांना तरी तो नेहमीच अज्ञात राहील. तो मोजणारे घड्याळ कसे असेल ?...त्याच्यामध्ये किती काटे असतील ?...ते घड्याळ केव्हातरी माझ्यापुढे निश्चित येईल... त्यावेळी घड्याळ करणारा कुठे असेल ? त्या घड्याळातच...आणि पाहणारा ? तोही तिथेच !

सुगंध : दिवाळी १९६१

# कोश आणि कैवल्य

एका पाश्चात्त्य चित्रकाराने आपल्या विनोदी चित्रामध्ये चालताचालता करमणुकीसाठी शब्दकोश वाचणारा विक्षिप्त पंडित दाखविलेला आहे. हे चित्र मी प्रथम पाहिले तेव्हा चांगला खदखदून हसलो. त्या चित्रातला आशय मित्रमंडळींना सांगून त्यांनाही हसविले. पण ते चित्र पाहून आता मात्र मला पहिल्यासारखे हसायला येईल असे वाटत नाही. त्या पंडिताला कशात आनंद वाटावा हे ठरवणारा मी कोण ? वैयक्तिक अभिरुचीचे स्वातंत्र्य गृहीत धरले की सर्वसामान्य दंडक कोलमडून पडतात. प्रमाणकल्पना हादरली की विनोदाचा पायाच हादरला. विनोद हा मूलतःच समाजशरण असतो. माणूस विकासाच्या पुढच्या टप्प्यावर पोचला की आपल्या सर्व प्रमाणकल्पना किती अस्थिर असतात हे त्याला उमगू लागते आणि प्रत्येक माणसाचा स्वतःच्या पद्धतीने सुखी होण्याचा हक्क तो मान्य करू लागतो.

करमणुकीसाठी शब्दकोश वाचणारा पंडित हा मला आता पूर्वीइतका विक्षिप्त वाटत नाही. एखादा डफ्फर सिनेमा पाहण्यासाठी चारचार तास रांगेत उभे राहणारे लोक मी ठिकठिकाणी पाहतो. एकजण चेंडू कसा मारतो आणि इतर अकरा लोक तो कसा पकडतात, हे पाहण्यासाठी तासन्तास तळपत्या उन्हात ताटकळत राहणारे हजारो लोक काहीतरी अमानुष करीत असतात, त्याबद्दल माझी खात्री आहे; पण तसे म्हणण्याची ताकद नाही, म्हणूनच केवळ मी गप्प

बसतो. हातामध्ये ट्रॅन्झिस्टर घेऊन थंड हवेच्या ठिकाणी इतरांचे डोके तापवणारे लोक मी सहन करतो. खरे म्हणजे मला हे सगळेच भयंकर वाटते. पण आता मी हमरीतुमरीवर येत नाही. त्या कमनशिबी लोकांना आनंदाचे दुसरे साधन उपलब्ध नाही ही गोष्ट लक्षात आली की माणसाला त्यांच्या असहायतेची दया येते. या अघोरी सामुदायिक विक्षिप्तपणाशी तुलना करता कोश वाचणाऱ्या पंडिताचा निरागस विक्षिप्तपणा मला अधिक जवळचा वाटतो. काही वेळा तर त्या पंडिताविषयी चोरटा आदर मला वाटत असावा असाही संशय येतो.

तसे पाहिले तर शब्दकोश हा मुळातच अद्‌भुत ग्रंथ आहे. जितका विनोदी तितकाच आशयगर्भ. दृष्टी थोडी अंधुक झाल्याशिवाय शब्दकोशाचा खरा आशय समजत नाही. शब्दांच्या नशिबी आलेले अर्थविपर्यास पाहिले म्हणजे त्यातही आपल्याला बदलत्या काळचक्राचा अभावित उपरोध जाणवू लागतो. आपल्या भाषेचा बहुतेक संसार हा उधारउसनवारीवर चाललेला आहे हे पाहिले म्हणजे स्वावलंबनाच्या अहंभावी तत्त्वज्ञानाचा शेवट होतो; आणि शेजाऱ्याकडे भांडे घेऊन जायला पहिल्याइतकी लाज वाटत नाही. अकारविल्हे येणाऱ्या त्या शब्दांची चमत्कारिक शय्यासोबत पाहिली म्हणजे जीवनातील विसंगतीमागे 'त्याला' अध्याहृत असलेले तत्त्व असेच काहीतरी असले पाहिजे, याची खात्री पटू लागते आणि 'अवघाचि संसार' सुसह्य होऊ लागतो. भगवद्‌गीतेमध्ये न सापडणारे अर्वाचीन जीवनाचे अद्यावत् तत्वज्ञान बिचाऱ्या शब्दकोशाने केव्हाच सांगून टाकलेले आहे. मात्र दृष्टी थोडी अंधुक झाली पाहिजे !

पण माझी दृष्टी अजून पुरेशी अंधुक झालेली नाही. साध्या शब्दकोशाने करमणूक व्हावी अशा आध्यात्मिक उंचीपर्यंत मी अजून पोचलेला नाही. करमणूक होण्यासाठी मला निदान चित्रावशास्त्र्यांचा चरित्रकोश तरी लागतो. मात्र माझी वाटचाल त्याच मार्गाने होत आहे हे नक्की; नाहीतर चित्रावशास्त्र्यांच्या चरित्रकोशातही मला इतका रस लागला नसता. प्राचीन चरित्रकोशातील बीजकथांशी तुलना करता मला नवकथा आणि नवकाव्य ही तकलुपी वाटू लागतात. प्राचीन बीजकथा अर्वाचीन जीवनाविषयी जितके सांगतात, तितके आधुनिक नव-

कथेला सांगता येत नाही. प्राचीन चरित्रकोश वाचताना मी अर्वाचीन जीवन-कोशच वाचीत असतो! काही पुस्तके भुतासारखी आपल्या मानेवर बसतात आणि त्यांचा हविर्भाग त्यांना देऊन टाकल्याशिवाय दुसरे काही वाचणे आपल्याला अशक्य असते. नाहीतर दुसरे पुस्तक हातात घेतले तरी त्या पुस्तकात आपण ते पहिले पुस्तकच वाचीत बसतो. चित्रावशास्त्र्यांच्या प्राचीन चरित्रकोशाने गेले काही दिवस मला असेच पछाडले आहे. सध्या मी जैगिषव्य, इल्वल, भगदत्त, शशबिंदू, शरभंग, सुतपस वगैरे मंडळींमध्येच वावरत आहे. माझ्या दाढीखाली माझी छाती झाकलेली आहे. डोक्यावर जटांचे जडजंजाल वाढलेले आहे; माझ्या तपश्चर्येच्या तेजामुळे मला स्वतःच भोवळल्यासारखे वाटत आहे; मी देवांचा, ऋषींचा आणि राक्षसांचा समकालीन बनलो आहे. आज तुम्ही माझ्यासमोर आलात तर मी माणसासारखा बोलणार नाही; फार तर शाप किंवा वर देईन! भूतकाळ आणि वर्तमानकाळ यांना जोडणारा एकच दुवा माझ्या हाताशी आहे. या बीजकथा. त्याच वाचीतवाचीत माझ्या मुंबई-तल्या बिऱ्हाडापर्यंत पोचण्याचा मी प्रयत्न करीत आहे :

" अलक्ष्मी : ही कालकुटानंतर समुद्रातून निघाली. हिचे तोंड काळे व डोळे लाल होते. हिचे केस पिंगट असून ही म्हातारी होती. देवांनी तिला ज्या घरात कलह असेल तेथे तू राहा असे सांगितले. खोटे बोलणारे व संध्याकाळी खाणारे यांना तू ताप दे. तू हाडे, कोळसा, केश, कोंडा यात राहा. अभक्ष्य भक्षण करणाऱ्यांना, देवांची चेष्टा करणाऱ्यांना, भांडणाऱ्या पतिपत्नींना, जुगाऱ्यांना तू दरिद्री कर... हिला वैदिक धर्म आवडेना, हिला मद्य, द्यूत वगैरे जास्त पसंत, हे पाहून उद्दालकाने हिला पिंपळाच्या झाडाखाली बसवले व आपण स्वतः नाहीसा झाला." ... ही अलक्ष्मी मला दोन वर्षांपूर्वी दादरला भेटली होती. उद्दालकही माझ्या परिचयाचा आहे. टाटामध्ये असतो. मधून-मधून कविता लिहितो!

" अश्मक : दगडापासून निर्माण झालेला म्हणून याला 'अश्मक' हे नाव पडले. कल्माषपाद राजाला एका ब्राह्मण स्त्रीचा शाप असल्यामुळे स्त्रीसमागम

करता येईना आणि इक्ष्वाकु कुलाची वृद्धी तर झाली पाहिजे, हे जाणून कल्मापपाद राजाने वशिष्ठ ऋषीस सांगून त्याकडून आपल्या मदयंती नामक स्त्रीच्या उदरी गर्भस्थापना करवली. बारा वर्षे झाली तरी हा गर्भ बाहेर येईना, तेव्हा मदयंतीने अश्मप्रहाराने उदरविदारण करून त्याला बाहेर काढले." इथे मला एक गहन प्रश्न पडतो, अधिक मोठा कोण? कल्माषपाद, वसिष्ठ की मदयंती? सध्या अश्मकाला धोंड्या म्हणतात. इक्ष्वाकू वंश नष्ट झाला तरी धोंड्या शाबूत आहे. सध्या न्यू इंडिया मिलमध्य जॉबरचे काम करतो.

"इल : वैवस्वत मनू व श्रद्धा यांना पुत्र नव्हता; म्हणून त्यांनी वशिष्ठाकडून मित्रावरुणांना उद्देशून पुत्रकामेष्टी केली. श्रद्धा अनुष्ठानाच्या काळात केवळ दूध पिऊन राहात असे. तिने होत्यास आपणास मुलगी पाहिजे असे सांगितले. त्याप्रमाणे हवन झाल्यामुळे 'इला' नावाची मुलगी झाली. पण मनूच्या इच्छे-प्रमाणे वशिष्ठाने तिला पुरुष केले, तेव्हा तिचे नाव 'इल' असे ठेवण्यात आले. पुढे हा परिवारासह अरण्यात मृगयेसाठी गेला व शंकराचा शाप असलेल्या शरवनात गेल्यामुळे परिवारासह स्त्री झाला. या अवस्थेत त्याला बुधापासून पुरूरवस नावाचा मुलगा झाला. पुढे वशिष्ठाच्या कृपेने हा एक महिना पुरुष व एक महिना स्त्री होऊ लागला." बुद्धी आणि श्रद्धा यात मतैक्य नसले की हे असे होते. नाटक कंपन्या बदलल्या, राजकीय पक्ष बदलले की असेच होते. मुलाच्या भावी जीवनाचे स्वरूप ठरवण्याचा आईबापांनी प्रयत्न केला आणि त्यांच्यात मतभेद असला म्हणजेसुद्धा असेच होते. म्हणून मी हिला नेहमी म्हणतो...

"मंकी : पूर्वी मंकी या नावाचा एक द्रव्यलोभी शेतकरी होता. त्याच्या मनाप्रमाणे कोणतीच गोष्ट होत नसे. पुढे याने एकदा दोन बैल विकत घेतले व त्या दोघांना एकत्र जुवाला जुंपून कामाला लावले. ते बैल धावतच निघाले. त्यामुळे त्यांना खाली बसलेला उंट दिसला नाही. ते जेव्हा त्याच्या खांद्याजवळ आले तेव्हा उंट उठून उभा राहिला व तराजूप्रमाणे दोन्ही बैल मानेवर घेऊन पळू लागला. त्या बैलांची ती स्थिती पाहून मंकीला अतिशय वाईट वाटले व

पश्चात्तापाने त्याच्या मुखातून पुढील उद्‌गार बाहेर पडले, ‘ मनुष्याच्या दैवात जर काही नसेल तर त्याने कितीही प्रयत्न केला तरी काहीही होणे शक्य नाही.’ या गोष्टीमुळे त्याला वैराग्य प्राप्त झाले व पुढे ब्रह्मप्राप्ती झाली ”...आपल्या शेतकऱ्यांची स्थिती अशीच आहे, निदान पोंभुल्यातील. आपली मध्यमवर्गाची अवस्थाही अशीच आहे; पण तरी आपणाला ब्रह्मप्राप्ती होत नाही. कारण सरळ आहे. असे दृश्य पाहिले तर आपणाला वैराग्य येत नाही, हसायला येते ! सत्ययुग आणि कलियुग यातला फरक तो हाच : ते कुथतकुथत स्वर्गात गेले; आपण हसतहसत नरकात जाणार !

“ असमंजस : सगराला कोशिनीनामक स्त्रीच्या ठिकाणी झालेला पुत्र. हा पूर्वजन्मी योगी असून कुसंगतीमुळे योगभ्रष्ट झाला होता. याला पूर्वजन्मीचे स्मरण असल्यामुळे संगतीचा अगदी वीट आला होता. व पुन्हा कुसंगती घडू नये म्हणून त्याने आपले वर्तन असमंजसपणाचे ठेवले होते. त्याच्या अंगात पिशाच्च येत असे व त्यामुळे तो असे वर्तन करी. अशा वर्तनामुळे लोकांनी आपला कंटाळा करावा हा उद्देश असे. त्याचप्रमाणे हा लोकांच्या मुलांना शरयू नदीत बुडवीत असे, पण नंतर वनवासाला जाताना त्याने लोकांची बुडवलेली मुले योगसामर्थ्याने जिवंत करून लोकांना परत आणून दिली. ”...हे वाचल्या-नंतर मात्र मी एकदम अंतर्मुख बनतो. एक असमंजस दुसऱ्या असमंजसाविषयी वाचत असतो ! हल्लीच्या शिक्षणपद्धतीलाच पूर्वीचे लोक शरयू नदी म्हणत याचे अंतर्ज्ञान मला होते ! शरयू नदीत लोकांची मुले बुडवण्यापर्यंतचा सर्व कथाभाग अगोदरच घडलेला आहे. उरलेला अजून घडायचा आहे. तोपर्यंत तरी हा चरित्रकोश मधूनमधून असाच वाचावा लागेल !

मनोहर : दिवाळी १९६४

क्रमांक ........................ नोंद दि. ..........

# जन्मभर पुरणारे काम

जन्मभर पुरणारे काम हे अगदी साधे असते. ते इतके साधे असते की त्याची सुरवात केव्हा झाली हे आपल्याला कळलेले नसते. आणि म्हणूनच त्याचा शेवट कधी होणार याची कल्पना करणे आपल्याला शक्य होत नाही. मोठी कामे येतात आणि जातात; येण्यापूर्वी त्यांची जाहिरात होते आणि गेल्यानंतर त्यांचा पंचनामाही होतो. पण आयुष्याची खरी मजा कधीही न संपणाऱ्या अशा या बारिकसारीक कामावरच अवलंबून असते. असे एखादे काम आपल्या हाताशी असले तर जग कोण जिंकतो याचा विचार करण्याचे आपणाला कारण नाही. कोणाला ताजमहाल बांधायचाच असेल तर तो खुशाल बांधो; पण दुभत्याच्या फडताळाची पुनःपुन्हा निघणारी कडी दर चार दिव-सांनी दुरुस्त करणाऱ्याचा जीवनानंद काही वेगळाच असतो. अशा माणसाच्या दृष्टीने घरात किती वस्तू आहेत या गोष्टीला फार महत्त्व नसते. जोपर्यंत त्याच्या जागांची सतत अदलाबदल करण्याचे त्याचे स्वातंत्र्य अबाधित राहते तोपर्यंत त्याला त्या कधीच कमी भासत नाहीत. आपल्या घरातल्या बारिकसारीक वस्तूंची नवी मांडणी करणे म्हणजे सबंध संसाराचा कायाकल्प करण्यासारखेच असते. नवे होण्याचा हा एक अगदी जुना मार्ग आहे.

पण संसाराला नित्य नूतन बनवणारा हा जुना मार्ग आता कायमचाच बंद होणार की काय अशी भीती वाटते. आपल्या घरातल्या जागेचा जास्तीत जास्त कसा उपयोग करून घ्यावा हे एक आता स्वतंत्र शास्त्र झाले आहे.

हळूहळू हे गृहरचनाशास्त्र आपल्या स्वयंपाकघरापर्यंत पोचल्याशिवाय राहणार नाही. या शास्त्राच्या तज्ज्ञाला तुम्ही आपली जागा दाखवलीत आणि आपल्या आवडीनिवडीची स्थूल कल्पना दिलीत तर तुमच्या घरात कोणत्या वस्तू कोणत्या ठिकाणी मांडल्या पाहिजेत याची एक आदर्श योजना तो तुमच्यापुढे ठेवील. एकदा तुम्ही त्याच्या कह्यात गेलात की तुम्हाला एखाद्या जादुगारा-प्रमाणे नाचवू शकेल. प्रथम तुम्ही त्याला भीत भीत काही सूचना करू शकाल. पण गृहरचनाशास्त्राच्या मूलभूत सिद्धान्ताचा आधार घेऊन तो बोलू लागला की तुमचे हे उरलेसुरले धैर्यसुद्धा गळून जाईल. कोणत्याही शास्त्रीय परिभाषेत सामान्य माणसाच्या आत्मविश्वासाला नेस्तनाबूत करण्याची एक जबरदस्त शक्ती असते. त्याचा प्रत्यय तुम्हालाही आल्यावाचून राहणार नाही. हळूहळू तुमच्या घरातील सर्व वस्तू सूचित केलेल्या जागेवर मुकाट्याने जाऊन बसत आहेत असे दृश्य तुम्हाला दिसू लागेल. आणि हे सर्व तुमच्या हातांनीच घडत आहे हे उमगल्यावर तुमच्या आत्मविश्वासाचा शेवटचा बुरूज कोसळल्या-वाचून राहणार नाही.

अशा एखाद्या तज्ज्ञाला बोलावून आपल्या घरातील वस्तूंची आदर्श मांडणी करून घेणे म्हणजे आपल्या घराचे घरपण घालवण्यासारखेच आहे. मला घरात चोर शिरलेला चालेल; पण गृहरचनातज्ज्ञ चालणार नाही. घरात चोर शिरला तर फार म्हणजे एखादी वस्तू घेऊन जाईल. तो काही घराचे घरपण चोरून नेणार नाही. त्याने न चोरलेल्या वस्तू तरी सर्वस्वी माझ्याच असतील. त्यांच्या मांडणीत माझ्या व्यक्तित्वाचा ठसा उमटला असेल. न चोरलेल्या इतर वस्तू-विषयी मला एक वेगळाच आपलेपणा वाटू लागेल. वस्तुतः चोर ज्या वेळी आपली एखादी वस्तू चोरून नेतो त्याच वेळी त्या उरलेल्या वस्तू खऱ्या अर्थाने ‘ आपल्या ’ होतात. अपघातातून वाचलेल्या माणसाला पुनर्जन्म झाल्यासारखे वाटावे तसेच त्या वस्तूंविषयी आपल्याला वाटू लागते. इतर वस्तूंच्या आपले-पणाची ही नवी जाणीव इतकी समृद्ध असते की शहाण्या माणसाने ती मिळ-विण्यासाठी एखादी वस्तू चोराला नेऊ दिली तर त्यात आश्चर्य करण्यासारखे काही नाही. लहानसहान चोऱ्यांमध्ये आपण गमावतो त्याहून अधिक मिळ-

वतो असेच म्हणावे लागेल. म्हणून घरात चोरी होणे ही काही फार भयंकर गोष्ट नव्हे. पण गृहरचनातज्ज्ञ घरात शिरणे ही मात्र एक फार भयावह घटना आहे. घरातली एकही वस्तू न चोरता तो सबंध घरच पळवून नेत असतो. आपण केलेली घराची मांडणी ही गैरसोयीची असली तरी 'आपली' असते; उलट गृहरचनातज्ज्ञाने केलेली मांडणी ही सोयीची वाटली तरी ती त्याची असते. असे म्हणता येईल की वस्तूंची मालकी आपल्याकडे असली तरी घराची मालकी त्याच्याकडेच असते! आपल्या कल्पनेप्रमाणे घराची लावालावी केल्यानंतर तो जेव्हा बाहेर पडतो तेव्हा त्याच्या डोळयात चमकणारा आसुरी आनंद हा तुमच्याकडून काढलेल्या द्रव्याशी संबद्ध आहे अशी तुमची कल्पना असेल तर ती फार खोटी आहे. तो बाहेर जातो तेव्हा तुम्ही त्याच्या घरात राहणारे एक पाहुणे असता.

खरे म्हणजे घराचे घरपण हे त्यातील गैरसोयीवरच अवलंबून असते. वरवर गैरसोयीची वाटणारी एखादी गोष्ट आपण एकाएकी बदलू शकत नाही. वरवर गैरसोयीच्या वाटणाऱ्या त्या गोष्टीतच आपल्या भावनेची एखादी सुप्त सोय दडलेली असते. मी आता ज्या टेबलावर बसून लिहीत आहे ते टेबल जवळ-जवळ माझी अर्धी खोली व्यापून बसलेले आहे. एवढ्या लहान खोलीत एवढे मोठे टेबल मांडणे ही गोष्ट गृहरचनाशास्त्रात बसण्यासारखी नाही. जुने टेबल मी बदलावे म्हणून माझ्या काही मित्रांनी वर्गणी जमवण्याची खटपट चालवली आहे; तर काही पापभीरू शेजाऱ्यांनी ते होळीत समर्पण करण्याची तयारी दाखविली आहे. पण त्यांच्या या गंभीर सूचना हसण्यावारी नेऊन अजूनही मी त्याच टेबलाला धरून आहे. अक्षरशः 'धरून' आहे. हे टेबल म्हणजे माझ्या आयुष्यातला एक आधार आहे. एखाद्या कर्त्या माणसाचा पोरक्या मुलाला आधार वाटावा तसा मला या टेबलाचा आधार वाटतो. आणि तोही ते इथे या खिडकीजवळच्या कोपऱ्यात असले तरच. त्याला ते पलीकडचे आकाश दिसले पाहिजे आणि त्या समोरच्या माडाला खिडकीतून त्याच्याकडे बघता आले पाहिजे. दुसऱ्यांना हे टेबल बेडौल दिसत असेल; पण त्याच्या त्या मुक्या आधारानेच मी माझा तोल पुष्कळदा सावरला आहे. या जुन्या ओबड-

धोवड टेबलाशी जमलेली माझी ही लोकविलक्षण सलगी त्या गृहरचनाशास्त्राला अजून समजलेली नाही. कदाचित् ती त्याला समजणारच नाही, आणि ती न समजण्यातच या माझ्या घराचा घरपणा आहे.

ज्या घरात कसलीच गैरसोय शिल्लक उरलेली नाही त्या घरातील व्यक्तींचे भावजीवन सपक झाले आहे असे समजायला हरकत नाही. कारण जिवंत भावनेइतकी गैरसोयीची वस्तू दुसरी कोणतीच असू शकत नाही. वस्तूंशी आपल्या भावना निगडीत झालेल्या असतात म्हणूनच गैरसोयी निर्माण होतात; आणि घरातल्या माणसांमध्ये एकमेकाविषयी भावना निर्माण झालेल्या असतात म्हणूनच त्या गैरसोयी सहन केल्या जातात. एकही गैरसोय नसलेले घर ही एक फार अमानुष गोष्ट आहे. ज्या घरातील सर्व वस्तू एका आदर्श मांडणीत सामावलेल्या आहेत ते घर माणसांना राहायला निरुपयोगी आहे. तिथे कसलाही बदल होणें शक्यच नाही. म्हणजे माणसाला आपली स्वाभाविक गतिशीलता सोडून अशा घरामध्ये एखाद्या वस्तूसारखेच नांदावे लागेल. प्रत्येक आदर्श अवस्थेत एक प्रकारची अगतिकता अंतर्भूत असते. अशा पद्धतीने मांडलेल्या घरात सगळ्याच वस्तूंच्या जागा बदलल्याशिवाय आपणाला त्यातील कोणत्याही एका वस्तूची जागा बदलणे शक्य होणार नाही. कोणत्याही आदर्श रचनेचा हाच विशेष असतो. मग ती आदर्श मांडणी घराची असो की कवितेची असो. म्हणून आपल्या घराची आदर्श मांडणी करून घेणे ही सामान्य माणसाच्या दृष्टीने एक अनर्थकारक घटना आहे. आदर्शाचा हा वटारलेला डोळा प्रत्येक वस्तूवर खडा पहारा करीत राहील. त्याच्या दटावणीतच त्याला भीत भीत जगावे लागेल.

या असल्या दटावणीपेक्षा एक गैरसोय दूर करताना दुसऱ्या चार गैरसोयी निर्माण करणारी आपली स्वैर गृहरचनाच मला तरी अधिक समाधानकारक वाटते. मात्र एक गैरसोय काढून टाकताना पुष्कळदा आपण दुसऱ्या चार गैरसोयी निर्माण करीत असतो ही गोष्ट स्वतःपासून लपविण्यात अर्थ नाही! जीवनाच्या बहुतेक क्षेत्रात हेच घडत असते. आपल्या गृहरचनेतील एक गैरसोय

काढून टाकताना दुसऱ्या चार गैरसोयी निर्माण करणे म्हणजेच आपल्याला जन्मभर पुरणारे एक काम माणसाने शोधून काढण्यासारखे आहे. माणसाला असे काहीतरी काम हवे असते. माणसाला कधीही न संपणारा असा एक नाद हवा असतो. पण त्याचे बहुतेक नाद त्याच्या वाढत्या वयाशी साथ करू शकत नाहीत. गोट्या खेळण्याचा नाद लहानपणी बहुतेकांना असतो; पण काळाच्या उतरंडीवर लागलेल्या माणसाला त्या पुन्हा हातात पकडता येत नाहीत. फक्त सेनापती बापटांसारख्या एखाद्या योग्यालाच ती कला साध्य करता येते. लहानपणातले बरेचसे नाद म्हातारपणी आपल्याला फक्त चिडवीत बसतात...मध्येच रांगून दाखवतात; मध्येच कोलांटी उडी मारतात; मध्येच मुलीत मिसळून कोंबडा घालतात; मध्येच साबणाचे फुगे हवेत उडवतात; कधी दाराच्या फटीतून पहात फिदीफिदी हसतात; तर कधी चिंचेच्या झाडावर चढून ' टुकटुक माकड ' करतात...पण इकडचा स्टोव्ह तिकडे ठेवणे आणि या भिंतीतील ताटाळे त्या भिंतीला मारणे हा नाद म्हातारपणातही आपणाला सहज साथ देऊ शकतो. तरुण मंडळी त्याला कदाचित म्हातारचळ असे नाव देतील; पण निव्वळ तेवढ्यामुळे जन्मभर पुरणारे काम मध्येच सोडण्याचा मूर्खपणा कोणताच म्हातारा करणार नाही. जवळ असलेल्या वस्तूंची निराळी मांडणी करीत राहणे हे एकच काम सामान्य माणसाला अशा अवस्थेत झेपण्यासारखे असते... आणि असामान्य माणसे जन्मभर पुरणारी मोठी कामे करतात म्हणजे तरी काय करतात? मनुष्यस्वभावातले मूळ घटक आणि निसर्गातली मूळ द्रव्ये ह्या गोष्टी त्यांना थोड्याच बदलता येतात? जवळ असलेल्या वस्तूंची एक आदर्श मांडणी करण्याचा प्रयत्न करणे हीच असामान्य माणसाच्या आयुष्यातील मुख्य प्रेरणा असते. पण जे धोके आदर्श गृहरचनेत आहेत ते धोके या आदर्श समाज-रचनेत नसतील असे सांगणे कठीण आह.

रहस्यरंजन : दिवाळी १९६०

# सूर्य उगवत नसतो तेव्हाचा पाऊस

हीच वेळ आहे. गेले पाहिजे. आत्ताच गेले पाहिजे. ही संधी हुकली तर पुन्हा येणार नाही. त्र्याहत्तराव्या वर्षी पावसात भिजायचे म्हणजे कोणासाठी थांबून भागत नाही. मनात विचार आला की, लगेच बाहेर पडावे लागते. मनात विचार आला तरी तोही यदृच्छेनेच येतो... त्यातून ही वेळ तशी सोयीची आहे; सगळी माणसे झोपलेली आहेत; सगळे घर शांत आहे, माझे मन सुद्धा शांत आहे; हल्ली पुष्कळदा तसे नसते; मग इतर सगळ्या माणसांनी माझे घर सोडून दूर जावे असे वाटते; माणसे नकोशी होतात. पण आज तसे वाटत नाही; मलाच दूर जावेसे वाटते. आज मन शांत आहे... कारण पाऊस कोसळतो आहे, एखाद्या मुलासारखा. त्याचे वय सात वर्षांचे असेल! हल्ली असे विक्षिप्त विचार मनात येतात; आवरत नाहीत; त्यांना आवरावे असे मलाच वाटत नाही. याचा अर्थ आत्ताच गेले पाहिजे. त्र्याहत्तराव्या वर्षी पावसात भिजायचे म्हणजे कोणाला थांबून भागत नाही.

त्यातून ही वेळ सोयीची आहे. सगळी माणसे झोपलेली आहेत. नातवंडे आयांच्या पांघरुणात गुरफटलेली आहेत. त्यांच्या आया मात्र दुसरीकडे आहेत; चालायचेच! तरुण आहेत... आमच्या वेळी हे शक्य नसे; सगळा व्यवहार चोरून चालायचा. स्वतःच्या बायकोशी सुद्धा. पण त्यातही मज्जा होती. श्रीकृष्णाला त्यातले इंगित समजले होते. लेकाने गीतेत ते तेच सांगितलेन्. लेकाचा लबाड होता... ती असती तर तिला हे विचार आवडले नसते. शेवटी

शेवटी ती फारच कर्मठ झाली होती; आणि ती जसजशी कर्मठ होत गेली तसतशी माझी जीभ अधिकाधिक सैल सुटत चालली. मी कधी कधी गमतीने आचरटासारखे बोलायचा. अचकटविचकट, वेडेविद्रे, क्वचित् अश्लील, केव्हा केव्हा अभद्र... मी सुनांची चेष्टा केली की, ती अंगावर खेकसायची; म्हणायची, "घरात परक्यांच्या मुली आल्या; आता तरी ताळतंत्र हवा. दिवसेंदिवस तुमचा चहाटळपणा वाढतोच आहे. शेजारीपाजारी म्हणतील काय? मनाची नाही तरी जनाची–" पुढे पुढे नातवंडेही तिच्या सुरात सुरात मिळवू लागली. पोरे महाबिलंदर! 'बरे सत्य बोला यथातथ्य चाला' हे मीच शिकवलेले पुन्हा मलाच म्हणून दाखवायची. पण माझे आपले तसेच चालायचे. म्हातारचळ लागला हे ठरल्यावर म्हटले त्याचा तरी फायदा घ्यावा. हे सुद्धा मी बोलून दाखवायचा! त्यांना वाटायचे खरेच म्हातारचळ लागला. आणखी एक पुरावा. मी पावसात भिजायला चाललो असे म्हटले तरी त्यांना तसेच वाटणार. पण आज मला खरोखरच भिजायचे आहे. म्हणून तसे काही म्हणता कामा नये. सरळ उठून बाहेर पडले पाहिजे. ही सर थांबण्यापूर्वी. एकदा गेलेली सर पुन्हा येत नाही. म्हातारचळ लागला म्हणून एवढे कळणार नाही की काय?

एकोणीसशे तेहतीसच्या ऑगस्टमधली गोष्ट. तेव्हा एकदा पावसात भिजण्याचा योग आला. तेव्हापासून गेल्या तीस वर्षांत पावसामध्ये भिजलो नाही. असे कसे घडले हे समजत नाही. यदृच्छेने झाले असे म्हटल्यावाचून गत्यंतर नाही. पण आता विचार केला की, आश्चर्य वाटते. तीस वर्षांत पावसामध्ये भिजलो नाही. तीस वर्षांपूर्वीचा तो योगायोग मात्र अजून आठवतो. आम्ही त्या वेळी खामगावला होतो. मला बदलीबरोबरच बढतीही मिळाली होती; आणि घरही पोस्ट ऑफिसपासून जवळ होते. एरवी बरे होते. पण आबांचे क्षणात वर क्षणात खाली; केव्हा काय होईल याचा नेम नव्हता. सहा वर्षे अंथरुणाला खिळलेले होते. शेवटची दोन वर्षे अत्यवस्थ. त्यात पायाला नारू झालेला. खोलीत गेले की, घाण यायची. पण शेवटी एकदा सुटले. ते सुटले आणि आम्ही सुटलो. एकोणीसशे तेहतीसच्या ऑगस्टची अठरा तारीख. सकाळी नऊचा

सुमार. तिचा कसला तरी उपास होता. शिंगाडयाचे थालीपीठ केलेले होते. मला आवडते म्हणून माझ्यासाठी सुद्धा एक तुकडा लावला होतान्. पण म्हाताऱ्याने तोंडात घास घालायला दिलान् नाही. पानावर बसतो तोच तिकडे प्राणोत्क्रमण. लगेच सगळा गिल्ला. हे शेजारीपाजारी. आमच्या हिचे रडणे-सवरणे...तिचे थालीपीठ अगोदरच खाऊन झाले होते; माझा तुकडा मात्र तसाच होता. मंडळी एकदम जमली नसती तर तोही खाऊन घेतला असता... पण जमले नाही; त्या दिवशी मला पुष्कळच जमले नाही. काही केल्या हुंदकाच फुटेना. खरे म्हणजे आई गेल्यानंतर पुन्हा कधी हुंदकाच फुटला नाही. रडण्याचा प्रयत्न केला की हसायला येते. प्रेत बाहेर काढले आणि पाऊस कोसळायला लागला. सगळ्यांना सचैल स्नान घडले. आबासह शेवटचे स्नान घडले. लहानपणी मला आपल्याबरोबर आंघोळीला घ्यायचे. आपल्या पंचाने अंग पुसायचे. शेवटी एकत्र स्नानाचा हा असा विचित्र योगायोग! आम्ही चार मुलगे चार टोकाला होतो; त्या दिवशी असे एकत्र आलो. आबांच्या अंगावर पाणी कोसळत होते आणि तेच नंतर आमच्या खांद्यावरून खाली निथळत होते. छत्री घेता येती तर बरे झाले असते असे क्षणभर वाटले. पण त्या वेळी अप्रशस्त म्हणून बोललो नाही! आता बोललो असतो. एवीतेवी म्हातारचळ लागलाच आहे, तर त्याचा फायदा घेतला असता...शेवटी त्या दिवशी पावसानेच माझे डोळे ओले केले. गंमत आहे : पावसाचे पाणी डोळ्याला लागल्याबरोबर आतले पाणी बाहेर पडले. बांध फुटला आणि मी ओक्साबोक्शी रडायला लागलो. डोळ्यातले पाणी पावसात गेले. कोणाला दिसले नाही. कोणाला दिसले नाही याचे थोडेसे वाईटही वाटले. त्या दिवशी मला तेवढेच काय ते वाईट वाटले... आबा गेले; पण हवे होते कोणाला? शेवटी शेवटी आम्ही सगळेच कंटाळलो होतो. अगदी ती सुद्धा. मधेमधे ती सुद्धा म्हणायची, "आता अधिक हाल न होता जातील तर बरे." पण शेवटी तिला ढसढसून रडता आले आणि त्याबरोबर सगळे शब्द वाहून गेले. माझे शब्द मात्र चामखिळासारखे माझ्या घशाला चिकटून आहेत. माझे सगळे पावसात गेले; इतक्या पाण्यात आणखी थोडे पाणी. पण त्या दिवशी पावसात भिजलो. एकोणीसशे तेहतीसच्या ऑगस्टची अठरा तारीख. तेव्हापासून पुन्हा पावसात भिजलो नाही. इतक्या

४०७३६

वर्षात एकदाही भिजलो नाही. आश्चर्य. म्हटले तर आश्चर्य!........

लहानपणी कोकणात होतो तेव्हा मात्र खूप भिजलो; खूप भिजलो आणि खूप मार खाल्ला. आता फक्त मोरभटाचे ते भाष्य आठवते, “ सावित्रीवहिनी, पोरे भिजली, की खूप बडवावे. भिजण्याने थंडी होते, बडवण्याने उष्णता वाढते. शेवटी परस्परांना छेद जाऊन सम होते. वात, पित्त, कफ कशाचाही प्रकर्ष होत नाही ! ”

...ही सर संपण्यापूर्वीच बाहेर पडले पाहिजे. आता केव्हा उजाडेल याचा नेम नाही. ऱ्याहत्तराव्या वर्षी पावसात भिजायचे म्हणजे कोणाची वाट बघता येत नाही. कोणाला बरोबर घेता येत नाही. नाहीतर पुष्कळांना बोलावले असते. अप्पा रानड्याला पाळंदीवरून हाक मारली असती; सिधंभट गोडशाचे दार ठोठावले असते; विष्ण्या शेलाराला उठवला असता. लख्या वाण्याच्या दुकानाची फळी बाजूला केली असती. आम्ही सगळे लहानपणी एकत्र खेळलो आहो; पावसामध्ये हुंदडलो आहो, सगळे एकत्र भिजलो आहो. अजूनही वाटते, त्यांना एक इथूनच हाक घालावी आणि सांगावे, “ मेल्यांनो, चला. पाऊस कोसळतो आहे; डोंगर घुमसत आहेत; दर्या गरजतो आहे. चला, मेल्यांनो, बाहेर पडा. मला माहीत आहे; सगळे थकला आहात, पण एकदा जोर करा. मी नाही का थकलो आहे ? मला सुद्धा संधिवात आहे; मला सुद्धा ब्लडप्रेशर आहे; मला सुद्धा आवरून धरणारी माणसे आहेत. पण कुणालाही पत्ता लागू देऊ नका. एकदम बाहेर पडा आणि पावसात घुसा...पाऊस कोसळतो आहे; डोंगर घुमसतो आहे; दर्या गरजतो आहे. लहानपणी आजीला फसवून पावसात घुसलो; आता नातवांना चकवून चला. कोणाला तरी चकविल्याशिवाय पुन्हा पाऊस भेटणार नाही, शित्या पवार कालच वारला; त्याला पाऊस भेटणार नाही; त्याला भिजता येणार नाही; मेल्यांनो, घाई करा. बाहेर पडा. पावसात घुसा. ”

पण हे आपले वाटते आहे एवढे पुरे आहे ! या चोरांना बोलवायला गेलो तर सगळेच फसेल. मला म्हातारचळ लागला, असेच तेही म्हणतील. मी पुरा शहाणा आहे. मी तसे काहीही करणार नाही. वेडा माणूस सुद्धा स्वार्थापुरता

शहाणा असतो आणि मला तर फक्त म्हातारचळ आहे. म्हणजे असे वरची माणसे समजतात. समजोत बिचारी. मी एकटाच पावसात घुसणार. भरपूरसे भिजून घेणार. आज भिजता भिजता कुणासाठीही रडणार नाही. हसत राहणार. हसत भिजणार, भिजत हसणार. आज सगळी मजा मजा करणार. मला कपडे तरी कशाला हवेत ? आजच्या समारंभासाठी एक कुडते आणि एक पंचा एवढी पुरे आहेत. भिजल्यानंतर कुडते सुद्धा काढून टाकीन...पण गावाबाहेर पडेपर्यंत तेवढे तरी घातलेच पाहिजे. शेवटी कुडते वेशीवर ठेवीन; नाही तर जाता जाता मारुतीच्या अंगावर घालीन !...पायतण आपले पायात असू दे. नाहीतरी ते दुसऱ्याच्या पायाला येणे नाही. माझ्याबरोबर तेही भिजू दे...आणि खुळ्या-सारखी छत्री कशाला घेतली ? म्हातारचळ म्हणतात तेही खरेच ! आता छत्रीची ताडी शिवा असे कुणाला म्हणायला नको. ती आपली तिथेच राहू दे; त्याच खुंटीला. शेवटी आबांची छत्रीसुद्धा तिथेच होती.

शब्दरंजन : दिवाळी १९६३

# रेषांच्या झाडावरील पक्षी

घट्ट मिटलेली मूठ सुद्धा कधी कधी ढिली पडते. मग बोटे उलगडू लागतात. हे केव्हा घडते ते मलाही कळत नाही. अंगठा मात्र तटस्थासारखा बाजूला सरतो. माझ्या अंगठ्यावर शंख आहे आणि इतर चार बोटांवर चक्रे आहेत, त्यामुळे असे होत असावे ! मग मी माझा डावा हात उजव्या हातावरून नितळपणे फिरवितो. बोटांच्या चमत्कारिक हालचाली होतात. जणू प्रत्येक बोट आपले स्वतंत्र व्यक्तित्व शाबीत करीत असते. त्यांना मी पुन्हा एकसंध करतो. त्यांच्या मुळातले उंचवटे चाचपडून पाहतो. माझा रखरखीत हात वाटतो तितका रुक्ष नाही, असे मलाच जाणवू लागते. अंगठा मात्र हे सगळे तटस्थपणे पाहात असतो. मी हातावरील रेषांचा विस्तार निरखीत बसतो; त्याचे लक्ष मात्र बोटांमधील फटीवर असते. म्हणूनच मला अंगठ्याचा तिरस्कार वाटतो. मी त्याच्या अस्तित्वाची दखल घेत नाही. पण माझा अंगठा चांगलाच निगरगट्ट आहे. त्याचे पेर लाकडाच्या गाठीसारखे मुर्दाड आहे, नख खुरटलेले आहे, आणि शिवाय त्याच्या मस्तकावर एक भला मोठा शंख आहे. तोसुद्धा माझ्याकडे तिरस्काराने पाहतो.

त्याच्या नजरेचा पहारा चुकवून मी माझ्या प्राक्तनाचा अंदाज बांधू लागतो. माझी ‘ जर-तर ’ ची भाषा सुरू होते. ही धनरेषा थोडी लांब असती तर !... हा शुक्राचा उंचवटा थोडा अधिक गुबगुबीत असता तर !... या बोटांमधील अघळपघळ फटी विधात्याने भरून टाकल्या तर !... जीवनरेषेवर मारलेल्या

या चार-पाच क्लिष्ट फुल्या पुसल्या जातील तर !... हा त्रिकोण पुरा होईल तर ! ... तो चौकोन सुस्पष्ट झाला तर !... बराच वेळ हाताकडे पाहात राहिल्यावर जे असावेसे वाटते ते झाल्यासारखे दिसू लागते. माझ्या धनरेषेचे सूक्ष्म टोक हळूहळू पुढे सरकू लागते. अपुरा वाटणारा त्रिकोण एका अंधुक रेषेने जोडला जाऊ लागतो. माझा उजवा हात मी पुन्हा एकदा माझ्या डाव्या हाताने चाचपडून पाहतो. तो पूर्वीपेक्षा गुबगुबीत व सुलायम लागू लागतो. खरोखरच माझा हा हात विलक्षण वेगळा असून ठोकळेबाज सामुद्रिकांना त्याची अजून ओळख पडलेली नाही, या एकाच निर्णयावर मी शेवटी स्थिर होतो

मधेच एकदा मागे वळून खोलीत दुसरे कोणी नाही, याची मी खात्री करून घेतो. मग मला हवे असलेले सर्व निर्माण करण्यासाठी माझ्या हातावरील रेष सामुद्रिकांना उमगणारी वेडीवाकडी चित्रविचित्र वळणे घेऊ लागतात. हातावरील एकेका वृक्षाचा एक कल्पवृक्ष बनतो आणि त्याच्या ओथंबलेल्या फांदीवरून एक अनोखा पक्षी भविष्याच्या दिशेने झेप घेतो. त्याचे पंख सोनेरी असतात आणि त्याची चोच सुईसारखी टोकदार असते.

या पक्ष्याबरोबर भरारी मारताना मला इतकी लाज का वाटावी ? मी असे मागे पुढे का पाहतो ? खोलीत कोणी दुसरे नाही याची पुनःपुन्हा खात्री करून घ्यावी असे का वाटते ? भविष्याबद्दल वाटणारे तर्कदुष्ट आकर्षण हेच तर माणसाचे व्यवच्छेदक लक्षण आहे. विचारशीलता हे माणसाचे लक्षण मानणे म्हणजे माणसाचा सगळा इतिहासच नाकारण्यासारखे आहे. इतिहासामध्ये उमटलेले माणसाचे प्रतिबिंब हे त्याच्या अविचारीपणाचाच पुरावा देणारे आहे. भविष्याबद्दल वाटणारे तर्कदुष्ट आकर्षण हेच माणसाचे एकमेव सामान्य लक्षण. सगळ्यांची स्वप्ने स्वतःत सामावून घेणे हे फक्त या भविष्यालाच शक्य असते. माणसाला आपले सर्व कल्पवृक्ष भविष्याच्या उदार भूमीतच लावावे लागतात. मग ही वस्तुस्थिती मी नाकारतो ? अशा अविचाराचे भय विचारी माणसाला तरी का वाटावे ? अविचारी होण्याची आपली शक्ती गमावून बसतो, तो विचारी कसला ? विचार हा परवा परवा जन्माला आलेला आहे. त्याच्या पलीकडे

पसरलेला माणसाचा इतिहास अथांग आहे. भविष्याकडे झेप घेणारा माझ्यातला ' मी ' हा त्या आदिम मानवाचा वंशज आहे.

ज्या स्वातंत्र्याची माणसाला खरीखुरी तहान असते, ते ' केवल ' स्वातंत्र्य हा फक्त भविष्यकाळाचाच मक्ता आहे. या स्वातंत्र्याची जाणीव ही सुद्धा त्या आदिम इतिहासाचाच वारसा आहे. विचाराचा जन्म होण्यापूर्वीच स्वातंत्र्याची ही जाणीव जन्माला आली होती. ज्या स्वातंत्र्यात विकल्प नाहीत ते खरे स्वातंत्र्यच नव्हे. अपरिहार्यता आणि स्वातंत्र्य या दोन्ही कल्पनांचा मेळ घालण्याचा प्रयत्न मार्क्सने करून पाहिला. वर्तमानकाळात आपल्या अनुभवाला येणारे स्वातंत्र्य कशा स्वरूपाचे असते याचे अचूक निदान त्याने केले खरे; पण माझ्यातला अनादी ' मी ' तेवढ्यावर तृप्त होऊ शकत नाही. त्याला तहान लागते ती ' केवल ' स्वातंत्र्याची. ज्यात सगळे विकल्प सारखेच उपलब्ध आहेत अशा स्वातंत्र्याची. त्या दृष्टीने वर्तमानकाळ हा निसरडा ठरतो. तो फक्त अशा स्वातंत्र्याचा आभास निर्माण करतो. भूतकाळ अधिक प्रामाणिक. तो कधी विकल्पांचा आभास निर्माण करीत नाही. जे झाले ते कोणत्या तरी अर्थाने अपरिहार्य होते असे मानण्यावाचून गत्यंतर नसते. भूतकाळात संपूर्ण अपरिहार्यता असते; वर्तमानकाळात अपरिहार्यता व स्वातंत्र्य यांचे चमत्कारिक मिश्रण असते. आणि भविष्यकाळात संपूर्ण स्वातंत्र्याचा साक्षात्कार घडतो... काही वेळा तर मला भूत आणि भविष्य हे दोन कालखंड तेवढेच खरे वाटतात. वर्तमानकाळाला शरीर असूच शकत नाही. भूत आणि भविष्य या दोन कालखंडातील छेद दाखवणारी आणि जाणिवेमधून सतत पुढे सरकत जाणारी आभासमय रेषा म्हणजे वर्तमान...भविष्यकाळाचा आश्रय घेतल्याशिवाय माणसाला आपली स्वातंत्र्याची तहान तृप्त करणे केवळ अशक्य असते. म्हणूनच मी भविष्यापुढे लाचार होतो. निग्रहाने आवळलेली मूठ कधी कधी ढिली पडते. कोणी याला भ्याडपणा म्हटले तर मी त्याला एवढेच म्हणेन, असला भ्याडपणा हा माणसाचा वारसा आहे.

पण ' केवल ' स्वातंत्र्याच्या या पुरस्कर्त्याने असे केविलवाणे होऊन

हाताच्या रेषांकडे का पाहावे ? भविष्यामध्ये जर मला फक्त स्वातंत्र्यच हवे असेल, तर त्या ठिकाणी अमुकच घटना घडून याव्यात अशी चोरटी अभिलाषा मला का वाटावी ? कारण आपले भविष्य समजून घेण्याचा प्रयत्न करणे म्हणजे भविष्यकाळाला त्याच्या मूळ प्रकृतीपासून – स्वातंत्र्यापासून – वंचित करण्यासारखे आहे. तो उघडा नसून बंदिस्त आहे असे मानल्याशिवाय कोणालाही आपल्या हातावरील रेषांवरून भविष्यकाळाकडे प्रवास करणे अशक्य असते. पुढे होणाऱ्या गोष्टी अगोदरच कळू शकतात याचा अर्थ पुढे होणाऱ्या गोष्टी अगोदरच ठरलेल्या आहेत असा होतो. इथे 'काही प्रमाणात कळू शकतात' कारण त्या 'काही प्रमाणात ठरलेल्या आहेत' हा मध्यम मार्ग माझ्यासारख्याचे समाधान करू शकत नाही. एकतर भविष्य हा पूर्णपणे पूर्वनिश्चित असेल आणि मग तो जाणण्याने काही विशेष साधणार नाही; किंवा तो पूर्णपणे अनिश्चित तरी असेल आणि मग भविष्यकथन करणे मूलतःच अशक्य ठरेल. यांपैकी कोणतीही भूमिका घेतली तरी रेषांवरून उघडणाऱ्या या पक्ष्याचे पंख छाटले जातात.

पण भविष्याकडे आशाळभूतपणे पाहणाऱ्या माझ्यासारख्या माणसाला इतका प्रामाणिकपणा परवडण्यासारखा नसतो ! भविष्याच्या उदरात एकाच वेळी कार्यकारणभावाचे अस्तित्व व अभाव मला गृहीत धरावेसे वाटतात. कदाचित हीच गोष्ट वास्तवाच्या तर्कातीत मूळप्रवृत्तीशी सुसंगत असेल...कदाचित अशा प्रकारच्या शब्दच्छलामागे मी माझ्या आत्म्याचे एखादे नाजूक मर्मस्थान लपवू पाहात असेन. अपरिहार्यता आणि स्वातंत्र्य या दोन्ही कल्पना मला सारख्याच भयानक वाटत असतील. सगळ्या हातांच्या रेषांवर माणसांचे एकच प्राक्तन लिहिलेले असेल : एकटेपणा, असहायता आणि भीती.

मस्तकावर शंख मिरवणाऱ्या त्या माझ्या अंगठ्याला हे अगोदरच कळलेले असावे !

शब्दरंजन: फेब्रुवारी १९६४

# मी आणि माझी भुते

ज्या भुतांना आपण भितो ती आपली स्वतःचीच असतात, आपल्या पाठीशी असतात. त्यांचा गरम श्वासोच्छ्वास आपल्याला ऐकू येतो. त्यांच्या पायांची लांब नखे आपल्या खोटेच्या अगदी जवळ आलेली असतात. आणि हे सर्व आपल्याला ठाऊक असते. ती केव्हा बोचतील याचा नेम नसतो. एकदा ती बोचली आणि भळभळून रक्त वाहावले तर मग फारशी भीती नसते ! पण ती बोचणार नाहीत. बोचण्याइतकी जवळ येतील; पण प्रत्यक्ष बोचणार नाहीत. म्हणूनच त्यांची आपणाला भीती वाटते. माणसाला भीती कशाची वाटते हे भुतांना चांगले समजते. हे समजण्याची अक्कल असते म्हणूनच ती भुते होतात, नाहीतर त्यांचे राक्षस झाले असते. मग आपण सरळ चालतच त्यांच्या जबड्यात गेलो असतो आणि तो मिटल्याचा शेवटचा आवाज धिमेपणाने ऐकला असता. तिथे सर्व संपले असते. आयुष्याला भेटणारे राक्षस दयाळू असतात. ते पुढून चालत येतात; आणि सगळे संपवून स्वतः मोकळे होतात व आपल्यालाही मुक्त करतात.

पछाडण्याची शक्ती फक्त भुतातच असते; आणि ती भुते आपली स्वतःचीच असतात. कधी ती उजव्या खांद्यामागून आपली लवचिक मान पुढे झुकवतात आणि उजव्या कानात थुंकत बसतात; कधी त्यांना डाव्या कानाची पिकदाणी अधिक आवडते. या दोन्ही पिकदाण्या दोन हातात धरून आपला आत्मा त्यांच्या सेवेला हजर असतो, हुजऱ्याप्रमाणे.

त्यातले उजव्या खांद्यामागचे एक भूत अगदी पोरसवदा असते; गाल गुबरे असतात; हात बाळसेदार असतात; पाय लुटलुटीत असतात. पण त्याच्या चेहऱ्यात काहीतरी कमी असते. ते काय, हे मला प्रथम उमगत नाही. पण डोळे मिटले की तेही दिसू लागते. त्या भुताला नाक नसते; नाकच नसते. तिथे फक्त दोन भोके असतात, शून्यासारखी...कोल्र्यांच्या शाळेला तसल्याच दोन खिडक्या होत्या. त्या शाळेकडे जाताना एक भयंकर गोष्ट मी स्वतः पाहिलेली असते. कडदणातून जाणारी मळलेली वाट मला आवडत नाही; ती सोडून मी वाहाळींच्या कडेकडेने चाललेला असतो. इतक्यात मला कसली तरी वसकन घाण येते. एखादे मेलेले ढोर असेल या कल्पनेने मी निगडीच्या झाळींचा आधार घेऊन वाहाळींत डोकावतो; आणि मग मटकन खाली बसतो. वाहाळींत एक अर्धवट कुजलेले पोर दोन कुत्रे ओढीत असतात. ते दिसल्या-बरोबर मी मटकन खाली बसतो; माझ्या घशाला कोरड पडते; माझे पाय गुडघ्यामध्ये लटपटू लागतात. उभे राहण्याचे त्राण आल्याबरोबर मी खुळ्या-सारखा पळत सुटतो; तो थेट शाळेजवळच्या पिंपळापर्यंत. मग पाराजवळ जरा दम घेतो; आणि पुन्हा पळत पळत शाळा गाठतो. तात्या मास्तर म्हणतात, "गाढवा, असा पळत कशाला आलास?" पाहिलेले सगळे कुणाला तरी सांगायला हवे असते, पण मास्तरांचा उग्र चेहरा बघून मला धीर होत नाही. मी म्हणतो, "तात्या, गुरवाचा बैल मागे लागला; पळत आलो म्हणून बचा-वलो; काय भयंकर बैल!" मास्तर म्हणतात, "तरी मी सखारामाला समक्ष सांगितले! तुझा बैल शाळेकडे येता कामा नये; पुन्हा पाठीला लागला तर मला सांगा." सखाराम गुरवाचा बैल हा आम्हा सर्व मुलांना मोठा सोयीचा वाटतो. शाळेत यायला उशीर झाला तरी तोच आमच्या उपयोगी पडतो. तो बैल पाठीला लागावा म्हणून मी एकदा त्याला एक ढिपळसुद्धा मारलेले असते; पण तरी तो मेरेशी चरत राहातो; माझ्याकडे ढुंकूनसुद्धा पाहात नाही. हे सर्व खरे असले तरी मास्तरना सांगितलेल्या गोष्टीलाच मी पुढे चिकटून राहातो. तसे चिकटून राहाणे मला भागच असते. त्यामुळे मी जे डोळ्यांनी पाहिले ते पुन्हा पुन्हा पाहण्याचे कारण उरत नाही. पुढे 'म्हाराचो झिल वागान खल्लान' म्हणून गावात बोंब उठते; तेव्हा सुद्धा मी काही बोलत

नाही. मख्ख चेहेरा करून मी ते ऐकत बसतो...पण तो वसकन आलेला वास आठवला म्हणजे अजूनही नाक गळून पडते...माझे की त्या भुताचे?...त्या भुताला नाकच नसते ..ते कोणाचे असते?...वाहाळींतल्या पोराचे की वाहाळी-बाहेरच्या पोराचे...मात्र त्या भुताचे हात बाळसेदार असतात; पाय लुटलुटीत असतात; फक्त चेहऱ्यामध्ये काहीतरी कमी असते.

कधी कधी डाव्या खांद्यामागचे एक दुसरे भूत आपला विळविळीत हात हळूहळू पुढे सरकवते. तो हात किडकिडीत असतो, त्याचे बाळसे झडलेले असते; मनगट पिचलेले असते; त्या विळविळीत तळहाताला उंचवटे नसतात, हाताच्या नखांवर पांढरे डाग असतात आणि दोन बोटांमध्ये मोठमोठ्या फटी असतात. डाव्या खांद्यावरून पुढे सरकलेला तो कापरा हात मुठीमध्ये कांहीतरी लपवीत असतो; म्हणजे लपवण्याचा प्रयत्न करीत असतो. तरीसुद्धा ती मूठ उघडझाक करण्याची धडपड करीत असते.... ती मूठ हळूहळू माझ्या डोळ्यासमोर येते. जितकी ती डोळ्यासमोर येते तितकी ती अधिक घट्ट होत असते. मग त्या बोटातील हाडे करकरू लागतात. त्या मुठीला घाम फुटतो. घामाने ओली झालेली ती मूठ हळूहळू पारदर्शक होते. अगदी काचेइतकी. कितीही आवळलेली असली तरी भुताची मूठ ही मुळातच पारदर्शक असते. त्या मुठीतले तीन रुपये बारा आणे मला स्पष्टपणे दिसू लागतात. त्यातले तीन रुपये राणी छापाचे असतात आणि बारा आण्याची चिल्लर असते. त्यात एक रुपयाच्या आकाराचा ढब्बू पैसाही असतो ... भूत झाले म्हणून काय झाले! डोळ्यापुढे मूठ आणील की काय? मी म्हणतो, "मूठ मागे घे , बऱ्या गोष्टीने मूठ मागे घे." भूत म्हणते, "तर; तर; तर;" आणि पुन्हा ती मूठ डोळ्यापुढे सरकू लागते; मग ती डोळ्याजवळ येते. हळू हळू तिला डोळ्याचाच आकार येऊ लागतो; पुन्हा तीच उघडझाप सुरू होते, माझ्या स्वतःच्याच पापणीसारखी. मी ओरडतो, "मूठ मागे घे, मूठ मागे घे." पण पुढे आणलेली मूठ भूत तशीच मागे नेत नसते. त्याला पावती हवी असते. मी पुन्हा दटावतो, 'अजून मूठ मागे घे.' मग त्या भुताला हसायला येते. हसण्या साठी ते खूप दूर जाते...जवळ जवळ कोल्हापूर इतके. तिकडे भूत हसत असते आणि इकडे ही मूठ डोळ्यांना भिडू पाहते. कितीही वाजले तरी त्या वेळीं मध्यान्हच

असते...हाटेलात अंधार असतो. एक हात धडधडत्या उराने अंधार रापीत रापीत पैशाच्या पेटीपर्यंत पोहोचतो. तीन रुपये आणि काही नाणी बोटांना चिकटून बाहेर येतात. त्यात एक रुपयाच्या आकाराचा ढब्बू पैसाही असतो...शेवटी मी कबूल करतो, "होय, घेतले असतील; पण ते फक्त फीसाठी; आणि जास्ती आलेले चार आणे मी परत पेटीत टाकले." 'कशासाठी' हे मी विनाकारण सांगत असतो; भुताला त्याचे महत्व नसते. त्याला फक्त पावती पाहिजे असते. ती मिळाल्याबरोबर डोळ्यासमोरची मूठ खांद्यावरून पुन्हा मागे जाते. त्या वेळी तो मागे सरणारा हात हाडामांसाचाच असतो; आणि त्याच्या मनगटाजवळची सदऱ्याची बाही थोडी फाटलेली असते....

भुतांनासुद्धा धडके कपडे मिळू नयेत याचे मला नवल वाटते. भुतांना नवे कपडे पुरविण्याची काही व्यवस्था केली पाहिजे ! मग त्याकरता तीन रुपये बारा आणे वर्गणी बसली तरी मी कुरकुर करणार नाही !

ज्या भुतांना आपण भितो ती अशी स्वतःचीच असतात. त्यांची भीती कमी करण्याचा एकच मार्ग असतो, अगदी मोकळेपणाने आपण त्यांना भितो ही गोष्ट स्वतःशी कबूल करणे. ही खंडणी भरली की त्यांची छळणूक पुष्कळ कमी होते. आपल्या अस्तित्वाची जाणीव ती मधून मधून देत राहतात; पण ती आपल्याला पछाडू शकत नाहीत. भुतांना न भ्याल्याची ऐट आणली तर मात्र ती आपल्या मानेवर बसतात. जे भयानक आहे त्याला सरळ सरळ भिण्याचे धैर्य माणसाला पुष्कळ उशिरा येत असते. त्यापूर्वी तो पुष्कळदा लटके अवसान आणतो. अनेक मांत्रिकांचे गंडेदोरे बांधतो; नव्या जुन्या सर्व तीर्थांच्या पुनःपुन्हा यात्रा करतो. यमनियमांनी जखडून घेऊन स्वतःला आत्मदंड करतो आणि पश्चात्तापाचे सोंग आणतो. पण खांद्यामागच्या या भुतांना असे बनवता येत नाही. कारण ती स्वतःचीच असतात ! आपल्या आयुष्यातल्या सगळ्या चोरवाटा त्यांनी स्वतःच्या घामानेच बांधलेल्या असतात. प्रत्येक चोरवाटेच्या तोंडाशी आपलेच एक भूत पहारा करीत असते.

मात्र भयानकाला भिण्याचे धैर्य आपल्या अंगी आले की ही भुतेही आपल्याला भिऊ लागतात. मग ती आपल्याला भिववीत नाहीत; ती एकमेकांनाच भिववीत असतात ! डाव्या खांद्यामागची भुते उजव्या खांद्यामागच्या भुतांची कळ काढतात. आपल्या भुतातसुद्धा डावाउजवा हा भेद असतोच ! भुतें एकमेकांना कशी भिववितात हेही मोठे बघण्यासारखे असते. जडवादाच्या थडग्यातले भूत गूढवादाच्या थडग्यातल्या भुताला चिडवू लागते. पहिले दुसऱ्याला कोंडीत पकडते; दुसरे पहिल्याला मातीत लोळवते; मग दोघेही एकमेकांना सवारी भरतात. त्या वेळी त्यांच्या त्या गतिहीन अवस्थेला हसणारा एक नवा उमदा आवाज त्यांच्याच पाठीमागे उभा असतो. पण भुताची तोंडओळख असलेल्या माणसाला या नव्या आवाजाबद्दलही भलत्याच अपेक्षा नसतात. शेवटी त्याचेही काय होणार हे त्याला अगोदरच कळलेले असते. शेवटी त्याचेही एक भूत होणार असते. प्रश्न एवढाच असतो: डावे की उजवे ? म्हणून भयानकाला भिण्याचे धैर्य असलेला मनुष्य त्याच्याकडे फक्त कुतूहलाने पाहातो, आशेने नव्हे.

नवयुग: दिवाळी १९५९

30935 क्रमांक 7608

# रात्र कुत्र्याची आहे

आपले सरळ कबूल करतो, मला कुत्र्यांची भीती वाटते. जबरदस्त भीती वाटते. मुंबईलासुद्धा मध्यरात्रीनंतर घरी येणे धोक्याचे असते. प्रथम एक कुत्रे भुंकते; मग दुसरे भुंकते; मग दुरून खोल आवाजात त्याला कुणाची तरी साथ मिळते; मग गल्लीतली सगळीच कुत्री एकदम गिल्ला करतात; मग सवाल-जबाब चालतात आणि शेवटी सगळे हातघाईवर येणार असे वाटते तोच अचानक सगळीकडे सामसूम होते. मला या सगळ्याच प्रकाराची भीती वाटते. भुंकणारे कुत्रे चावत नसते असा एक समज आहे; मीही तसाच समज करून घेण्याचा खूप प्रयत्न केलेला आहे. तीच गोष्ट मी माझ्या मुलांनाही सांगितलेली आहे. पण आता मुले आसपास नाहीत, तेव्हा तुम्हाला खरी गोष्ट सांगायला हरकत नाही; माझ्या मुलांपेक्षा मला स्वतःलाच भुंकणाऱ्या कुत्र्यांची अधिक भीती वाटते. भुंकणारे कुत्रे चावत नाही हे खरे नव्हे. ते जरूर चावते आणि चावण्यापुर्वी "मी चावणार आहे" असे ओरडून सांगते. त्याच्या भुंकण्याला अर्थ असतो. कोणाचेही भुंकणे निरर्थक नसते. तसे निरर्थक काहीच नसते. निरर्थकही वाटते तितके निरर्थक नसते. मी निरर्थकाला फार भितो. निरर्थकाला कोणत्याही अर्थाचे सोंग घेता येते. निरर्थक म्हटले की मला मावशीचे ते बाटलीतले भूत आठवते. मावशीच्या गोष्टीत ते पुष्कळदा यायचे. राजापुढे ते भूत राजासारखे व्हायचे, राणीपुढे राणीसारखे व्हायचे, विदुषकापुढे विदुषकासारखे. ते भूत कुणालाच गाडता येईना. शेवटी मांत्रिकाला त्याच्यापुढे त्याच्यासारखेच दुसरे बाटलीतले भूत ठेवावे लागले. मग ते त्याच्यासारखे झाले, आपोआप बाटलीत

गेले. निरर्थकाचे तसेच असते. त्याच्यापुढे दुसरे एक निरर्थकच उभे करावे लागते. म्हणून भुंकण्याला मी निरर्थक मानणार नाही. ते निरर्थक आहे असे कळेल त्या दिवशी मला त्याची अधिक भीती वाटेल.

भुंकणाऱ्या कुत्र्यापेक्षा भयकर अशी एकच गोष्ट आहे... न भुंकणारा कुत्रा. असा कुत्रा मी पाहिलेला आहे. भांब्या गुरवाकडे. भांब्या गुरव हा व्याघ्रेश्वराचा पुजारी. त्याच्याकडे दोन भयंकर गोष्टी होत्या.एक मोठ्याने वाजणारा अगडबंब शंख आणि दुसरा हा न भुंकणारा कुत्रा. आमच्या मामाकडे सुद्धा एक चमत्कारिक शंख होता; त्याचीही मला भीती वाटे, पण तो कोणी वाजवत नसे. भांब्याने शंख वाजवला की त्यातून एक भयंकर ओंकार बाहेर पडल्याचा भास होई तो वाजवताना भांब्याचे गाल शंखाकार होत. पण भांब्याच्या शंखापेक्षाही त्याच्या न भुंकणाऱ्या अवाढव्य कुत्र्याची आम्हाला अधिक भीती वाटे. त्याला दगड मारला तरी भुंकत नसे; नुसती डोळ्यांची उघडझाप करी. तो का भुंकत नाही म्हणून आजीला विचारले तर आजी म्हणायची, " अरे, जनावरांसुद्धा मुकी सचत. " पण देवळाच्या पायरीवर अस्ताव्यस्त पसरलेला तो भांब्या गुरवाचा अजस्र कुत्रा मुका असेल असे आम्हाला कधीच वाटले नाही! तो आपला भुंकत नसे. भांब्याला विचारले तर भांब्या नुसते दमात घ्यायचा, " भुंकात तदवा कळांत ! "

स्थानेश्वराच्या पिंजऱ्यात जवळ जवळ दरसाल एक वाघ पकडीत; आणि मग त्याला पाहण्यासाठी आसपासच्या गावकऱ्यांची एक प्रचंड यात्रा लोटे. या वाघात इतके काय पाहतात हे मला कधी कळले नाही. त्या वाघापेक्षा भांब्याच्या कुत्र्याचीच मला अधिक भीती वाटे. आणि हे कबूल करण्यात मला बिलकूल लाज वाटत नाही. कुत्र्याची भीती वाटण्यात कमीपणा आहे आणि वाघाची भीती वाटण्यात मोठेपणा आहे असे समजणे खुळेपणाचे आहे. माणसाला खरी भीती वाटते ती मोठ्या अरिष्टांची नव्हे. मोठी अरिष्टे ही काहीशी तात्त्विक व सर्वव्यापी असतात. त्यांची भीतीसुद्धा तशीच सर्वव्यापी असते. खरे म्हणजे, मोठ्या अरिष्टांची भीती हे बुद्धीने उभे केलेले एक

बुजगावणे असते. ती आपल्याला जाणवण्यापूर्वीच आपण त्यांच्या भक्ष्यस्थानी पडतो. सर्वव्यापी वस्तू ही जाणिवेने गृहीत धरलेली गोष्ट असते. म्हणूनच आपल्याला परमेश्वर जाणवत नाही; हवा जाणवत नाही. मला मृत्यूची भीती वाटत नाही; भीती वाटते ती फक्त त्याच्या आसपास बाजारबुणग्यासारख्या भटकणाऱ्या यातनांची. धरणीकंपाची भीती वाटत नाही; भीती वाटते ती माझ्या पायावर पडणाऱ्या समोरच्या वरवंट्याची. जुल्मी राजसत्तेला मी डरत नाही; मला भीती वाटते ती भलत्याच ठिकाणी रस्ता ओलांडीत असताना पाठीमागून हळूच येऊन अचानक हात पकडणाऱ्या पोलिसाची...आणि या सर्वांहूनही अधिक, सहस्रपट अधिक, मध्यरात्रीनंतर परत येताना रस्त्यावर दबा धरून बसलेल्या भुंकणाऱ्या कुत्र्यांची.

रात्री भुंकणाऱ्या कुत्र्यांपेक्षा पिसाळलेले कुत्रे मला कमी भयानक वाटते. पिसाळलेल्या कुत्र्याबद्दल माझ्या मनात एक विकृत आकर्षण आहे. का ते सांगता येणार नाही. कदाचित पिसाळलेले कुत्रे व्याधिग्रस्त असते म्हणून असेल; कदाचित तसलेच एक कुत्रे आमच्या मिरकुटे मास्तरना चावले होते म्हणून असेल. हे मास्तर आम्हाला कधीच आवडले नाहीत. ते नावाने मिरकुटे आणि वृत्तीने मारकुटे होते. मास्तरांना संसार नव्हता, मूलबाळ नव्हते. ते आपला सर्व वेळ शाळेत, पोष्टात व बागेत घालवीत. मास्तरांचे प्रेम आणि राग दोन्ही अतिरेकी असत. मारीत तेव्हा खूप मारीत, नाहीतर एकेकदा स्वतःच्या बागेतली केळी सबंध शाळेला फुकट वाटीत. मास्तरांचा मार आणि केळी दोन्ही सुप्रसिद्ध होती. आम्ही शाळेतून घरी जाताना दिसलो की वरच्या वाडीतला बाबलंभट आपल्या खळ्यातून ओरडून विचारायचा, "काय रे, आज केळी पोटात की पाठीवर?" आम्ही आपले लाजून मुकाट्याने पुढे जात असू; पण विष्ण्या वैशंपायन बरोबर असला तर अद्रूण ओरडायचा, "बाबलंभटाच्या पंचात" पोरे हसायची. पण मी आपले हसणे दाबून धरायचा. अशा अचकट विचकट बोलण्याला हसलेले मथुआत्तेला आवडत नसे. पुढे एक दिवस गावात अचानक बोंब उठली "मास्तराक कुत्र्यान् खल्लान्" प्रथम आम्हाला वाटले अक्षरशः सबंध खाल्ले असेल. आता शाळा संपली. पण शाळा अशी संपत

नसते. कोकणात "कुत्र्यान् खल्लान्" याचा अर्थ 'कुत्रे चावले' एवढाच होतो. कोकणात चहा सुद्धा 'खातात.' मास्तरांना चावलेले कुत्रे पिसाळलेले असणार याबद्दल आम्हाला कोणालाच संशय नव्हता. पण मास्तर आपले लंगडत लंगडत दुसऱ्याच दिवशी शाळेत हजर ! गावकऱ्यांनी जवळ जवळ पंधरा दिवस शाळेत मुलेच पाठविली नाहीत. प्रत्येकाला वाटायचे, पिसाळलेला मास्तर पोराला चावला तर! शेवटी मास्तर घरोघर फिरले आणि मग आम्ही शाळेत जाऊ लागलो. वडिलांशी बोलण्यासाठी ते आमच्या घरी आले तेव्हा मी प्रथम पुढच्या दारून मागच्या दारी पळालो. मग आईच्या आधाराने बेताबेताने पुन्हा पडवीकडे वळलो. मास्तर बराच वेळ वडिलांशी बोलत होते. पण ते काय बोलले हे मला कळले नाही. माझे आपले सर्व लक्ष मास्तरांच्या आवाजाकडे होते.

पिसाळलेल्या कुत्र्याची मला भीतीपेक्षा दयाच जास्त वाटते. पण रात्री भुंकणारी कुत्री ही वेगळी असतात. रात्र ही त्या कुत्र्यांनी भुंकण्यासाठीच केलेली असते. सैतानाने प्रथम कुत्रे केले आणि त्याला भुंकता यावे म्हणून मग रात्र केली. शिवाय रात्रीचे भुंकणे आणि दिवसाचे भुंकणे यात फरक आहे. खूपच फरक आहे. दिवसा 'कुत्रा' भुंकतो; रात्री 'कुत्रे' भुंकते ! दिवसाचे भुंकणे हे माणसाला फारसे परके वाटण्याचे कारण नाही. तशाच स्वरूपाचा आवाज आपणाला पुष्कळ ठिकाणी माणसाकडूनही ऐकायला मिळतो. आपण आपल्या प्रतिस्पर्ध्यावर गुरगुरत असतो, शेजाऱ्यावर ताशेरे झोडतो, चोरांना दम भरतो, नोकरांवर खेकसतो, या सर्व आवाजांचे भुंकण्याशी साधर्म्य असते. आपल्याकडे कुत्रा असला तर त्यालाही तो स्वर फारसा अपरिचित वाटत नाही. आपण जोरजोराने भांडत असलो म्हणजे पुष्कळदा कुत्रे आपल्याकडे लक्षपूर्वक पाहत बसतात. ती तसे का पाहतात, हे मला समजलेले आहे. कुत्र्यांना वाटते; आपण त्यांची भाषा शिकण्याचा प्रयत्न करीत आहो; काही वेळाने आपल्याला शेपूट फुटणार; काही वेळाने आपण चार पायांवर चालू लागणार. आणि ते बरोबर आहे. कुत्र्यांची शैली वापरणारा मनुष्य पुढे मागे कुत्रा होण्याची शक्यता असते. कुत्र्यांच्या तर्कशास्त्रात हे चपखल बसते. कुत्र्यांचे

तर्कशास्त्र हे माणसांच्या तर्कशास्त्रापेक्षा वेगळे असते. त्यांच्या मानेवर ॲरिस्टॉटलचे भूत बसलेले नसते. मध्यरात्रीनंतरचे कुत्र्यांचे भुकणे ऐकल्यानंतर ॲरिस्टॉटलला आपल्या तर्कशास्त्राच्या सगळ्या मर्यादा समजल्या असल्या पाहिजेत.

मला पुष्कळदा एक प्रश्न पडतो. आपल्याला जी वस्तू काळी दिसते तीच गोष्ट कुत्र्यालाही काळी दिसत असेल का? आपल्याला जे पिवळे दिसते तेच त्यालाही पिवळे दिसते असे म्हणायला आधार काय? कुत्र्यांनाही रंगांचे वेगळेपण जाणवत असते एवढीच गोष्ट फार तर प्रयोगांनी सिद्ध करता येईल. कदाचित आपल्याला काळा रंग दिसतो तो त्याला पिवळा दिसत असेल आणि आपल्याला पिवळा दिसतो तो त्याला काळा दिसत असेल. वेगळेपणाची जाणीव सामान्य असूनही प्रत्येक रंगाची विशिष्ट अनुभूती वेगळी असेल. आपला सर्व विचार मानवकेंद्रित असल्याने आपणाला हे चमत्कारिक वाटते. पण यात अशक्य असे काहीच नाही. माणसाला अनाकलनीय असे पुष्कळ वेगळे अनुभव प्रत्येक कुत्र्याला येत असले पाहिजेत.

अंधाऱ्या रस्त्याने मध्यरात्रीनंतर घराकडे येत असताना माझ्या विचाराची ही मुलभूत मानवकेंद्रितता थोडी डळमळू लागते. त्या वेळी कुत्र्यांना दिसणारे जग हे मला दिसणाऱ्या जगाहून वेगळे असले पाहिजे याबद्दल संशय राहत नाही. प्रथम एक कुत्रे भुंकते, मग दुसरे भुंकते; मग दुरून खोल आवाजात त्याला कुणाची तरी साद मिळते. मग गल्लीतली सगळीच कुत्री एकदम गिल्ला करतात. मग सवालजबाब चालतात, आणि शेवटी सगळे हातघाईवर येणार असे वाटते तोच अचानक सगळीकडे सामसूम होते. हे सगळे अर्थहीन असते असे म्हणणे म्हणजे आपणाला जे दिसत नाही ते कोणालाच दिसत नाही असे समजण्यासारखे आहे. आपल्याला दिसत नाही असे काहीतरी त्याला दिसलेले असते. तुम्ही म्हणाल, कुत्रा आपणाला पाहूनच भुंकतो. पण तुम्ही चुकता. रात्री कुत्रा भुंकत नसतो, 'कुत्रे' भुंकत असते! कुत्रा माणसाला पाहतो; पण कुत्रे काहीतरी वेगळेच पाहात असते. कुत्रे हे काळे असते. त्याचे डोळे अंधारात चमकत असतात; शेपूट काहीसे सरळ असते आणि नाक जमिनीकडे झुकलेले असते.

असले कुत्रे एकदा तरी भुंकल्याशिवाय खऱ्या अर्थाने रात्र कधीच होत नाही. खरे म्हणजे ते भुंकत नसते. कोणाला तरी हाक मारीत असते. आपल्याला नव्हे, आपल्यातल्याच दुसऱ्या कुणाला... त्याच्या ओळखीच्या एका पुरातन प्राण्याला.

म्हणूनच कुत्रे भुंकू लागले की मला त्याची भीती वाटते. मी झपाझप पावले टाकीत कसेतरी घर गाठतो. तीन जिने चढून आल्यामुळे मला घाम फुटला आहे अशी घरातल्या माणसांची कल्पना असते. पण खरे कारण वेगळे असते; मी नखशिखान्त त्या भीतीनेच निथळत असतो. त्या भुंकणाऱ्या कुत्र्यापासून शक्य तितक्या लौकर दूर पळून जाणे आवश्यक असते. ते कुत्रे मला काहीतरी सांगत असते आणि ते समजून घेण्याची माझी तयारी नसते. त्याचे म्हणणे मला समजते आहे, त्याची ओळख मला पटते आहे, याची अंधुकशी चाहूल जरी त्याला लागली तरी सगळी कुत्री मला एकदम सामोरी येतील. प्रथम एक कुत्रे भुंकेल; मग दुसरे भुंकेल; मग दुरून खोल आवाजात त्याला कुणाची तरी साद मिळेल; मग गल्लीतली सर्व कुत्री एकदम गिल्ला करतील. मग पहिले कुत्रे पुन्हा एकदा समंजसपणाने तोच पहिला प्रश्न मला पुन्हा विचारील. इतके होईपर्यंत मी तिथे थांबलो तर संपलो म्हणून समजा. त्याचा प्रश्न कळला नाही असे म्हणण्याचे धैर्य मला होणार नाही. त्याचे आवाहन मला नाकारता येणार नाही. माझे डोळे अंधारात चकमकू लागतील, नाक जमिनीकडे झुकू लागेल, हळूहळू कंबर वाकू लागेल, हात जमिनीवर टेकतील आणि चार पायांवर तोल सावरणारे ते माझे सोंग एका वेगळ्याच खोल आवाजात भुंकू लागेल ...अगदी त्या कुत्र्यासारखे.

शब्दरंजन : मार्च १९६३

# आम्रयोग

आंबा प्रथम हातांनी खावा. त्याला थोडे आंजारावेगोंजरावे. त्याच्या त्या नितळ सालीवरून हात फिरवावा. डेखापासून चोचीपर्यंत एक हळुवार मींड घ्यावी. त्याच्या नकट्या नाकाचे थोडे कौतुक करावे. मग तो धुतला नाहीत तरी चालेल. आंबा हा स्वभावतःच स्वच्छ असतो, एखाद्या अजाण निरागस पोरासारखा. मग त्याच्याशी थोडे बोबडे बोलावे. एकदा तरी हवेत उडवून हलक्या हातांनी झेलून घ्यावे. मग मनामध्ये मंत्र पुटपुटावा, "झेलला तरी चेंडू नव्हे; तोलला तरी माल नव्हे; सोलली तरी साल नव्हे; कच्चा म्हणून कैरी नव्हे; खाल्ला म्हणून वैरी नव्हे" मग आंबा डोळयांनी खावा; डोळ्यांच्या जवळ न्यावा; डोळ्यावरून फिरवून घ्यावा. त्याच्या रंगात रंगून जावे. मग त्याला नाकानें खावे; त्याच्या वासात विरून जावे. आणि गंधाची धुंदी चढल्यावर मग हळूच डेख काढावे. हे आपण केव्हा केले ते आपल्यालाही कळू नये; आंब्यालाही कळू नये. कळले तर पाप लागते!

पण खुर्चीवर बसून नुसते हापूसचेच आंबे खाणाऱ्या हतभागी लोकांना हा आम्रयोग अजूनही अज्ञात आहे. ते एका पाखंडी कर्मकांडामध्ये गुंतलेले आहेत. पांढरपेशा आचारसंहितेच्या पलीकडे गेल्या शिवाय आपल्याला खरा आंबा खाताच येत नाही. आंबा खाताना आपले सर्वांग त्याच्यात सहभागी व्हावे लागते. शिष्टाचारांचा बळी दिल्याशिवाय आंब्याचा रस मिळाला तरी रसास्वाद मिळणे अशक्य असते. मुंबईमध्ये फक्त मुले तेवढीच खऱ्या अर्थाने आंबे

खाऊ शकतात. त्यांच्या गालांवर साटे चढतात; कपड्यांवर मानचिन्हे उमटतात; नाकावर आंबा खाल्याचा कैफ असतो. आंबे खाल्ल्यावर त्यांच्या संबंध शरीराचा एक मोठा आंबा बनतो. आम्रयोगाचे ज्ञान नसूनही ती आम्रब्रह्मापर्यंत पोचलेली असतात. ज्ञानावाचूनही माणसाला मोक्षापर्यंत कसे पोचता येते याचा तो एक साक्षात्कार असतो. मोठी माणसे आंबा कधीच खात नाहीत; ती फक्त एका महत्त्वाच्या कौटुंबिक शिष्टाचारात सहभागी होतात !

हापूस आंबे खाणारे शहरी लोक हे शिष्टाचार मोठ्या कटाक्षाने पाळतात. नव्हे, तसे ते पाळणे त्यांना अपरिहार्य झालेले असते. सुशिक्षित माणसातला सगळा कर्मठपणा त्या वेळी अगदी उताला येतो. हापूसचा आंबा विळीवर कापून चालत नाही. तो सुरीने किंवा चाकूनेच कापावा लागतो. एखादी गोल पातळ नेसलेली अद्यावत विदुषी विळीवर बसून हापूसचे आंबे खसखसा कापते आहे हे दृश्य कल्पनेतसुद्धा अशक्य वाटते. हापूसचा आंबा सुरीने किंवा चाकूने कापावा लागतो. एवढेच नव्हे, तर त्याच्या फोडीसुद्धा विशिष्ट पद्धतीने व विशिष्ट आकाराच्याच कराव्या लागतात. एका कापाच्या तीन फोडी करणे हे सहसा वर्ज्य मानले जाते. या फोडीतही पुन्हा एक प्रकारचा उच्चनीच भाव प्रस्थापित झालेला असतो. कोयीच्या दोन बाजूचे दोन काप बाजूला काढल्यावर उरलेल्या दोन्ही शिरांच्या फोडी या सामाजिक दृष्ट्या कनिष्ठवर्गात जमा होतात. प्रतिष्ठित पाव्हण्याला त्या देण्याचा परिपाठ नसतो; आणि समजा, एकाच बशीतून सगळ्या फोडी पाव्हण्यापुढे ठेवल्या गेल्या तरी शिरांच्या फोडी शक्यतो घरच्या माणसांनीच घ्यायच्या असतात ! क्वचित प्रसंगी त्यातलीच एखादी फोड आपणही घेऊन आगाऊ पाव्हणा आपला घरगुतीपणा सिद्ध करू पाहातो, पण हाही गौणपक्षच मानतात. हापूस आंब्याच्या या शिष्टाचारसंहितेत खरा जटिल प्रश्न कोयीचा असतो. सुसंस्कृत कुटुंबात या कोयी पाव्हण्यासमोर आणल्याच जात नाहीत. कोणत्या तरी खोल मानसशास्त्रीय प्रेरणेमुळे तसे करणे अभद्र वाटत असावे ! पुष्कळदा या उरलेल्या कोयी नोकरचाकरांना बहाल करण्यात येतात; किंवा एखादी कर्ती गृहिणी त्या कोयी आंबे कापता कापताच चव बघण्याच्या निमित्ताने फस्त करते. पण सुशिक्षित बायांना हे सर्व स्वयंपाक-

घरातच करावे लागते. पाव्हण्याच्या देखत कोया चोखत बसणारी अद्यावत स्त्री मी अजून पाहिलेली नाही.

पांढरपेशांच्या या कर्मकांडातून तुम्हांला बाहेर पडायचे असेल तर माझ्याबरोबर कोकणातच यावे लागेल. कोकणातच आंब्याला आंबेपण असते; मुंबईमध्ये तो फक्त 'माल' असतो. तुम्हांला खरा आंबा पाहायचा असेल तर माझ्याबरोबर धुऱ्याच्या आडीत चला. गुरवाची घाटी चढून गेल्याबरोबर तुम्हांला प्रथम वळणातली बिटकी दिसेल; तुमची बुद्धी क्षणभर मोहवश होईल; कारण ही बिटकी एखाद्या अप्सरेसारखी तुम्हांला आपल्याकडे खेचून घेण्याचा प्रयत्न करील. कित्येक वाटसरू असेच मोहवश होऊन तिच्या आहारी गेलेले आहेत. तिच्या जवळच्या देवण्यावर दमलेला वाटसरू साहजिकच आपले ओझे क्षणभर तरी खाली ठेवतो; मान मोकळी करण्याकरता साहजिकच वर पाहतो; आणि मग फांद्यावर लटकलेल्या बिटक्यांच्या झोळ्या पाहून सहज गंमतीने म्हणून एक दगड वर फेकतो. तुमचा दगड कुठेही बसला तरी तुमच्या त्या एका दगडाबरोबर दहा बिटक्या खाली कोसळतात. आणि त्यातली एक बिटकी तोंडात घातल्यावर मग त्याला पुढचे मागचे भान उरत नाही. बिटकी इतकी लहान की पन्नास खाल्ल्या तरी पोट भरत नाही आणि वखवख मात्र वाढत जाते. खऱ्या आम्रयोगाच्या वाटेवरील ही बिटकी म्हणजे एक मोठे मोहस्थान आहे! संध्याकाळपर्यंत या बिटकीवर दगड मारमारून दमलेले–भागलेले तुम्ही शेवटी घरी परतता; आणि तुमच्या जिभेवर फक्त मिरमिटीची झांबरी चव तेवढीच उरलेली असते. हे सर्व कळून-सवरूनही तुम्ही मोहवश होणार नाही अशी खात्री कोणी देऊ शकणार नाही. या बिटकिचा मोह मी मी म्हणणारांना पडलेला आहे. महात्मा गांधीही या बिटकीजवळून गेले असते तर त्यांनीसुद्धा मागेपुढे पाहात एक गुळगुळीत दगड या बिटकीवर फेकला असता!

म्हणून म्हणतो, या बिटकीजवळ तुम्ही रेंगाळू नका. एकदम धाव घेऊन पुढच्या गडग्याजवळ व्हा; आणि नंतर माझ्या पाठोपाठ धुऱ्याच्या आडीकडे चला. अर्धा मैल आणखी घाटी चढल्यावर तुम्हांला एक घायलीचे रान लागेल. मग

डाव्या बाजूच्या घोळीत उतरा. तिथे एकदम एक महावृक्ष तुम्हांला अचानक सामोरा येईल. गेल्या जन्मी कल्पतरू असलेला हा आम्रवृक्ष म्हणजे आमच्या गावची एक पुरातन संस्था आहे. कलियुगात त्याला म्हारांबा म्हणतात; पण सगळ्या युगात हा वृक्ष इथेच असला पाहिजे याबद्दल तुम्हांला संशय उरणार नाही. त्याचे आडमाप खोड आणि अवाढव्य आकारवश विस्तार याचा वडांनाही हेवा वाटावा इतका मोठा आहे. त्याच्या खोडावरून वर चढणे केवळ अशक्य; तसा खुळा प्रयत्न कोणीही जाणकार करणार नाही. जाणकार लोक जवळच्या सुरमाडाचा आश्रय करून एकदम थेट खांद्यावर पोहोचतात. आपल्यालाही तेच करावे लागेल. भटांच्या मालकीच्या या आंब्याला 'म्हारांबा' असे का म्हणतात असा उपरा ऐतिहासिक प्रश्न तुमच्या मनात भुणभुणू लागेल; पण सुरमाडावरून फांदीवर पोहोचण्याची किमान शक्ती तुमच्याजवळ असेल तर हा प्रश्न फार काळ तुम्हाला छळू शकणार नाही. त्या वेळी तुम्ही आम्रब्रह्मात पोहोचलेले असाल. या आंब्याचे सगळेच काही अद्‌भुत आहे. हा आंबा खात असताना तुम्हाला हुमले चावणार नाहीत! इथे मिरमिट पिळण्याचा प्रश्न नाही किंवा साल टाकण्याचाही प्रश्न नाही. सालसुद्धा खोबऱ्यासारखी खुसखुशीत लागेल. इथे कोय तेवढीच फेकायची असते आणि तीसुद्धा गावाच्या रिवाजाप्रमाणे महारवाड्याच्या दिशेनेच फेकायची असते. कोय फेकताना पुढील गाणे म्हणण्याचा परिपाठ आहे :

**"म्हारांब्याची सोय सोय । म्हारासाठी गेली कोय"**

म्हारासाठी गेली कोय हा अर्थ सरळ असला तरी त्यामुळे म्हारांब्याची सोय कशी होते एवढे मात्र मला अजून उमगले नाही !

रायवळ आंबा खाण्याचा आणखीही एक हिरवट प्रकार आहे; काहीसा असभ्य, बराचसा आततायी. चाळीस वर्षांपूर्वी हा प्रकार कोकणामध्ये विशेष रूढ होता. आंबा खाणारे माणूस आपलेच आहे याची प्रथम खात्री करून घ्यावी. प्रथम त्या माणसाला आंब्याचे दोन चार चुकणे घेऊ द्यावे. मग कामाच्या निमित्ताने पाठीमागे उपस्थित व्हावे. धीरगंभीर स्वरामध्ये तात्त्विक

प्रश्नाची चर्चा काढावी. " तुझ्या आईचे पत्र बरेच दिवसात आले नाही " असे म्हणून उलट घ्यावी. मोक्याच्या जागी दबा धरावा आणि अचानक पाठीमागून झडप घालून दोन्ही हात घट्ट पकडावे. अर्धवट चुफलेला आंबा हिसकून घ्यावा. त्याचे भराभर चुफणे घ्यावे. मग अडंतडं उड्या मारीत स्वैपाकघरातून थेट पुढच्या दारच्या पावठणीवर बसावे आणि तो उरलेला आंबा खाता खाता शेजारच्या मनूआत्याबरोबर वेदान्ताच्या गप्पा माराव्या, " में·म्हणचां, आत्मो अमर सचे तर जनमचे तरी किणला ?" या त्यांच्या नेहमीच्या प्रश्नावर आपण फक्त एवढेच म्हणावे, " अगो मनुआत्ते, तेला सुद्धा आंबो खायवेला हवो सचे !"

सुगंध : दिवाळी १९६३

# कुंड्या नामक संस्था

आज माझ्या मुलाने कुंडीमध्ये एक आंब्याचे झाड लावले आणि मला विचारायला लागला, " झाडाला आंबे कधी येतील ? " उद्या हा कुंडीमध्ये एखादे पिंपळाचे झाडसुद्धा लावील आणि मग विचारील, " या झाडावर समंध कधी बसतील ? " कुंड्यांमध्ये झाडे लावण्याची नवी मोहीम आमच्याकडे नुकतीच सुरू झाली आहे. मुले इरेला पेटली आहेत आणि स्वयंपाकघरातून निर्वाणीचे हुकूम सुटत आहेत. माझी विरोध करण्याची शक्ती जवळ जवळ संपुष्टात आली आहे; आणि एखाद्या संसारी माणसाला साजेल अशा रीतीने मी हळूहळू यशस्वी माघार घेत आहे. मधून मधून भकास चेहरा करून मी त्या केविलवाण्या कुंड्यांकडे पहातो आहे; पण माझ्या भावनेची दखल घेण्याच्या मनःस्थितीत आसपासची माणसे राहिलेली नाहीत. घरापुढे दोनचार कुंड्या असल्याशिवाय घराला घरपण नाही असा ठाम निर्णय त्यांनी घेतलेला आहे; आणि कुंड्यात लावलेल्या झाडांना झाडपण नाही अशा विचारावर मी स्थिर झालेला आहे.

चाळीत राहणाऱ्या बहुतेक माणसांना हा चाळा केल्याशिवाय गप्प बसवत नाही. शहाणीसुर्ती माणसेसुद्धा सोनचाफ्याची आणि प्राजक्ताची झाडे कुंड्यांमध्ये लावताना मी पाहिलेले आहे. ' हे प्राजक्ताचे झाड कुंडीमध्ये कशाला लावलेत ? ' असे मी म्हटल्यावर ' यालासुद्धा पुढच्या वर्षी फुले येतील. तुम्ही पाहाल. ' असे रोखठोक उत्तर मला मिळालेले आहे. पण कुंडीमध्ये

प्राजक्त पाहिला की मला कोंकणातले आमचे घरभाट आठवते. त्यातला पाळंदी-जवळचा प्राजक्त दिसू लागतो. मी आणि माझा धाकटा भाऊ परड्या घेऊन फुले वेचीत असतो. आमच्या परड्या फुलांनी भरण्याअगोदरच आमचे सदरे प्राजक्तावरच्या दवाने भिजलेले असतात. पण आज त्याची आम्हाला परवा नसते. आज ताईची मंगळागौर असते. तिची मंगळागौर गोविंदकाकांच्या बनीच्या मंगळागौरीपेक्षा उंच होणार या एकाच भावनेने आम्ही भारलेले असतो...प्राजक्त हा असा पालंडीवर ओथंबलेला असतो; त्याच्या उजव्या बाजूला हजारा फणस असतो; त्याच्या डाव्या बाजूला आमचा गोठा असतो. त्याच्या जवळूनच ब्रह्मदेवाकडे जाणारी आमची पायवाट एक वळण घेते. कुंडीतला प्राजक्त हे त्या खऱ्या प्राजक्ताचे विडंबन असते. माझ्या कवितांची विडंबने मला सहन होऊ शकतात, कदाचित त्या विडंबनांनी माझ्या अहं-भावाला आधार मिळत असेल! पण माझ्या झाडांची विडंबने मला सहन होत नाहीत. आंब्याफणसांची झाडे कुंड्यात लावणे ही कल्पनाच मला भयंकर वाटते. डालडाच्या डब्यात लावलेली ही फुलझाडे मला बघवत नाहीत. काहीतरी भया-नक घडते आहे असे वाटते. कुंड्या नामक संस्थेचा मी एक फार पुरातन शत्रू आहे.

जमिनीच्या प्रत्येक ऊर्मीतून एकेक वृक्ष निर्माण होत असतो. कुंड्यातली माती ही मुळी जमीनच नव्हे. ते एक विलक्षण विपरीत द्रव्य आहे. झाडे जमिनीतच उगवली पाहिजेत, जमिनीतच वाढली पाहिजेत आणि शेवटी कोस-ळायची तर जमिनीवरच कोसळली पाहिजेत. जमिनीचा निरोप आकाशाला पोचवणे हे त्यांचे जीवितकार्य असते. जमिनीत रुजणाऱ्या कोयीतून आंब्याचे झाड उभे होणे हा एक आध्यात्मिक चमत्कार असतो. त्या दृष्टीने कलमी झाडे सुद्धा मला काहीशी कमअस्सल वाटतात. फांदीला बांधलेल्या कलमातून आणखी एक कलमी झाड निर्माण होणे ही एक भौतिक किमया आहे. पहिली घटना योग्याला प्राप्त होणाऱ्या सिद्धीसारखी आहे, तर दुसरी घटना ही जादूगाराने केलेल्या उठवळ प्रयोगासारखी आहे. कुंड्यातली झाडे पाहिली म्हणजे तर मला पत्त्यांच्या हातचलाखीची आठवण होते! जमिनीच्या प्रत्येक ऊर्मीतून

एकेक महावृक्ष निर्माण होत असतो. ऊर्मी भावकवितेची असली तर फुलझाड निर्माण होते; ती महाकाव्याची असली तर आंब्याफणसांसारखे महावृक्ष निर्माण होतात; आणि ती गहनगूढ असली तर तिच्यातून वेडापिंपळासारखे पुराणपुरुष उभे राहतात !

कुंडयात झाडे लावण्यात म्हणे पुष्कळ फायदे असतात. त्या हव्या तिथे हालवता येतात. बिऱ्हाड बदलले की त्याही आपल्याबरोबर मोटारीत असतात ! किंवा पुढच्या दारी गैरसोयीच्या वाटल्या तर मागच्या दारी हालवता येतात. पाव्हणे गुलाबाचे भक्त असले तर गुलाबाची कुंडी सामोरी जाऊ शकते. एखादी भावविव्हळ कवयित्री भेट देणार असली तर जाईजुईच्या कुंडयांना अग्रस्थान देता येते. पॅरिसची हवा खाऊन आलेली असामी अमेरिकेला जाण्यापूर्वी आपल्याकडे पायधूळ झाडणार असली तर कॅक्टसचा कट रचता येतो. आणि समजा, होऊ नये ते झाले; प्रत्यक्ष आपल्या सासूबाईच उपस्थित होण्याचा प्रसंग बेतला तर दोन तुळशीच्या कुंडया दाराच्या दोन बाजूला आत्मरक्षणासाठी उभ्या करता येतात. कुंडयात झाडे लावणारी प्रतिष्ठित माणसे मोठी कावेबाज असतात. या कावेबाज माणसांना ... पण असे म्हणताना मला एकदम आप्पाशास्त्री जुवाठकरांची आठवण होते आणि तोंडाशी आलेले शब्द परत गळयाशी जातात. आप्पाशास्त्र्यांच्या कुंडया ही एक अपवादभूत घटना होती. जितेकराच्या चाळीतल्या त्यांच्या बिऱ्हाडापुढे चमत्कारिक झाडे लावलेल्या बारा कुंडया होत्या; पण त्या कुंडयांचा अर्थ वेगळा होता. त्या तुसडया ब्रह्मचाऱ्याला कुंडयांच्या राजकारणातला हा सामाजिक आशय अभिप्रेत नव्हता. त्यांच्या कुंड्या कधी अकरा झाल्या नाहीत की कधी तेरा झाल्या नाहीत. ' शास्त्रीबुवा, तुमच्या कुंडया नेहमी बाराच का ?' मी एकदा धीर करून त्यांना विचारले. कॉलेजमध्ये जाणाऱ्या पाखंडी पोराविषयी त्यांचे मत अनुकूल नसे. त्यांनी कोकणी पद्धतीने प्रश्नाला प्रतिप्रश्नाने जबाब दिला, ' प्रश्न विचारण्याचे कारण ? ' आमचे उत्तर, ' चांभारचौकशा ! ' पण ते उत्तर शास्त्रीबुवांना बरे वाटले असावे; ते म्हणाले, ' राशी बारा असतात ! ' त्या बारा कुंडयातली चमत्कारिक झाडे ही बारा राशींची प्रतीके होती ! त्यांनी

वीस वर्षे चालवलेले ते एक अनुष्ठान होते. आमचा शौचाचा तांब्या त्यांच्या झाडांना लागला की ते वसकन् अंगावर का यायचे हे मला त्या दिवशी समजले. पुढे पुढे त्या झाडांना स्पर्श करण्याची मलासुद्धा भीती वाटू लागली ! शास्त्रीबुवा पुढे दादरला गोखलेवाडीत राहायला गेले तेव्हा त्यांनी आपल्या कुंड्या आपल्या अगोदरच नव्या बिऱ्हाडात नेल्या. नंतर ते लौकरच वारले. समजा, त्यांनी त्या कुंड्या आपल्याबरोबर नेल्या नसत्या तर त्या कुंड्या जितेकरवाडीच्या बोकांडी कायमच्या बसल्या असत्या. त्यांना हात लावण्याची छाती निदान मला तरी झाली नसती !...पण हा अपवाद वगळला तर एरवी कुंड्या हालवता येतात, झाडे चालू शकतात, ही काही झाडांना शोभणारी गोष्ट नव्हे.

झाडे हिंडूफिरू लागली की झाडांचे झाडपणच नाहीसे होते. कुत्र्यामांजरासारखी ती माणसाळलेली वाटतात. आश्रितासारखा त्यांचा जीव लाचार बनलेला वाटतो. पावाचा तुकडा पाहिल्यावर कुत्र्याने शेपटी हालवावी त्याप्रमाणे पाण्याचा तांब्या पाहिल्यावर कुंडीतली झाडे आपली पाने हालवू लागल्याचा मला भास होतो ! खरीखरी झाडे जमिनीत पाय रोवून निग्रहाने उभी असतात. ती माणसांना मानीत नाहीत. तांब्याभर पाण्याच्या आशेने कुंडीमध्ये बसत नाहीत. एकाच ठिकाणी पृथ्वीत खोल पाय रोवून आदि-नृत्याच्या 'तत् थै' अवस्थेत आकाशाचें ध्यान करीत उभी राहतात. तीच त्यांची तपश्चर्या असते; तेच त्यांचे व्रत असते. या व्रतापासून ढळणाऱ्या कुंड्यातल्या झाडांना फुले येतील, फळे येतील; पण सद्गती मिळणार नाही ! त्यांची भुते होतील आणि ती आपल्या मानेवर बसतील. शहरातील सगळी झाडे तुटली तरी मला त्याचे फारसे वाईट वाटणार नाही. ती सरळ सरळ लढाई झाली असे मी समजेन. यंत्रे आणि झाडे यांच्यात लढाई झाली आणि त्यात झाडे हरली तर त्यात मला किंवा झाडांना लाज वाटण्यासारखे काही नाही. त्या पराजयाला सुद्धा आपले स्वभावसिद्ध ब्रीद न सोडता सर्वस्व पणाला लावणाऱ्या शोकान्तिकेचे तेज असेल, पण तडजोड करून कुंड्यात जाऊन बसणे हे मी कोणच्याही झाडाला करू देणार नाही. ते पाप आहे.

झाडांविषयीची माझी भावना ही काहीशी धर्मभावनेसारखी आहे. धार्मिक विधीमध्ये तडजोडीला वाव नसतो. प्रत्येक विधी हा एक भावनोद्दीपक व्यूह असतो. अशा विधीचे खरे सामर्थ्य त्याच्या अर्थहीन सांगोपांगतेत असते. विचाराच्या चाळणीतून तो तपशील चाळला तर वर फक्त भूतकाळाच्या हिडीस बरगड्या शिल्लक उरतात. म्हणूनच छाटछूट नवे विधी पाहिले की मला शिसारी येते. कुंडी-तली झाडे पाहिली की मला तसलीच शिसारी येते. कुंडीतल्या झाडाला फुले येतात, पण ती कागदाची; त्यांना वासही येतो, पण तो कुपीतल्या अत्तराचा ! म्हणून कोणत्याही घरापुढे कुंड्या दिसल्या की त्या घरात शिरताना माझे मन अगोदरच साशंक होऊ लागते. कुंड्यातल्या झाडांचा खोटेपणा हळू हळू त्या घरालाही स्पर्श करू लागतो; आणि काही वेळा तर मला त्या घरामध्ये खुर्चीत बसलेला प्रत्येक माणूसही एका मोठ्या कुंडीत बसल्याचा भास होतो !

श्री दीपलक्ष्मी : १९६४

# डोळी

आज ताईची डोळी येणार असते म्हणून मला शाळेत जायला नको असते. शनिवारची सकाळची शाळा मला आवडत नाही. मी आंबट चेहेरा करून दप्तर बांधतो. मग माझ्या पोटात कळ येते ! आई म्हणते, " परसाकडला जाऊन ये. ' मी परसाकडला गेल्यावर पंधरा मिनिटे तिकडेच रेंगाळतो. चिव्याच्या बेटातल्या एका बारीक कोंबाला दादांच्या टेकायच्या काठीचा आकार देण्यासाठी घोस्याच्या वेलीने बांधून ठेवतो. आड्यातल्या हुऱ्यावरचे एक पान तोडतो, आणि ते मधोमध मोडून त्याच्या डिंकाचा आरसा करतो. अंतूकाकांचा मोऱ्या बैल आमच्या बांधावर वसवसून चरत असतो; त्याच्या टक्कुरीत नेम धरून दगड मारतो. तो थोडक्यात चुकतो. येता येता वाटेत एरंडाच्या वयीतील एक मोठ्याच्या मोठ्ठा बुरंबुळा खणतो. आणि मग त्याच डबऱ्यात पाण्याचा तांब्या रिकामा करून घरी येतो. आई म्हणते, " कसे झाले रे ? " मी म्हणतो, " पातळ. " दादा पडवीतून ओरडतात, " त्याला कुड्याचे पाळ दे आणि सरळ शाळेत धाड. " आणि मग मला म्हणतात, " समजलास रे, तू शाळेतून परत येईपर्यंत डोळी येणार नाही. " आई पाळ उगाळते. मी डोळे पुशीत पुशीत कपडे घालतो.

" आई, डोळीला किती गडी असतील ग्ये ? "

" चार. "

" मग गेल्या खेपेला दोनच का होते ? "

" पण या वेळी चार पाठवले आहेत. "

दादा ओरडतात, " अजून गेलास नाही का गाढवा ? "

मी दप्तर काखोटीला लावून तरातरा शाळेत जातो.

ताई येणार म्हणून आमच्या घरी मोठी तयारी चाललेली असते. स्वैपाक-घराजवळची अडगळीची खोली दादांनी स्वतः स्वच्छ केलेली असते. त्यातली घुशीची बिळे दगड ठोकून बंद केलेली असतात. मोरीच्या भगदाडातून शिमीट ओतलेले असते. खिडकीचे मोडके झडप गंगवजा दुरुस्त करून जातो. भिंती लाल मातीने सारवलेल्या असतात. नळ्यातली गळती काढलेली असतात. मी उठण्याअगोदरच आई खोलीची जमीनसुद्धा सारवते आणि त्यावर कण्यांनी स्वस्तिक काढते. दादा आईला म्हणतात, " कोणी मुंबईला जाणारे आढळले तर आठवण कर. " आई म्हणते, " कसली ? " " इथे छपरात एक काच बसवायला हवी. " आई म्हणते, " हा काय म्हातारचळ लागला की काय ? माझी इतकी बाळंतपणे इथेच झाली. एक खिडकी आहे तेवढी पुरे. " दादा बोलत नाहीत; शिडीवर चढून छपराखालची कोळिष्टके झाडू लागतात.

कालपासून गुणीला पेंड व सरकीसुद्धा अधिक घालतात. आई दादांना म्हणते, " प्रश्न या म्हशीचाच आहे. आता केव्हा लाथ मारील नेम नाही. कालपासून एकसारखी रेकते आहे. एवढे दोन महिने काढलेन म्हणजे मिळवली. " आणि मग भिक्याला म्हणते, " उद्यापासून रेडकू सोडू नको, आणि पान्हवणाची काथोटली पुरी भर, लाथ मारलीन तर मला हाका मार. चांगले दांडेपान्हवण घालने ! " मग आपल्याशीच चडफडत बसते, " वाफेला यायला हिला आत्ता फावले; दोन महिने थांबती तर काय मरती ? "

शाळेच्या वाटेवर मला प्रथम रघ्या भेटतो. त्याची बहीण नुकतीच मंगळा-गौरीसाठी माहेरी आलेली असते. तीसुद्धा डोळीतूनच आलेली असते. तो म्हणतो, " आमच्या ताईची मंगळागौर आहे, समजलास. शिताचौरी आणण्या-साठी मी नान्या टुकरूलाबरोबर दुपारी आडीत जाणार आहे. आम्ही धोतऱ्याची पाने सुद्धा आणणार आहोत ! बांदिवड्याची आत्ते टोपलाभर केगदे पाठवणार आहे. केवढी मोठी मंगळागौर होणार आहे माहिती आहे ? "

" केवढी रे ? "

" माझ्या कमरेइतकी उंच. "

तो मला आपल्याबरोबर आडीत बोलावतो. रघ्याबरोबर आडीत जायला मला नेहमीच आवडते. शिताचौरी व पांढऱ्या धोतऱ्याची पाने कुठे मिळतात तेही मला पाहायचे असते. पण दुपारी ताईची डोळी यायची असते म्हणून मी नाही म्हणतो.

" आज आमच्या ताईची डोळी येणार आहे, माहीत आहे ? "

" केव्हा ? "

" दुपारी. तुमच्या डोळीला किती गडी होते रे ?

" दोन. "

" आमच्या डोळीला चार आहेत ! चार. "

" मग त्यात काय. डोळीला दोन पुरतात. "

" खऱ्या डोळीला चार लागतात. चार. "

शाळेत गेल्यावर प्रथम दात्ये मास्तर आमच्या पाऱ्या पाहतात. रघ्याचा घरचा अभ्यास झालेला नसतो म्हणून त्याला कोपऱ्यात जाऊन आंगठे धरायला लावतात. रघ्या कोपऱ्यात जाऊन आंगठे धरतो, आणि माझ्याकडे मान वळवून फिदीफिदी हसायला लागतो. मास्तर आम्हाला तोंडचे हिशोब घालीत असतात, म्हणून हे त्यांना दिसत नाही. त्यांची पाठ रघ्याकडे असते. रघ्या हळूच जीभ बाहेर काढतो, आणि पुन्हा हसतो. मास्तरांनी पाहिले तर ते त्याला खुर्ची करायला लावतील. रघ्या पुन्हा जीभ बाहेर काढतो. माझी जीभ सुद्धा मला नकळत बाहेर आलेली असते. ते मला मास्तर खेकसल्यावर कळते. " दोनशे ऐंशी रुपये खंडी भात, तर एक मणाची किंमत किती ? " मास्तर आणखी एक हिशोब घालतात. माझी जीभ बाहेर दिसल्यामुळे मास्तर प्रश्नाचे उत्तर मलाच विचारतात. मी ' चार ' म्हणून ताडकन उत्तर देतो.

" चौदा. "

गुरवाचा शंकऱ्या न विचारताच उत्तर देतो.

" तुला विचारले होते ? "

" नाही. "

" दहा उठाबशा काढ. "

मग मास्तर आम्हाला म्हणतात, " आता तुम्ही भटांनी या गुरवांची गुरे

राखा ! " खरे म्हणजे मलासुद्धा चौदाच म्हणायचे असते; पण तोंडातून 'चार' असे निघते. हे मी मास्तरांना सांगत नाही. मला उठाबशा काढायला लावतील.

शाळेतून परत येताना मला वरच्या वाडीचा बाब्लभट भेटतो. बाब्लंभटाचे दोंद पहिल्यापेक्षा उतरलेले दिसते. गेल्या वर्षी अप्रेशनसाठी त्याला राजापूरला नेताना त्याची डोळी आमच्या खळ्यातूनच पुढे गेलेली असते. त्यावेळी बाब्लंभट मुळूमुळू रडत होता तेही मला आठवते. पण ती डोळी किती गड्यांची होती, हे मला आठवत नाही. मला ते बाब्लंभटाला विचारावेसे वाटते. पण तोच मला प्रथम विचारतो, " काय रे, यंदा मुंज करणार की नाही ? दादांना सांग यंदा लाभते आहे असे भडजींनी सांगितले म्हणून; विसरू नको. " बाब्लंभट पुढे जातो. तो ठेंगू आहे. पण त्याची सावली त्याच्याहूनही ठेंगू दिसते; त्याच्या पायात ती मांजरासारखी लुडबुडते. मला कधीकधी असले मत्कारिक सुचते. पण ते मी कोणाला सांगत नाही. हल्ली आईलासुद्धा सांगतच नाही. आईला सांगितले की ती म्हणते, " असले खुळ्यासारखे बोलू नये. "

मी घरी आल्यावर खळ्यातूनच आईला विचारतो, " डोळी आली काय ग्ये ? " आई म्हणते, " नाही; अजून आलेली नाही. पण आता केव्हाही येईल...तरी ऊन करू नका, असे गड्यांना तिनूतिनूदा बजावले आहे " मग आई म्हणते, " तू आधी जेवायला चल. " मी जेवायला बसतो. आई आणि दादा ताईसाठी थांबून राहतात. मी भसाभसा गोळे मारतो आणि खळ्याच्या कोपऱ्यावर येऊन इर्लेटोकीकडे पाहू लागतो. गोवळाहून येणारी वाट इर्लेटोकीच्या डोंगरावरूनच खाली उतरते. एकदा गड्याच्या खांद्यावर बसून मी भाऊबिजे-साठी त्याच वाटेने गेलेला असतो. गोवळाहून परत येताना प्रथम तर लागते, मग घोणसरीचे रान लागते, मग जुवाठचे कातळ लागते, आणि शेवटी ही इर्लेटोकीची उतरण लागते. उतरणीवरून खाली येणारी वाट आमच्या खळ्या-तून सुद्धा दिसते. गोवळाहून येणारी दुसरी वाट जुवाटच्या घाटीतून खाली उतरते. पण त्या वाटेने भरलेली डोळी आणीत नाहीत.

डिंक कुटता कुटता आई म्हणते, " गड्याजवळ नारळ दिला आहे. चाळ्या-जवळ फोडलेनी म्हणजे झाले. हल्ली मेल्यांचा नेम नाहीं; घरी नेऊन कालवण

करतील. ”

दादा म्हणतात, “ त्याची काळजी नको. बाबल्या गुरव बरोबर आहे. ”

मी डोळे बारीक करून इलेंटोकीकडे पहात राहतो. डोंगराच्या उतरणीवरून बारीक बारीक ठिपके हलल्यासारखे दिसतात. तीच ताईची डोली असणार. मी ओरडतो “ डोली आऽली ” दादा म्हणतात, “ मूर्ख आहेस; इलेंटोकीवरची माणसे इथून दिसणार नाहीत. ” पण दादाही हातातला ‘केसरी’ झोपाळ्यावर ठेवून खळ्यामध्ये येतात, आणि डोळ्यांवर हात धरून इलेंटोकीकडे पाहू लागतात.

इतक्यात मागच्या पालंडीतून गड्यांच्या पायतणाचा करकर आवाज ऐकू येतो. लौकरच गोठ्याजवळच्या पायऱ्या चढून गडी खळ्यात येतात. मी बाबल्याला विचारतो, “ ताई खय हा ? ” भिंतीजवळ डोलीचे समान ठेवून बाबल्या गुरव दादांना काहीतरी हलक्या आवाजात सांगू लागतो. दादा आईशी कुजबुजतात. आई गोरीमोरी होते. मी पुन्हा विचारतो, “ ताई खय हा ? ” बाबल्या म्हणतो, “ आज ताई येत नाय. ”

गड्यांना चहा ठेवण्यासाठी आई सैपाकघरात जाते. दादा ताडकन उठतात आणि बैलांना गवत घालण्यासाठी गोठ्यात जातात.

मला रडायला यायला लागते, पण मी रडत नाही. झोपाळ्याच्या कड्या धरून मोठमोठे झोके काढू लागतो. उंच उंच; त्याहून उंच; उंचाहून उंच.

मौज : दिवाळी १९६४

# शिरावर भार ढगांचा

हिवाळ्यात पहाटे उठू नये. उठलेच तर निदान हे असले त्रिभासी ढग पाहू नयेत. ते पाहिले की माणूस ढगवेडा होतो. सबंध दिवसभर ढगांना लोंबत असतो. ढगांच्याच लयीत त्याचें मन फिरू लागते; ढगांसारखे वेडेवाकडे आकार घेते. त्या ढगांना पुन्हा रात्रीच्या हवाली केल्याशिवाय माणसाचे पाय पृथ्वीला टेकत नाहीत. असे पिसे लागते याचे कारण सरळ आहे. पहाटेचे ढग हे खऱ्या अर्थाने ढग नसतात; ती ढगांची गर्भावस्था असते. आकारापूर्वीचे हे निराकार पाहण्याचा माणसाला काय अधिकार आहे? सृजनापूर्वीची सृष्टीची गुपिते पाहणारांना असाच शाप मिळतो. असे केले म्हणजे माणसाला त्याच दिवशी त्याचे प्रायश्चित्त घ्यावे लागते; ढगासारखे स्वतःला पिंजावे लागते; ढगामागोमाग रंगांना शरण जावे लागते. आपल्या आत्म्याचे विसर्जन करून अनामिकात शिरावे लागते. पुन्हा त्या ढगांना रात्रीच्या हवाली केल्याशिवाय माणसाचे पाय पृथ्वीला टेकत नाहीत.

सूर्याच्या उन्हाने समुद्राच्या पाण्याची वाफ बनून त्याचे ढग बनतात वगैरे थोतांड आपण पुष्कळ ऐकलेले असते. पण ते खरे नव्हे. पहाटेचे ढग पाहताना असले ढग पाण्याचे बनतात यावर विश्वास बसत नाही. रात्रीच्या अंधाराचे अवशेष पहाटेच्या अस्फुट प्रकाशात मिसळले की त्यांचे ढग बनतात. आणि पुन्हा ढगांचे पाणी बनते हेही खरे नव्हे; ढगांचे पाणी बनताना मी अजून पाहिलेले नाही! ढगातून पाऊस पडताना दिसला म्हणजे ढगांचे पाणी

झाले असे वाटणे हा एक बुद्धिभ्रम आहे. माणसातून माणसे होतात; झाडातून झाडे होतात; तसेच ढगातून फक्त ढग होतात; त्या ढगातून आणखी ढग बनतात. ढगात पुष्कळ वेगवेगळे आकार दिसू शकतात; तसेच ढगातून पाणी आल्याचा भास होतो. शेक्सपिअरच्या अँटनीलासुद्धा एका भावार्त अवस्थेत असे आभास झालेले होते—

Sometimes we see a cloud that's dragonish,
A vapour sometimes like a bear or lion,
A tower'd ciatdel, a pendent rock,
A forked mountain, or blue promontory,
With trees upon it, that nod unto the world,
And mock our eyes with air.........

पण हे भ्रम नुसत्या भावार्त मनःस्थितीत होतात असे नाही; आपली बुद्धीही असल्या भ्रमांपासून विमुक्त नसते. वास्तवावर कार्यकारणभावाचा आरोप करणे, हा बुद्धीचा सर्वांत मोठा भ्रम आहे. कदाचित हे दुपारी पटणार नाही! पण पहाटेच्या नीरवतेत ढगांची गर्भावस्था पाहणाऱ्या मनाला हे अगोदरच समजलेले असते.

ढगांच्या आकारांचे अहिरभैरवी नाट्य सूर्योदयानंतरच सुरू होते. मग सृष्टीबरोबर ढगांचे सवालजबाब सुरू होतात. डोळे चोळीत चोळीत एक ढग पृथ्वीला विचारतो, " झोप बरी लागली ? " ती म्हणते, " बरी लागली; पण चंद्राची चुळबूळ सुरूच होती. हल्ली असेच करतो. " यात हसण्यासारखे काय आहे मला कळत नाही. पण एकामागून एक सर्व ढग हसू लागतात. हसता हसता एका ढगाचे तोंड रुंदावू लागते. हसता हसता त्याची मुरकुंडी वळते. शेवटी हसता हसता तो स्वतःच्या हसण्यातच विरून जातो आणि निमिष आनंदाची एक निमुळती तांबूस रेषा पूर्वेच्या भुवईवर तरंगू लागते. थोड्याच वेळात सर्व लहानमोठे ढग प्रतिष्ठितपणाने वावरू लागतात. काही इटुकले मिटुकले जरीच्या टोप्या घालून मुंजीला जातात. थोराड अंगाचे जळजळीतसा

जरीकाठी फेटा बांधून दरबाराकडे निघतात. काही ढग चकचकणारी शिरस्त्राणे चढवतात व पोलादी घोड्यांवर स्वार होऊन मोहिमेवर निघतात. लौकरच सगळ्या मंडळीची पांगापांग होते. शेवटी एकुलता एक साधाभोळा ढग आपले पांढरे शुभ्र धोतर सावरीत क्षितिजाच्या आधाराने उभा राहिलेला दिसतो. सह्याद्री विचारतो, "तू तेवढा मागे कसा?" ढग म्हणतो, "आता वय झाले."

दुपारचे ढग शंकराच्या भुतावळीला फितूर असतात. ते म्हटले तर असतात, म्हटले तर नसतात. कारण खरे म्हणजे या ढगांना आत्माच नसतो. दुपारच्या वेळी झाडाझुडपांना आत्मा असतो, डोंगरांना असतो, दगडांनासुद्धा चांगला डर्रामु आत्मा असतो, माणसांना तर असतोच असतो. पण दुपारच्या ढगांना तोळाभर सुद्धा आत्मा नसतो. म्हणूनच त्यांना माणसांचा आत्मा बघवत नाही. दुपारच्या रणरणत्या उन्हातून डोक्यावर तरंगणारी ढगांची भुते पाहणारा मनुष्य लौकरच त्यांच्या भुतावळीत जमा होतो. असणे आणि नसणे यांच्या सीमारेषेवर आपल्या आत्म्याचे आसपासच्या तळपत्या उन्हात विसर्जन होते. उरलासुरला चिमूटभर आत्मा हे ढग घारीला काकबली देण्यासाठी वर नेतात. म्हणूनच भर दुपारी डोक्यावर ढग जमले की त्यांच्या आसपास घारींच्या प्रदक्षिणा सुरू होतात. आत्म्यामागोमाग आपले शरीरही सैरभैर होते. त्याची एकात्मता नाहीशी होते. कळसूत्री बाहुल्यांसारखे त्याचे अवयव सुटे सुटे वाटू लागतात. मग एखादा खादाड ढग गिधाडासारखा खाली उतरतो आणि आपले अलगर्जू शरीर चोचीत धरून आकाशाच्या रेताड ओसाडात घेऊन जातो. हिंदोळणाऱ्या प्रत्येक हेलकाव्याबरोबर आपला डगमगडोला कोसळू लागतो. प्रथम कमरेचा सांधा ढिला होतो, मग डावा पाय गळून पडतो. मग उजवा पडतो. नंतर खांद्याचे स्क्रू ढिले होतात. दोन्ही हात चमत्कारिक मुद्रा दाखवीत खाली कोसळतात. विरूप ढगांचा आपल्या भोवती गराडा पडतो. आणि हे विपरीत पाहण्यासाठी आपले डोळे शाबूत असतात, आपले कान शाबूत असतात. पृथ्वीवर पोचण्यापूर्वी आपल्या गळलेल्या हातांनी वाजवलेली विचित्र टाळी आपल्याला स्पष्टपणे ऐकू येते. त्या उंचीवरून आपल्याला नदी दिसते, पण



२०९३६ ... १४४ ... ७६०८ ... २९।१२।८१

पाणी दिसत नाही; डोंगर दिसतात, पण झाडे दिसत नाहीत. आपण डोंगरांना विचारतो, " झाडे काय झाली ? " डोंगर म्हणतात, " हजामत केली ! "

पण लवकरच संध्याकाळच्या कलत्या उन्हाबरोबर तगमगत्या ढगांची बुभुक्षित भुतावळ पांगू लागते. आपले दुरावलेले अवयव पुन्हा परत एकत्र येतात. पुन्हा शरीर एकात्म होते. पुन्हा आत्म्याची स्थापना होते.

मावळतीचे ढग पाहिल्यावर आपली मालवलेली इंद्रिये पुन्हा तेवू लागतात. डोळ्यांमध्ये अनंताचे काजळ भरते. मखमली स्पर्शाने सर्वांगावर शहारा येतो. क्षितिजावर कसलेले ढग रंगांना व पाण्याला शरण जातात. त्यांच्या अहंभावांची अहिमोहिनी होते. सगळ्या यातायातीचा यमनकल्याण होतो. संध्याकाळी या ढगांच्या मैफलीत रंगाचा सुकाळ होतो. अनेक अनामिक रंग आपापल्या चोचीत धरून चारी दिशातले अनोखे पक्षी उडत उडत पश्चिमेला येतात. कारण या ढगांचे गोत्र पक्षांचेच असते; त्यांची रास कुंभ असते; समुद्रमंथनासाठी जमलेल्या देवदानवांचे हेच खरेखुरे वंशज असतात. मुलतानीपासून जयजयवन्तीपर्यंतचे सगळे रंग या मयसभेत हजेरी लावतात. संध्याकाळच्या ढगांचे विकारविलासी रंग हे समुद्रमंथनातून निघालेले पंधरावे आश्चर्य. हे संध्याकाळचे मऊ, ओलसर, नितळ रंग; इकडे आटपाट अट्टेपट्टे, तिकडे दुधखुळी दंगामस्ती, काही हिरवे-हिरमुसते रांगणारे, काही सैल-शेवाळी निसटणारे, काही धुंद–धूसर दबलेले, काही भावभंगुर भिजलेले, काही सोनवर्खी सोनचाफ्याचे, काही असहाय अबोलीचे; मध्येच एखादा अगडबंब रक्तलांछित सूर्यपिपासू; आकाशाचे आकाशाहून, पाण्याचे, पाण्याहून.

शेवटी पाण्याचे पाण्याहून हेच खरे. संध्याकाळच्या ढगांचे पाण्यातले प्रतिबिंब जिथे असते, तिथेच दर्याचा तळ असतो; तितका दर्या खोल असतो. निदान त्या वेळी तरी तो तितकाच खोल असतो. त्या प्रतिबिंबावर दृष्टी खिळवली आणि श्वास रोधून धरला की पार्थिव डोळ्यांना न दिसणारे निरनिराळे आकार दिसू लागतात. तिथे दिसणारे आकार हे ढगांचे नसतात, आत्म्यांचे असतात.

त्या प्रतिबिंबात शेक्सपिअर दिसतो, डांटे दिसतो, डोस्टॉव्हस्की दिसतो, आणि एखादा ढग अगदीच लहान असेल, तर वर्डस्वर्थचे फुलपाखरूसुद्धा दिसते.

मायबोर्ली : १९६४

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथ
१८३९८

REFBK-0014394

४०९३६
१६०४ २८।१२।५५

संपला तात्पर्य सांगणाऱ्या इसापी निबंधांचा काळ
संपल्या निव्वळ हलक्या फुलक्या कल्पनांच्या उतरंडी
इथे दिसतील एका प्रतिभासंपन्न मनाच्या विविधरंगी छाया
इथे व्यक्तित्वच होते एक प्रिझम
जन्मापासून कळत नकळत जोपासलेल्या आठवणी
आणि अनुभूति
तरल मनाने सहजी निर्माण केलेल्या कल्पना
अज्ञानाचे गूढ उकलण्याची प्रज्ञेची असोशी
सारे जेव्हा या प्रिझम्‌मधून बाहेर पडते
तेव्हा अवतरतात अशा रंगदार छाया
आणि रंग तरी कसे ?
काही आकाशाच्याच रंगांसारखे गहनगूढ तर काही
साळीच्या शेतावर दुडुदुडु धावणाऱ्या रंगासारखे अवखळ
काही आपल्याला मोने करणारे जडगंभीर
काही खुसुखुसू गाली हसू आणणारे
काही मनावर वज्रलेप होण्यासारखे पक्के तर
काही अदृश्य हातांनाही धरता येणार नाहीत असे चंचल
सगळे मिळून एक आकर्षक व्यक्तित्व
आपल्यापुढे सजीव करतात
ते आहे कोंकणातून नागमोडी वाटेने घाटावर आलेल्या
आणि घाटावरून सरळ आकाशात झेपावणाऱ्या
करंदीकरांचे
'स्पर्शाची पालवी' फुटलेले झाड
आता चांगलेच बहराला आले असून
आपल्या सूक्ष्मदर्शी डोळ्यांनी
ते आकाशाचा अर्थ शोधू पहात आहे